


सोलापूर तरुण भारत

आसमंत

देशभरात कार्यात्मक उत्पादकता वाढवण्यासाठी तयार करण्यात आली आहे. पहिला अडथळामुक्त टोल प्लाझा, राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातील अर्बन एसटेन्शन रोडवरील मुंडका- बक्करवाला येथे कार्यान्वित झाला. मल्टी-लेन फ्री फ्लो प्रणालीचे आघाडी घेतली. याव्यतिरिक्त, महिलांच्या ४ बाय १०० मीटर रिले संघाने, आशियाई रिले चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदक पटकावले आणि भारतीय महिला क्रिकेट संघाने 'आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक' अंतिम सामन्यात

# जनरेशन झेडची ऊर्जा भारत उभारणीसाठी हवी!

समाजभान **डॉ. पंकज जयस्वाल**

**भारताची विकास यात्रा रोखण्यासाठी देशाच्या नव्या पिढीची विचारसरणी बाधित करण्याचा कुटिल डाव देशातील आणि देशाबाहेरचे शत्रू करत आहेत. एकीकडे त्यांचे हे कार्य सुरू असतानाच, भारतीय तरुण मात्र विविध क्षेत्रांत तिरंगा उंचावत यश साजरे करत आहेत. त्यामुळेच, आजच्या 'जेन-झी' आणि 'जेन-अल्फा'ने आदर्श घेण्यासाठी काही यशोगाथांचा मागोवा घेणारा हा लेख...**

भारतीय 'जनरेशन-झी', स्टार्टअप्स, उद्योग, 'इस्रो', 'डीआरडीओ' आणि विविध खेळांमधील प्रगती, तसेच विज्ञान, तंत्रज्ञान, अंतराळ, संशोधन आणि नवोपक्रमातील अलीकडील कामगिरीचे अवलोकन केल्यावर प्रत्येक भारतीयाला अभिमानच वाटतो. आज जग आपल्या यशाकडे पाहात आहे. आपल्या व्यावसायिकांनी, विशेषतः तरुणांची प्रगती, जागतिक समुदायाचा दृष्टिकोन बदलत आहे. आत्मनिर्भरतेला प्राधान्य देत, भारत आता प्रत्येक क्षेत्रात प्रगती करत आहे. चला, यांपैकी काही अलीकडील कामगिरींवर एक नजर टाकूया...

**राष्ट्र उभारणीसाठी अलीकडील रचनात्मक कार्ये अंतराळ मोहीम:** 'स्कायरूट एरोस्पेस'च्या 'विक्रम-१' रॉकेटच्या यशस्वी प्रक्षेपणानंतर, भारतीय अंतराळ संशोधकांनी देशाच्या या ऐतिहासिक कामगिरीचे स्वागत केले. पहिल्याच प्रयत्नात अंतराळात पोहोचणारे, हे पहिले खासगी क्षेत्राद्वारा विकसित केलेले रॉकेट ठरले. हा टप्पा भारताच्या विस्तारत असलेल्या खासगी अंतराळ क्षेत्राची, एक महत्त्वपूर्ण झेप दर्शवतो. तसेच, देशाच्या अंतराळ महत्त्वाकांक्षेत खासगी क्षेत्राची वाढती भूमिकाही अधोरेखित करतो. 'विक्रम- १' हे केवळ २८ वर्षे सरासरी वय असलेल्या एका तरुण अभियांत्रिकी संघाने विकसित केले असून, यानाचे वजन कमी करून त्याची कार्यक्षमता वाढवण्यासाठी यात अत्याधुनिक कार्बन कंपोझिट तंत्रज्ञानाचाही वापर करण्यात आला. या यशस्वी प्रक्षेपणामुळे, भारत खासगी अंतराळ क्षेत्रात एक प्रमुख जागतिक खेळाडू म्हणून पुढे येण्याची अपेक्षा आहे.

**भारतीय रेल्वे :** एक प्रायोगिक प्रकल्प म्हणून विकसित हा उपक्रम, भारतीय रेल्वेची नवोन्मेषाप्रतिची निष्ठा दर्शवतो आणि ऊर्जा कार्यक्षमता व शाश्वत वाहतूकीला प्रोत्साहन देतो. हायड्रोजन ट्रेनची रचना आणि तपशीलाला 'आरडीएसओ'ने मान्यता दिली असून, हा उपक्रम 'आत्मनिर्भर भारत'मागील दूरदृष्टीचे प्रतीक आहे.

**दुर्मीळ खनिजे:** भारत विद्युत गतिशीलतेकडे वेगाने वाटचाल करत असताना, विद्युत वाहन क्षेत्रापुढील एक मोठे आव्हान म्हणजे दुर्मीळ खनिजांवरील अवलंबित्व. याची आयात प्रामुख्याने चीनमधून केली जाते आणि त्यावर प्रक्रिया होते. बंगळुरुस्थित डीप- टेक फर्म 'विमाग लॅब्स'ने, यावर एक अभूतपूर्व उपाय शोधल्याचा दावा केला आहे. त्यांच्या 'व्हर्च्युअल मॅग्नेट' या शोधाद्वारे केवळ तांबे आणि स्टीलच्या वापरातून मोटर्स उत्पादन शक्य असून, ज्यामुळे दुमिळ खनिजाची गरज पूर्णपणे नाहीशी होते. 'विमाग लॅब्स'ने अलीकडेच एका इलेट्रिक मोटरसाठी आपले पाचवे भारतीय पेटंट मिळवले असून, जी दुर्लभ- मृदा चुंबकांशिवाय चालते. तसेच चुंबकीय क्षेत्र निर्माण करण्यासाठी सॉफ्टवेअर व पॉवर इलेट्रॉनिसचा वापर करते. पाच दशलक्ष डॉलर्सचे मूल्य असलेली ही छोटी कंपनी, 'टेस्ला' आणि 'जीएम'सारख्या मोठ्या वाहन उत्पादकांना अनेक वर्षांपासून गोंधळात टाकणाऱ्या एका समस्येवर काम करत आहे.

**अणुऊर्जा:** अणुऊर्जेच्या क्षेत्रात, भारत एका महत्त्वपूर्ण टप्प्यावर पोहोचला आहे. तामिळनाडूतील कल्पक्कम येथील 'प्रोटोटाइप फास्ट ब्रीडर रिटर'ने (PFBR) दि. ६ एप्रिल रोजी आपली पहिली क्रिटिकॅलिटी (Criticality) गाठली. हे एका शाश्वत अणुसाखळी प्रतिक्रियेच्या प्रारंभाचेच द्योतक असून, भारताच्या अणुकार्यक्रमाचे संस्थापक डॉ. होमी जहांगीर भाभा यांनी मूळतः संकल्पित केलेल्या, भारताच्या तीन टप्प्यांच्या अणुऊर्जा उपक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यात आपण प्रवेश केला आहे. या यशाचे काही जागतिक परिणाम आहेत. रशियानंतर व्यावसायिक फास्ट ब्रीडर रिटर चालवणारा भारत हा दुसरा देश होणार आहे. ही घडामोड अणुऊर्जा विभागाच्या अनेक दशकांच्या कार्याचे फलित असून, स्वच्छ ऊर्जा उपायांप्रति भारताची वचनबद्धता याने अधोरेखित होते. या यशामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घोषित केल्यानुसार, २०७० पर्यंत निव्वळ-शून्य उत्सर्जनाचे लक्ष्य साध्य करण्याच्या अधिक जवळ आपण पोहोचलो आहोत. आंतरराष्ट्रीयबातम्या

**महामार्ग पायाभूत सुविधा:** याव्यतिरिक्त, भारत मल्टी- लेन फ्री फ्लो टोलिंग प्रणाली सुरू करून, आपल्या महामार्ग पायाभूत सुविधांमध्ये वेगाने वाढ करत आहे. ही प्रणाली सुलभ प्रवास, प्रदूषण कमी करणे, प्रवास खर्च कमी करणे आणि उद्दिष्ट, दरवर्षी सुमारे २५० कोटी लिटर इंधनाची बचत करणे आणि अंदाजे ८१ हजार टन कार्बन उत्सर्जन कमी करण्याचे आहे.

**भौतिकशास्त्र ऑलिम्पियाड :** कोलंबियातील बुकारामंगा येथे आयोजित ५६व्या 'आंतरराष्ट्रीय भौतिकशास्त्र ऑलिम्पियाड २०२६'मध्ये, भारताच्या तरुण भौतिकशास्त्रज्ञांनी उल्लेखनीय कामगिरी करत देशाला अभिमान वाटेल, अशी कामगिरी केली. भारतीय संघाच्या पाचही सदस्यांनी सुवर्णपदके पटकावली असून, या असाधारण कामगिरीमुळे भारताला चीन, कझाकस्तान, रशिया, दक्षिण कोरिया आणि तैवान यांच्यासोबत संयुक्तपणे पहिले स्थान मिळाले. हे यश विज्ञान क्षेत्रातील, भारताची वाढती प्रतिष्ठा आणि जागतिक उत्कृष्टता अधोरेखित करते.


**संरक्षण क्षमता:** 'संरक्षण संशोधन आणि विकास संस्था' अर्थात 'डीआरडीओ'ने, राष्ट्राची संरक्षण क्षमता वाढवणाऱ्या तंत्रज्ञानामध्ये लक्षणीय प्रगती साधली आहे. दि. १० जून आणि दि. ११ जून रोजी, सलग तीन उड्डाण चाचण्यांमध्ये लांब पल्ल्याच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांचा सामना करण्यासाठी आणि मध्यम पल्ल्याची जहाजविरोधी क्षमता प्रदान करणाऱ्या बहुस्तरीय संरक्षण प्रणालींचे यशस्वी प्रदर्शन करण्यात आले. यामुळे भारताने आंतरखंडीय बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे रोखण्याची क्षमता असलेल्या, निवडक राष्ट्रांच्या पंगतीत स्थान मिळवले.

**क्रीडा क्षेत्र :** क्रीडा क्षेत्रात पी. व्ही. सिंधूने बॅडमिंटनमध्ये जागतिक क्रमवारीत पाचव्या क्रमांकावर असलेल्या हान यूला पराभूत करून, जपान खुली अजिंक्यपदस्पर्धा जिंकली. बुद्धिबळात, दिव्या देशमुखने जॉर्जियातील बटुमी येथे कोनेरू हम्पीवर विजय मिळवून, 'फिडे महिला विश्वचषक' विजेतेपद पटकावले. 'आयएसएसएफ ज्युनियर वर्ल्ड चॅम्पियनशिप'मध्ये भारताने सात सुवर्ण पदकांसह, एकूण २४ पदकांसह पदकतालिकेत दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ५२ धावांनी ऐतिहासिक विजय मिळवला. ही आपल्या उल्लेखनीय राष्ट्रवाद्यांची केवळ काही मोजकी कामगिरी आहे. आपण भविष्यात विविध क्षेत्रांमधील त्यांच्या व्यापक कामगिरीचा आढावा घेत, राष्ट्र उभारणीच्या प्रयत्नांमध्ये सहभागी होऊ शकतो.

**राष्ट्राला कमकुवत करणारे विद्धंसक कार्य:** तथापि, काही डाव्या विचारसरणीच्या युवा संघटना आणि काही परदेशी अनुदानित गट वेगवेगळे अजेंडे राबवत आहेत. यातून 'जेन् झी' आणि 'जेन अल्फा' यांना भारत आणि त्याच्या समृद्ध संस्कृतीच्या विरोधात भडकावण्याचा प्रयत्न होत आहे. ते जातीच्या आधारावर फूट पाडतात आणि प्रगती, संशोधन व नवोपक्रमाला विरोध करतात; तसेच अप्रत्यक्षपणे चीन, पाकिस्तान आणि स्वार्थाने प्रेरित जागतिक बाजारपेठेच्या शक्तींना, पाठिंबाही देतात.

अनेक तरुण या दिशाभूल करणाऱ्या वृत्तांचेच आज बळी ठरत आहेत. यांना अनेकदा समाज माध्यमे आणि मुख्य प्रवाहातील माध्यमांच्या पक्षपाती वृत्तांकनामुळे खतपाणी मिळते. तरुणांनी हे ओळखणे अत्यंत महत्त्वाचे आहे की, समाजाला आणि राष्ट्राला नेमक अकशाचा फायदा होतो. आपल्या संविधानाला आणि राष्ट्रीय विकासाला धोका निर्माण करणाऱ्या कोणत्याही विचारसरणी नाकारल्याच गेल्या पाहिजेत. योग्य दृष्टिकोनाबद्दल अधिक जागरूकता निर्माण करण्याची गरज आहे, जी समाज माध्यम आणि सामुदायिक मेळाव्यांच्या माध्यमातून केली जाऊ शकते. प्रत्येक राष्ट्रासमोर आव्हाने असली, तरी सकारात्मक बदल घडवून आणू शकणार्या उपायांवर लक्ष केंद्रित करणेही महत्त्वाचे आहे. तरुणांनी भारताला कमजोर करू पाहणाऱ्या शक्तींशी हातमिळवणी करणे टाळावे; कारण अशा युतींमुळे त्यांच्या भविष्यातील प्रगती आणि राष्ट्राची स्थिरता धोक्यात येऊ शकते.

# पाकव्याप्त काश्मिरात आझादीचे वारे



वेधक **प्रतिनिधी**

**स्वातंत्र्योत्तर काळापासून जम्मू-काश्मीरमध्ये फुटीरतावाद, दहशतवादाच्या माध्यमातून पाकिस्तानने आजवर जी जी विषपेरणी केली, त्या दुष्कर्मांची फळे तो सध्या पाकव्याप्त काश्मीरमध्ये भोगताना दिसतो. तेथील विधानसभा निवडणुकांनिमित्ताने सर्वसामान्यांचे खून पाडण्यापासून ते लष्करी दडपशाहीमुळे, पुन्हा एकदा पाकविरोधात काश्मिरींचा असंतोष उफाळून आला. अशीच परिस्थिती कायम राहिल्यास बलुचिस्ताननंतर व्याप्त काश्मीरही पाकच्या तावडीतून आझाद होईल, तो दिवस दूर नाही!**

पाकव्याप्त काश्मीरमध्ये आज जे काही घडत आहे, ते एका निवडणुकीपुरते मर्यादित संकट नाही. हा अनेक दशकांपासून साचत आलेल्या राजकीय उपेक्षेचा, आर्थिक शोषणाचा आणि प्रशासकीय दडपशाहीचा उद्रेक आहे, असेच म्हणावे लागेल. १९४७ पासून पाकिस्तानच्या ताब्यात असलेल्या या प्रदेशाला आजतागायत पूर्ण घटनात्मक दर्जा देण्यात आलेला नाही. स्वायत्ततेच्या नावाखाली तेथील राजकीय व्यवस्था इस्लाम ाबादच्या नियंत्रणाखाली ठेवण्यात आली; तर जलसंपत्ती, खनिजे आणि इतर नैसर्गिक संसाधनांचा उपयोग केवळ पाकिस्तानच्या राष्ट्रीय हितासाठी करण्यात आला. मात्र, त्या बदल्यात स्थानिकांना अपेक्षित विकास, उद्योग, रोजगार किंवा मूलभूत सुविधा मिळाल्या नाहीत. त्यामुळे वाढलेली नाराजी आता उघड जनआंदोलनाच्या रूपाने समोर येत आहे.

यंदाच्या पाकव्याप्त काश्मीरमधील विधानसभा निवडणुकांनी हा असंतोष आणखी स्पष्ट केला. मतदान प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित करत अनेक स्थानिक गटांनी बहिष्काराची भूमिका घेतली. लोकशाहीत मतदान हे व्यवस्थेवरील विश्वासाचे प्रतीक असते; परंतु जेव्हा नागरिक मतदानालाच नकार देतात, तेव्हा तो केवळ निवडणुकीवरील नव्हे, तर संपूर्ण राजकीय व्यवस्थेवरील अविश्वासाचा संदेश असतो. त्यानंतर आंदोलकांवर झालेल्या गोळीबाराने परिस्थिती अधिक चिघळली. पाकिस्तानने या सर्व घडामोडींसाठी भारताला जबाबदार धरण्याचा प्रयत्न केला. मात्र, प्रत्येक अंतर्गत संकटाचे उत्तर भारतात शोधण्याची सवय आता पाकिस्तानच्या विश्वासार्हतेलाच धक्का देत आहे. पूर्वी जम्मू-काश्मीरमध्ये एखादी घटना घडली की, तातडीने भारत सरकारविरोधी प्रतिक्रिया देणारे अनेक आंतरराष्ट्रीय मंच पीओकेतील हिंसाचाराबाबत मात्र तुलनेने शांत राहिले. पण, अशाप्रकारे मानवी हक्कांचे निकष प्रदेशानुसार बदलू शकत नाहीत. एका भागातील घटनांवर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली जाते, तर दुसऱ्या भागातील नागरिकांवरील दडपशाहीकडेही त्याच निकषांनी पाहिले गेले पाहिजे, अन्यथा जागतिक निष्पक्षतेच्या दाव्यावरच प्रश्नचिन्ह उभे राहते. या पार्श्वभूमीवर भारतातील जम्मू-काश्मीरमध्ये गेल्या काही वर्षांत झालेले बदलही लक्षात घ्यावे लागतील. कलम ३७० रद्द झाल्यानंतर सुरक्षा परिस्थितीत झालेली सुधारणा, वाढलेले पर्यटन, वेगाने उभारले जाणारे रस्ते, बोगदे, रेल्वे प्रकल्प आणि वाढती गुंतवणूक यामुळे जम्मू- काश्मीरची प्रतिमा बदलत आहे. या बदलांवर राजकीय मतभेद असू शकतात; परंतु आज भारताच्या जम्मू-काश्मीर आणि पाकिस्तानच्या ताब्यातील पीओके यांची तुलना पूर्वीपेक्षा अधिक ठळकपणे होत आहे.

एका बाजूला विकासाच्या प्रक्रियेत सहभागी होणारा प्रदेश दिसतो, तर दुसऱ्या बाजूला राजकीय असंतोष आणि लष्करी दडपशाहीचा सामना करणारा प्रदेश. पीओकेचा प्रश्न केवळ त्या प्रदेशापुरता मर्यादित नाही. चीन- पाकिस्तान आर्थिक महामार्ग (सीपेक) या भागातून जात असल्याने त्याला सामरिकदृष्ट्याही मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे पीओकेवरील नियंत्रण हा पाकिस्तानसाठी केवळ अंतर्गत प्रशासकीय प्रश्न नसून, चीनबरोबरच्या त्याच्या धोरणात्मक भागीदारीचाही महत्त्वाचा घटक आहे. परिणामी, स्थानिकांच्या असंतोषाकडे केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून पाहण्याची पाकिस्तानची भूमिका अधिकाधिक कमकुवत होत चालली आहे. याच वेळी पाकिस्तानच्या अंतर्गत परिस्थितीकडे पाहिले, तर पीओकेतील जनक्षोभ हा एका मोठ्या संकटाचा भाग असल्याचे दिसते. बलुचिस्तानमधील संघर्ष, खैबर पख्तूनख्वामधील असुरक्षितता, आर्थिक संकट, वाढते परकीय कर्ज, महागाई आणि राजकीय अस्थिरता, यामुळे पाकिस्तानची राज्यव्यवस्था अनेक दिशांनी ताणाखाली आहे. अशा परिस्थितीत प्रत्येक प्रश्नासाठी भारताला जबाबदार धरणे, हा अल्पकालीन राजकीय उपाय असू शकतो; परंतु तो दीर्घकालीन उत्तर ठरू शकत नाही. याच पार्श्वभूमीवर संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांचे विधान विशेष महत्त्वाचे ठरते.

कारगिल विजय दिनानिमित्त त्यांनी स्पष्ट केले की, भविष्यात पाकिस्तानशी कोणतीही चर्चा झाली, तर ती केवळ आणि केवळ पाकव्याप्त काश्मीरवरच होईल. त्यांच्या या विधानाकडे राजकीय घोषणाबाजी म्हणून पाहणे कदापि योग्य ठरणार नाही. अनेक दशकांपासून पाकिस्तान काश्मीर- प्रश्नाचे आंतरराष्ट्रीयीकरण करण्याचा प्रयत्न करत होता; आता भारताने चर्चेची चौकटच बदलण्यास सुरुवात केली आहे. , हा संदेश या भूमिकेतून स्पष्टपणे दिला जात आहे.


गेल्या काही वर्षांत भारताच्या परराष्ट्र आणि सुरक्षा धोरणात हा बदल सातत्याने दिसून येत आहे. दहशतवादाबाबत शून्य सहनशीलतेची भूमिका, सीमापार कारवायांना दिलेले प्रत्युत्तर, सिंधू जलकराराबाबत घेतलेली कठोर भूमिका आणि जागतिक स्तरावर पाकिस्तानला राजनैतिकदृष्ट्या एकाकी पाडण्याचे प्रयत्न या सर्वांचा विचार केला, तर पीओकेचा मुद्दा भारताच्या व्यापक सामरिक धोरणाचा भाग बनत असल्याचे स्पष्ट होते. भारताने दीर्घकाळ पीओकेचा मुद्दा प्रामुख्याने राजनैतिक पातळीवर मांडला. मात्र, आता त्यात सामरिक आणि भू-राजकीय परिमाण अधिक ठळकपणे दिसू लागले आहेत.

पाकिस्तानच्या अंतर्गत अस्थिरतेमुळे आणि पीओकेतील वाढत्या जनक्षोभामुळे या प्रश्नाकडे जगाचे लक्ष वेधण्याची भारतासमोर एक संधी निर्माण झाली आहे. मात्र, या संधीचा उपयोग भावनिक घोषणांपेक्षा संयमी, सातत्यपूर्ण आणि आंतरराष्ट्रीय कायद्यावर आधारित मुत्सद्देगिरीद्वारे करणे, हेच भारताच्या दीर्घकालीन हिताचे ठरेल. भारतासाठी ही परिस्थिती राजकीय विजयाचा विषय नाही. पीओकेमधील जनक्षोभामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीकडे संयमाने आणि दूरदृष्टीने पाहण्याची गरज आहे. सध्या पाकिस्तान समोरील सर्वांत मोठी अडचण म्हणजे, त्याची काश्मीरविषयक धोरणे आता स्वतःच्याच विरोधात जात आहेत. अनेक दशकांपासून भारताविरोधी प्रचार आणि काश्मीरच्या नावावर देशांतर्गत राजकारण करणार्या पाकिस्तानी सत्ताधाऱ्यांना आज पीओकेतील नागरिकच प्रश्न विचारू लागले आहेत. त्यामुळे काश्मीर-प्रश्नाचा केंद्रबिंदू हळूहळू भारतातून पाकिस्तानकडे सरकत आहे. ही केवळ प्रतिमेतील बदलाची बाब नाही, तर दक्षिण आशियातील बदलत्या सामरिक वास्तवाची नांदी आहे. पीओकेतील जनक्षोभ हा केवळ पाकिस्तानच्या अंतर्गत राजकारणाचा विषय नाही. तो त्या प्रदेशातील नागरिकांच्या आकांक्षा, पाकिस्तानच्या प्रशासकीय अपयश आणि दक्षिण आशियातील बदलत्या सामरिक समीकरणांचे प्रतिबिंब आहे. त्याचबरोबर भारतानेही काश्मीर-प्रश्नाकडे पाहण्याची आपली चौकट बदलली आहे. आता चर्चेचा केंद्रबिंदू जम्मू-काश्मीर नसून, पाकव्याप्त काश्मीर आहे, हा संदेश भारताने पुनश्च दिला. त्यामुळे पुढील काळात पीओके हा सीमावादाचा विषय राहणार नाही; तर तो भारताच्या परराष्ट्र धोरणातील आणि दक्षिण आशियातील सामरिक राजकारणातील सर्वांत महत्त्वाच्या मुद्द्यांपैकी एक ठरण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

समीक्षा

किरण डोंगरदिवे

# शापोआ: ग्रामव्यवस्थेच्या दंभाचे आणि शैक्षणिक वास्तवाचे दाहक आख्यान




**मराठी कादंबरीच्या प्रांतात जेव्हा एखादी साहित्यकृती केवळ चौकटीतल्या समाजचित्रणाच्या पलीकडे जाऊन समकाळाच्या अंतःस्वराचा वेध घेते, तेव्हा ती एका नव्या प्रवृत्तीची नांदी ठरते. लेखक अ. फ. भालेराव यांची शापोआ; ही कादंबरी याच वाङ्मयीन परंपरेचा एक सशक्त आणि मूलगामी अविष्कार आहे. शापोआ म्हणजे शालेय पोषण आहार असे शीर्षक असलेली कादंबरी सरकारी शाळेतील शिक्षणाबाबत असलेल्या अनागोंदी व्यवहाराची नोंद घेणारी असेल अशी अपेक्षा घेऊन आपण हे कादंबरी वाचायला घेतो. मात्र त्यातील बारीक कांगोरे पाहता ही कादंबरी आजच्या समस्त समाज व्यवस्थेचे चित्रण करणारी आहे, असे आपल्या लक्षात येते.**

आंबेडकरी ऊर्जेतून लिहित असताना केवळ एका विशिष्ट घटकापुरते मर्यादित न राहता, अवतीभवतीच्या पर्यावरणाचे, शिक्षणव्यवस्थेचे आणि सत्तेच्या पटावर चाललेल्या छुप्या संघर्षाचे जे बारकाईने निरीक्षण लेखकाने नोंदवले आहे, ते मराठी समीक्षेच्या दृष्टीने अत्यंत मोलाचे आहे. मानवी वृत्ती आणि प्रवृत्तींचा हा मागोवा केवळ वरवरचा नसून, तो समाजाच्या सामूहिक मानसाचा तळ ढवळून काढणारा आहे. शापोआ; हे नाव वरकरणी मराठी शब्दकोशाच्या परिघाबाहेरचे आणि काहीसे अनोखे वाटते कारण पांढरपेशीय व्यवस्थेमध्ये मध्यमवर्ग समजला जाणारा वर्ग बहुतांश वेळेस सरकारी शाळापासून दूर असतो त्यामुळे त्यांना एखादेवेळी शालेय पोषण आहार ही योजनाच ठाऊक नसते.

लेखक भालेराव एका संपूर्ण व्यवस्थेचा रूपकात्मक कोंडमारा व्यक्त करतात. शासनाच्या योजना लोकाभिमुख आणि उत्तम हेतूने प्रेरित असल्या, तरी अंमलबजावणीच्या पातळीवर त्या कशा प्रकारे अनीतिमत्तेच्या गर्तेत ढकलल्या जातात, याचे मर्मभेदी चित्रण या कादंबरीत आले आहे. उत्तम योजनेची होणारी परवड आणि त्याभोवती विणले गेलेले दुष्टचक्र यावर लेखकाने झणझणीत प्रकाश टाकला आहे. हे करत असताना ही व्यवस्था राबवणाऱ्या सज्जन कर्मचाऱ्यांचे आणि त्याचवेळी स्वतःचा स्वार्थ साधणाऱ्या कर्मचाऱ्यांचे वेगवेगळे पैलू सुद्धा लेखकाने यात दाखवले आहेत. ग्रामपंचायतचे सदस्य फक्त मोठेपणा घेण्यासाठी आणि खुर्चीवर बसण्याचा मान मिळवण्यासाठी पदे अडवून बसले आहेत. यापासून रामभाऊ ढवळे यांच्यासारखे काही गब्बर कुटुंब पन्नास वर्षापासून गावाच्या कारभारी मंडळीमध्ये आपली सरंजामशाही चालवत आहेत. हे सुद्धा लेखकाने अधोरेखित केले आहे.

मुख्याध्यापक फुलझेले सातत्याने आदर्श पुरस्कारापासून कसे वंचित ठेवले जातात आणि त्याच वेळी अधिकाऱ्यांच्या पुढे पुढे करणारे त्यांच्याच शाळेतील कसा पुरस्कार मिळवतात? हे पाहिले तर लेखकाने आपल्या शैक्षणिक व्यवस्थेचा अगदी खोलवर जाऊन अभ्यास केला आहे असे लक्षात येते. दारू पिणाऱ्या शिक्षकांना व्यवस्थित मार्गदर्शन केले तरी शालेय वेळ संपल्यावर आपण त्यांचे मुख्याध्यापक नाही ही जाणीव ठेवणारे प्रसंगी शिक्षकांचा पगार आपल्याजवळ असताना चोरी गेला म्हणून कर्ज काढून लोकांचे पैसे फेडणारे आंबेडकरी विचारांचे फुलझेले गुरुजी अजूनही काही शाळांमध्ये आपल्याला दिसून येतात. मात्र, अशा लोकांपेक्षा ज्यांना वैचारिक बैठक नाही अशा लोकांची जातीय व्यवस्थेमुळे कशी वर्णी लावली जाते हे फार विदारकपणे लेखकाने मांडले आहे. शिक्षण सेवकाच्या तत्कालीन अडचणी बद्दलसुद्धा लेखक या कादंबरीत व्यक्त झालेले आहेत. शिक्षकांच्या गटसंमेलनामध्ये सर्वांच्या समोर पाठ घेण्याचा सभाधीटपणा सुद्धा अनेक शिक्षकांमध्ये नसतो इकडे सुद्धा लेखकाने लक्ष वेधले आहे.

एकं दरीत ही कादंबरी वाचत असताना आपण एका खेड्यातील जिल्हा परिषद अस्थापनेच्या शाळेचे घटक होऊन जातो इतकी सजीव जाणीव भालेरावांनी आपल्याला करून दिली आहे. शिक्षकांनी मुख्यालय राहावे अशी ओरड अनेक ठिकाणी होत असते. मात्र, बावशे गुरुजी यांना सात आठ दिवस गावात फिरून भाडेकरू म्हणून राहण्यासाठी खोली मिळत नाही. त्यामागचे कारण म्हणजे त्यांची जात होय. आजही ग्रामीण भागामध्ये जात पाहून तुम्हाला कितवर स्थान द्यायचे याचे समीकरण जुळवले जाते, हे विदारक सत्य लेखकाने आपल्या लेखणीतून मांडले आहे. राजकीय हस्तक्षेपात होणाऱ्या बदल्यांच्या बाबीची नोंद घेताना आजच्या काळात होणाऱ्या शिक्षकांच्या ऑनलाईन बदल्यापूर्वी मागास समाजातील शिक्षक बहुतांश वेळी आड वळणाच्या किंवा अडचणीच्या गावामध्ये नोकरी करत होते हे आपल्या लक्षात आल्याशिवाय राहत नाही. स्वतः अशिक्षित असूनही शिक्षकांची शिकवण्यावरून लायकी काढणारे काही महाभाग आजच्या काळात आपल्याला दिसतात लेखकाने तिकडेही आपले लक्ष वेधले आहे.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे शालेय पोषण आहार यामध्ये तांदळाच्या थैलांचे वाटप, विद्यार्थ्यांच्या हजेरीची सक्तीचा नियम, त्यात कुणाला कमी जास्त थैल्या मिळाल्या की, शिक्षकांवर होणारे दोषारोपण, वाहतुकीमुळे किंवा कंत्राटदाराच्या नियतीमुळे काही फुटलेल्या तांदळाच्या थैल्यामधून काही विद्यार्थ्यांना कमी धान्याचा पुरवठा होणे आणि त्यासाठी सुद्धा शिक्षकांना जबाबदार धरणे अशा अनेक बाबी लेखकाने अतिशय सूक्ष्म पणे टिपल्या आहेत. जेव्हा तांदूळ वाटपाऐवजी प्रत्यक्ष खिचडीचे वाटप सुरू झाल्यावर त्यात होणारी भेसळ, काही शिक्षकांनी तांदूळ परस्पर विकणे, अश्या बाबींसह मध्यंतरीच्या काळात शाळा बांधकामाच्या त्रस्ततेमुळे शिक्षकांनी केलेल्या आत्महत्या, माहिती अधिकारी कार्यकर्ते, पत्रकार, तथाकथित सामाजिक कार्यकर्ते, राजकीय दबाव, जातीय व्यवस्था अशा विविध पैलूंवर सुद्धा लेखक प्रखरपणे व्यक्त झाले आहेत. कादंबरीमध्ये ग्रामसंस्कृतीचे बदलते पदर आणि काही विशिष्ट जातींच्या लोकांची मोनोपॉलीसुद्धा दिसून येते.

आजवर आपण पाहिले आहे की, ग्रामीण कादंबरीने नेहमीच दोन परस्परविरोधी विचारप्रवाहांना सामावून घेतले आहे. एकीकडे म. गांधींचा; खेड्याकडे चला; हा सौंदर्यवादी आदर्शवादी दृष्टिकोन, तर दुसरीकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा; खेडी सोडा; हा खेड्यातील जीर्ण परंपरांवर आघात करणारा वास्तववादी विचार. शापोआ; कादंबरी या दोन्ही महापुरुषांच्या विचारांमधील द्वंद्वाचा पट अत्यंत चपखलपणे मांडते. गावातील भूखंड सवर्ण असणे आणि त्यासोबतच सत्तेची, वर्चस्वाची मानसिकता आजही कशी टिकून आहे, याचे प्रत्ययकारी रूप म्हणजे घनसाराम पाटील; ही व्यक्तिरेखा होय. घनसाराम पाटील कधीकाळी सरपंच होता, अख्खं गाव त्याने वेठीस धरलं होतं. जरी आरक्षणामुळे आज स्त्री सरपंच पदावर आली असली, तरी पाटलाचा जातीय ताठा आणि त्याची दहशत किंचितही कमी झालेली नाही. लोकांचा छळ करणे, सत्तेवर नसतानाही सत्तेची झूल पांघरून फिरणे हा त्याचा स्वभाव बदलत नाही.

प्रजासत्ताक दिनासारख्या पवित्र दिवशी, शाळेच्या मुख्याध्यापकांनी सुचवलेले देशहिताचे विचार नाकारून स्वतःचा अहंकार जपण्याचा पाटलाचा अट्टाहास, हा त्याच्या जातीवादाने बरबटलेल्या प्रवृत्तीचे निंद्य दर्शन घडवतो. शाळेवर आणि शिक्षकांवर स्वतःचे नियंत्रण ठेवण्याचा त्याचा हा आत्मघातकी विचार ग्रामव्यवस्थेच्या विदारक विद्रूपाचे प्रतीक आहे. कादंबरी केवळ व्यवस्थेतील सडकेपण दाखवून थांबत नाही, तर ती सर्व शिक्षा अभियानाच्या अंतर्गत शापोआचे कसे धिंडवडे काढले जातात, हेही उघड करते.

ध्येयशून्य आणि कर्तव्यविन्मुख शिक्षकांमुळे शालेय अनागोंदी कारभार कसा माजतो, यावर लेखकाने प्रखर प्रकाशझोत टाकला आहे. घनसारामसारखे विघ्नसंतोषी घटक शालेय व्यवस्थापन समितीच्या चांगल्या आदेशांना कसे सुरुंग लावतात, हे कादंबरी वाचताना मनाला प्रचंड वेदना देऊन जाते. परंतु, या काळ्याकुट्ट अंधारात लेखकाने काही ध्येयनिष्ठ आणि कर्तव्यदक्ष दीपस्तंभही उभे केले आहेत, ज्यामुळे कादंबरीला एकांगी स्वरूप येत नाही.

मराठा समाजातील लांडे गुरुजी; आंबेडकरी विचारांचे वाहक; बावशे गुरुजी; आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे परिवर्तनाचा ध्यास घेतलेला, आंबेडकर तत्त्वज्ञानाला शिरोधार्य मानणारा क्रांतिकारी तरुण कार्यकर्ता; फुलझेले;- या व्यक्तिरेखा गावातील सामाजिक समतोल राखण्याचा आणि व्यवस्थेला न जुमानता प्रतिकार करण्याचा यशस्वी प्रयत्न करतात. हा प्रतिकारच कादंबरीला एका नव्या उंचीवर नेऊन ठेवतो. थोडक्यात सांगायचे तर, शापोआ; ही कादंबरी केवळ एका शासकीय योजनेच्या भ्रष्टाचाराची कथा नाही, तर ती दुष्प्रवृत्तींवर प्रहार करून एक न्याय्य, समतावादी आणि सामंजस्यपूर्ण गाव निर्माण करण्याची आस बाळगणारी साहित्यकृती आहे.

अ. फ. भालेराव यांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून कादंबरीच्या क्षेत्रात अत्यंत सक्षमपणे आणि दमदारपणे पाऊल टाकले आहे. ग्रामीण आणि शैक्षणिक वास्तवाचा हा लेखाजोखा मराठी साहित्यात दीर्घकाळ आपली मोहोर उमटवून राहील, यात तीळमात्र शंका नाही. निशाणी डावा अंगठा या शालेय व्यवस्थेतील व्यंगावर बोट ठेवणाऱ्या उपहासात्मक विनोदी कादंबरी नंतर सरकारी अस्थापनेच्या शैक्षणिक विभागाचा किंवा शाळेचा मोठा अवकाश सूक्ष्मपणे टिपणारी, तसेच सुरुवातीपासून घेतलेली गंभीर लय कायम ठेवत शेवटपर्यंत खिळवून ठेवणारी कादंबरी म्हणून भालेराव यांच्या शापोआ या कादंबरीतची नोंद घ्यावी लागेल. डॉक्टर गंगाधर पानतावने यांच्या प्रस्तावनेने या कादंबरीची उंची आणखी वाढते तर अथर्व प्रकाशनच्या युवराज माळी यांनी घेतलेल्या मेहनतीने या कादंबरीला आकर्षक रूप प्राप्त झाले आहे. गंगाधर पानतावणे यांनी या कादंबरीला साहित्याच्या दृष्टिकोनातून पाहिले असले तरी माझ्यामते ही एक ग्रामीण आणि व्यवस्थेच्या अनागोंदीवर भाष्य करणारी सामाजिक कादंबरी आहे. कादंबरीचे मुखपृष्ठ विषयांवर नेमकेपणाने भाष्य करणारे आहे. कादंबरीत विविध विषयाचा आवाका फार मोठा असल्याने या कादंबरीत सलेली सलगता कायम ठेवणे हे फार मोठे आव्हान असते ते लेखकाने पेलून भरले आहे असे कादंबरी वाचत असताना आपल्याला जाणवते. संवादात्मक पातळीवर खानदेशातील बोलीभाषांचा वापर लेखकाने केलेला दिसून येतो त्या अनुषंगाने क्या बोलीभाषेत असलेले आणि इतरांच्यासाठी अपरिचित शब्द कादंबरीच्या शेवटी लेखकाने आहेत.

पोरकी पोरं

डॉ. तुषार सावरकर

# आरोग्य हा बालहक्क आहे का?

भारतातील बाल आरोग्य ही केवळ वैद्यकीय समस्या नाही; ती विषमतेची समस्या आहे. ग्रामीण भागातील आणि शहरी झोपडपट्ट्यांतील मुलांची परिस्थिती वेगळी आहे. आदिवासी, भटके- विमुक्त, स्थलांतरित, रस्त्यावर राहणारी, बांधकाम साईटवर वाढणारी, कचरा वेचणारी, बालगृहांमध्ये राहणारी आणि व्यसनाधीन किंवा मानसिक आजारग्रस्त पालकांची मुले यांना आरोग्य सेवांचा लाभ समान प्रमाणात मिळत नाही. आरोग्याचा हक्क कागदावर समान असला, तरी वास्तवात तो सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीनुसार बदलताना दिसतो.

एखाद्या मुलाच्या चेहऱ्यावरचं हसू, त्याची धावपळ, खेळण्याची उर्मी आणि शिकण्याची उत्सुकता ही केवळ त्याच्या बालपणाची चिन्हं नसतात; ती त्या समाजाच्या आरोग्याचीही साक्ष असतात. म्हणूनच कोणत्याही राष्ट्राच्या प्रगतीचं मोजमाप केवळ आर्थिक वाढीने किंवा उंच इमारतींनी होत नाही, तर त्या राष्ट्रातील मुलं किती निरोगी आहेत, यावरही होतं. परंतु आजही भारतात लाखो मुलांचं बालपण कुपोषण, रक्तक्षय, संसर्गजन्य आजार, अपुरी आरोग्यसेवा आणि मानसिक आरोग्याच्या दुर्लक्षाच्या सावटाखाली जात आहे. अशा परिस्थितीत एक मूलभूत प्रश्न उपस्थित होतो- आरोग्य हा खरोखरच बालहक्क आहे का की तो अजूनही केवळ धोरणांच्या आणि घोषणांच्या पातळीवरच मर्यादित आहे? आंतरराष्ट्रीय स्तरावर या प्रश्नाचं उत्तर स्पष्ट आहे. संयुक्त राष्ट्रांच्या बालहक्क करारातील कलम २४ प्रत्येक मुलाला शक्य तितक्या सर्वोच्च दर्जाच्या आरोग्यसेवा, पोषण आणि उपचाराचा अधिकार मान्य करतं.



भारताने १९९२ मध्ये या कराराला मान्यता दिली. म्हणजेच मुलांच्या आरोग्याकडे पाहणं ही केवळ कल्याणकारी जबाबदारी नसून आंतरराष्ट्रीय बांधिलकीही आहे. भारतीय संविधानात मआरोग्याचा हक्कफ असा स्वतंत्र उल्लेख नसला, तरी कलम २१ अंतर्गत सन्मानाने जगण्याच्या अधिकाराचा अर्थ सर्वोच्च न्यायालयाने व्यापकपणे मांडला असून त्यामध्ये आरोग्याचा अधिकार अभिन्न मानला आहे. कलम ३९ (ई) आणि (एफ) मुलांना शोषणापासून संरक्षण आणि त्यांच्या निरोगी विकासाची अपेक्षा व्यक्त करतात, तर कलम ४७ राज्यावर पोषण आणि सार्वजनिक आरोग्य सुधारण्याची जबाबदारी टाकते. म्हणजेच संविधानाच्या भावनेत मुलांचं आरोग्य हा मूलभूत प्रश्न आहे. मात्र, वास्तवात चित्र इतकं समाधानकारक नाही.

राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण ५, २०१९-२१ नुसार भारतातील ५ वर्षांखालील सुमारे ३५.५ टक्के मुले (खुंटलेल्या वाढीची) समस्या अनुभवत आहेत. याचा अर्थ त्यांची शारीरिक वाढ वयानुसार होत नाही. सुमारे १९.३ टक्के मुले तीव्र कुपोषणाशी संबंधित अति- कृशता या अवस्थेत आहेत, तर ३२.१ टक्के मुले कमी वजनाची आहेत. हे आकडे केवळ पोषणाच्या समस्येकडे निर्देश करत नाहीत, तर बालकांच्या बौद्धिक, भावनिक आणि सामाजिक विकासावर होणाऱ्या परिणामांचाही इशारा देतात. रक्तक्षयाचा प्रश्न तर अधिक गंभीर आहे. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण -५ नुसार सहा महिने ते पाच वर्षे वयोगटातील जवळपास ६७ टक्के मुले रक्तक्षयाने ग्रस्त आहेत. म्हणजेच प्रत्येक तीन मुलांपैकी दोन मुलं या समस्येला सामोरी जात आहेत. अशक्तपणा हा केवळ वैद्यकीय प्रश्न नाही; तो शिकण्याची क्षमता, एकाग्रता, प्रतिकारशक्ती आणि भविष्यातील उत्पादकतेवर परिणाम करणारा सामाजिक प्रश्न आहे.

बालमृत्यूच्या बाबतीत भारताने गेल्या काही दशकांत उल्लेखनीय प्रगती केली असली, तरी आव्हान पूर्णपणे संपलेलं नाही. सॅम्पल रजिस्ट्रेशन सिस्टिम २०२० नुसार भारतातील अर्भक मृत्युदर १,००० जिवंत जन्मांमागे २८ इतका आहे. पूर्वीच्या तुलनेत ही मोठी सुधारणा असली, तरी विकसित देशांच्या तुलनेत अजूनही हे प्रमाण चिंताजनक आहे. या मृत्यूंपैकी अनेक मृत्यू योग्य पोषण, लसीकरण, स्वच्छता आणि वेळेवर उपचार उपलब्ध झाल्यास टाळता येऊ शकतात. अर्थात, केवळ नकारात्मक चित्र रंगवणं योग्य ठरणार नाही. सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम, मिशन इंद्रधनुष्य, पोषण अभियान, जननी सुरक्षा योजना आणि अंगणवाडी सेवांमुळे बाल आरोग्यात अनेक सकारात्मक बदल झाले आहेत. पोलिओमुक्त भारत ही सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेच्या इतिहासातील एक महत्त्वाची उपलब्धी मानली जाते. नवजात मृत्युदरात घट झाली आहे आणि लसीकरणाचं प्रमाणही वाढलं आहे. परंतु प्रश्न असा आहे की, या प्रगतीचा लाभ सर्व मुलांपर्यंत समान प्रमाणात पोहोचला आहे का? या प्रश्नाचं उत्तर दुर्दैवाने नकारार्थी आहे.

भारतातील बाल आरोग्य ही केवळ वैद्यकीय समस्या नाही; ती विषमतेची समस्या आहे. ग्रामीण भागातील आणि शहरी झोपडपट्ट्यांतील मुलांची परिस्थिती वेगळी आहे. आदिवासी, भटके-विमुक्त, स्थलांतरित, रस्त्यावर राहणारी, बांधकाम साईटवर वाढणारी, कचरा वेचणारी, बालगृहांमध्ये राहणारी आणि व्यसनाधीन किंवा मानसिक आजारग्रस्त पालकांची मुले यांना आरोग्य सेवांचा लाभ समान प्रमाणात मिळत नाही. आरोग्याचा हक्क कागदावर समान असला, तरी वास्तवात तो सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीनुसार बदलताना दिसतो.

विशेष गरजा असलेल्या मुलांच्या बाबतीतही अनेक प्रश्न आहेत. अपंग मुलांना पुनर्वसन सेवा, सहाय्यक साधने आणि उपचार सहज उपलब्ध होत नाहीत. ग्रामीण भागात बाल मानसोपचार सेवा अत्यंत मर्यादित आहेत. परिणामी अनेक मुलांचे विकासात्मक आणि मानसिक आरोग्याचे प्रश्न उशिरा लक्षात येतात. मानसिक आरोग्य हा तर बालहक्कांच्या चर्चेतील दुर्लक्षित विषय आहे. स्पर्धा, ताण, कौटुंबिक संघर्ष, सोशल मीडियाचा प्रभाव, शैक्षणिक दडपण आणि बदलती जीवनशैली यामुळे मुलांमधील मानसिक आरोग्याच्या समस्या वाढताना दिसत आहेत. परंतु आजही मानसिक आरोग्याकडे मवर्तनाचा प्रश्नफ किंवा महट्टफ म्हणून पाहण्याची प्रवृत्ती मोठ्या प्रमाणात आहे. (पान ६ वर)

कथा

प्रमोद रोहणकर


# कुंकू

ती दररोज सायंकाळी समुद्रावर जायची. तिथल्या वाळूत बसायची. समोर अथांग पाण्याने भरलेला समुद्र, त्यावर येणाऱ्या लाटा. ती लाटेकडे एकटक पाहायची. थोड्या अंतरावर मासेमारी करणाऱ्या नावा दिसायच्या. अशाच नावेत तिचा दादला महादू मासेमारी करत बसला होता. अचानक सागरी तुफान आलं. त्या तुफानात महादूची नाव उलटली. महादू समुद्राच्या लाटेत गटांगळ्या खाऊ लागला... वाळूत बसून ती अशीच पाहत होती. अखेर रिकामी नाव किनाऱ्याला लागली, पण त्यात महादूचा पत्ता नव्हता.

पारू वहिनी, महादूचा पत्ता लागेना गेलो.

नाऽऽ ही. माझा धनी नक्कीच परत येईन

एक तास शोधलं आमी त्याला; पण तो कोठेच दिसेना. दिसल. एक दिवस, माझा धनी दिसल. खात्री आहे मला... आज २० वर्षे उलटून गेली, पण महादू दिसला नाही. घरी अजित नावाचा मुलगा आणि मेघा नावाची मुलगी. दोघा पोरांना लहानाचं मोठं करण्यात पारूंच अख्खं आयुष्य गेलं. तिचे काळेशार केस आता पांढरे झाले होते. चंद्रमुखी चेहऱ्यावर सुरकुत्या पडल्या होत्या. तिनं पाहिलं...



कपाळावरचं कुंकू पुसट झालं होतं. तिनं पुन्हा कुंकवाचा करंडा घेतला. कपाळावर ठसठशीत कुंकू लावलं. मेघा हे पाहात होती.

काय पाहतेस? मेघा काही बोलली नाही.

तुझे बाबा गेल्यावरही मी कुंकू लावतेय. स्वतःला विधवा समजत नाही. असं, तुझ्या मनात प्रश्न येतो ना...मेघा पुन्हा अबोल. पण, तुला सांगतेय, तुझे बाबा एक दिवस निश्चित येतील. खात्री आहे माझी. मन ग्वाही देतं माझं ते येतील. म्हणूनच मी त्यांच्या नावाचं कुंकू लावतेय. हे मेघानं ऐकलं आणि ती बाहेर आली. समुद्राकडे नजर टाकली. ती पळतच घरात आली.

आईऽऽऽ, काय गं? आपली नाव आली. नाव आली?

दोघी मायलेकी समुद्रावर आलीत. सूर्यास्ताची वेळ. समुद्राच्या वरच्या थरावर सोनेरी मुलामा दिलेला दिसत होता. नाव काठाला लागली. एका तरुणानं जाळं आणि मासोळीचं भलं मोठं टोपलं बाहेर काढलं.

आई... हे मासोळ्या घे...

आणि जाळं!

दादा, जाळं दे माझ्याजवळ

आज उशीर केलास?

हो, आज समुद्र शांत होता. म्हणून मासोळ्याही भरपूर लागल्यात. पण आम्ही किती वाट पाहायची? एका माणसाशी गट्टी- फू केली पाहिजे. एक काळी सावळी तरुणी अजितजवळ आली. पारू तिला पाहू लागली.

ही सारजा... शंकर कोळ्याची थोरली मुलगी. शंकर कोळी?

म्हणजे मारोती मंदिराजवळचा.

व्हय... त्याची पोरं.

छान!

गुदस्ता मॅट्रिक शिकलो सारजा.

छान आहे!

मी येऊ तुमच्या घरी?

अगं, मीच तुला घरी चल म्हणत होते. आणि सगळी मंडळी घरी आली.

मेघा, अगं, सारजा पयल्यांदा घरी आली. तिला चहा तरी दे. नको. सारजा म्हणाली.

अगं, नको काय म्हणतेस? अजित नाही का आताच समुद्रातून आलाय. थंडीनं तोही कुडकुडलाय. त्यालाही हवाय चहा. चहा घेता घेता अजितनं विषय छेडला.

आई, सारजा अन् मी एकाच शाळेत शिकत होतो. तेव्हापासून आम्ही एकमेकांना ओळखतो.

नुसता ओळखतो नाही.. मेघा मध्येच म्हणाली,

यांचं प्रेम जुळलं गं आई आणि आता लगीन करणार आहेत. काय सांगतेस? विचार दादालाच.

सूनबाई म्हणून मला चालेल सारजा!

पण आई, तिच्या वडिलांची एक अट आहे.

अट? ती कसली रे?

त्यांना मी घरजावई म्हणून हवा आहे.

घरजावई? नाही नाही, ही अट मला मान्य नाही. घरात क्षणभर शांतता पसरली. मग, पारू म्हणाली,

सारजा माझं ऐक, माझ्या धन्याच्या मागं मी या दोन लेकरांना लहानाचं मोठं केलं. कशासाठी, म्हातारपणी आपल्याला आधार द्यावा. त्यातली मेघा- आज ना उद्या लग्न होऊन तिच्या घरी चालली जाईन. राहील फक्त अजित आणि मी. अशा परिस्थितीत तू सारजा घरजावई म्हणून अजितला घेऊन गेलीस तर मला कुणाचा आधार आहे?

नाही आई, त्यात काय आहे. माझ्या घरी कर्ता माणूस कोणी नाही. वडील थकलेत. त्यांना समुद्रावर जाणं जमेना आता. घरी आम्ही चार बहिणी. भाऊ नाही म्हणून बाबांची अट आहे की, सारजाला असा नवरा करून देऊ की, तो घरजावई म्हणून राहायला तयार होईल. पण माझं कसं? हा तुमचा प्रश्न आहे. अजित, तुमचं तुम्ही बघा. यापुढे समुद्रावर भेटायला येणार नाही, हे लक्षात ठेव!

अगं सारजा... पण, ती थांबली नाही. अजित बाहेर आला.

सारजाऽऽ तिनं मागे वळूनही पाहिलं नाही.

त्या रात्री पारूला रात्रभर झोप लागली नाही. ती विचार करीत होती. आपल्या स्वार्थासाठी अजितला

कां बरं घरजावई होऊ द्यायचं नाही. त्याचं सुख ते आपलं सुख! मेघा नवऱ्या घरी गेल्यानंतर आपणच आपला स्वयंपाक करायचा. झाडझुड करायची. दिवा लावून, गोधडी अंथरूण झोपायचं. जिवात जीव असेपर्यंत आपण हे करायचं. काही दुखलं खुपलं तर शेजारी आहेतच मदत करायला. दुसरे दिवशी अजित नेहमीप्रमाणे समुद्रावर गेला. इकडे मेघा आणि सारजाच्या घरी गेली.

शंकर टीबी होऊन अंथरुणाला खिळून बसला होता. बायको चहा करीत होती. सारजा काहीतरी विणत बसली होती. तिघी बहिणी शाळेत गेल्या असाव्यात.

(पान ६ वर)

# मध्ययुगातील अरबी प्रवासी

वळणावरच्या नोंदी
स्वाती काळे

रूरुनीसारख्या इतरही अरबी प्रवाश्यांनी आठव्या शतकापासून भारतात येऊन प्रवास वर्णने लिहिली आहेत. अगदी सुरुवातीचा मध्ययुगीन भारत समजण्यास त्यामुळे मदत होते. खासकरून नवव्या आणि दहाव्या शतकात भारतात आलेले व्यापारी सुलेमान, मसुदीसारख्यांनी भारताचे बारकाईने निरीक्षण केले. अबु झईद आणि अल् इद्रिसी यांची वर्णने वाचकांना खिळवून ठेवतात. पण या दोघांनी इतर व्यापाऱ्यांच्या गोष्टी ऐकून भारताबद्दल आपली मते बनवली. काहीही असो, पण या अरब व्यापाऱ्यांची वर्णने वाचून सुरुवातीचा मध्ययुगीन भारत कसा होता, याचे चित्र डोळ्यासमोर उभे राहते.

सुलेमान व्यापारी त्याच्या व्यापाराच्या निमित्ताने चीन आणि भारतात अनेकदा आला. गुर्जर प्रतिहार आणि राष्ट्रकुटाच्या अमोघवर्षाचे रसभरीत वर्णन त्याने केले आहे. अमोघवर्षाचे राष्ट्रकूट राज्य जगातील सगळ्यात संपन्न राज्यांपैकी एक आहे, असे तो म्हणतो. त्याचा ग्रंथ सिल्सिलातत तवारीख नवव्या शतकाच्या मध्यावरच पूर्ण झाला. सुलेमानने भारतातील ज्या राज्यांचे वर्णन केलेले आहे. त्या राज्यांची नावे ओळखू येणे कठीण आहे. उदाहरणार्थ, त्याने तफक या राज्याचा उल्लेख केलेला आहे. काही संशोधकांना हे नाव औरंगाबादचे वाटले, पण इतिहास संशोधक सी. व्ही. वैद्य यांनी पंजाबचे जालंधर म्हणजेच तफक हा निष्कर्ष काढलेला आहे. सुलेमान म्हणतो, या राज्याचा राजा शांततेत जीवन जगतो. येथील सैन्य कमी आहे. स्त्रिया सुंदर आणि गोऱ्यापान आहेत. ईबन खुर्दादबा हा त्याकाळचा गाजलेला भूगोलशास्त्रज्ञ होता. त्याचे पूर्वज अग्निपूजक होते, पण कालांतराने त्यांनी मुस्लिम धर्म स्वीकारला. अनेक मोठमोठ्या खलिफांकडे काम करूनही ईबनने आपली भूगोलशास्त्राची आवड जोपासली. त्याचा म रस्ते आणि राज्येफ हा ग्रंथ मध्ययुगीन इतिहासाचे महत्त्वाचे साधन समजले जाते. मकिताबुल मसालिक वा अल् ममलिकफ या त्याच्या ग्रंथात भारताच्या राष्ट्रकूट राज्याविषयी माहिती मिळते. त्याच्या मते भारतामध्ये एकूण ४२ धर्म आहेत. सात वर्ण आहेत. राष्ट्रकूट राजा भारतातील सर्वश्रेष्ठ राजा आहे. त्याच्या अंगठीत त्याने एक वाक्य कोरलेले आहे, मसुरुवातीलाच निश्चय केला तर शेवटी यश मिळतेच.

एक लक्षात ठेवण्यासारखा महत्त्वाचा अरब प्रवासी म्हणजे अल मसुदी! त्याने ममुरुजु-इ- झहाबफ हा ग्रंथ १० व्या शतकाच्या मध्यावर लिहिला. इ. स. ९५६ ला तो इजिप्तमध्ये मरण पावला, पण त्याआधी त्याने भारतात दोन वर्षे मुक्काम केला होता. तर्कशुद्ध आणि वास्तवाला धरून केलेले त्याचे लेखन भारतीय इतिहासाला संदर्भ मिळवून देते. ब्रह्मदेवापासून ते राष्ट्रकूट राजापर्यंत त्याने आपल्या लेखणीतून भारतीय राजांचे बहारदार वर्णन केलेले आहे. अबु ईशाक अल इस्तखी या इ. स. ९५१ मध्ये जन्मलेल्या अरबी माणसाने मकितबु- इ- अकलीम् नावाचा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात भारताच्या महत्त्वाच्या शहरांची रसाळ वर्णने केली आहेत. अशा अनेक अरब प्रवाशांनी मध्ययुगीन भारतीय इतिहासाला ओळख दिली. ईबन हाऊकेल, रशीदु-द-दीन या अरब प्रवाशांच्या लेखणीने भारताच्या मध्ययुगीन इतिहास पर्वाची कोवळी किरणे चारी दिशांना प्रसविली. या सर्व अरबी प्रवाशांनी भारताच्या वर्णव्यवस्थेचे इत्थंभूत वर्णन केले आहे. खाण्यापिण्याच्या सवयींचे बारकाईने निरीक्षण केले आहे. अल् मसुदी म्हणतो, मदिरा सेवनाबद्दल त्यांचा धर्म त्यांना अडवित नाही, पण राजा न्यायदान करताना मद्यधुंद अवस्थेत सापडला तर त्याला पायउतार व्हावे लागते. भारतीय समाजात नैतिकतेला महत्त्व होते. पण योग्य प्रमाणात मदिरेचा आस्वाद घेण्याबाबत आडकाठी नव्हती. सुलेमान म्हणतो की, जंगलात आणि डोंगरांमध्ये राहणारे योगी अनेक दिवस फळांवर जगू शकतात. ईबन हौकल म्हणतो, येथला ऊस गोड लागतो. अंबज म्हणजे आंबा येथे पिकतो. भारतात नारळ, लिंबू, मध आणि तांदूळ याचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. अन्नधान्य, फळे मोठ्या प्रमाणात आणि स्वस्तही असल्यामुळे भारतीय लोक समृद्ध आहेत. ईबन मसा हा १० व्या शतकातला भारतातील मुसाफिर सांगतो, गुजरातमध्ये मुख्य अन्न म्हणून भात आणि गाईचे दूध दिले जाते. हे अतिशय पौष्टिक अन्न समजले जाते. मुस्लिम आक्रमणाच्या प्रभावामुळे येथील पोशाख आणि राहणीमान बदलत गेले असे अरबी प्रवाशांचे निरीक्षण आहे. गळाबंद अंगरखा आणि आखूड विजार हा मुस्लिमांचा पोशाख भारतीयांनी अंगीकारला, असे ईबन हौकलने लिहिले आहे. पण प्रसिद्ध संशोधक मुजुमदार यांनी चंद्रगुप्त (एक) च्या काळात सापडलेल्या नाण्याचा दाखला देत म्हटले आहे की, हाच पोशाख मुस्लिम आक्रमणाच्या अगोदरही लोक परिधान करायचे. प्रामुख्याने दख्खन आणि पंजाबमध्ये लोक नेहमी धोतरच नेसायचे.

मध्ययुगीन अरब प्रवासी भारतीय स्त्री-पुरुषांच्या दागिन्यांनी भारावून गेले होते. सुलेमान प्रवासी आणि अबु जहीद यांनी सोन्याचे हातकडे, मौल्यवान माणिकपाचूंचे वर्णन केले आहे. हिरवेलाल पाचूरने आणि पांढऱ्याशुभ्र मोत्यांच्या सरींचे अरबी प्रवाशांना कौतुक होते. अल उत्बी तारीख-इ- यामिनीफ म्हणतो, जयपालाकडे असलेली रत्नमाणकांची माळ इस्लाम आक्रमणाच्या वेळी त्याच्या गळ्यातून खेचण्यात आली. त्याच्या नातेवाईकांचेही मौल्यवान हार असेच खेचण्यात आले. त्यांना मारण्यात आले किंवा तुरुंगात डांबण्यात आले. स्वतः मोहम्मद गझनीने १६ मौल्यवान हार पराजित सरदारांच्या गळ्यातून काढून घेतले. सती जाण्याच्या प्रथेबाबत जवळपास सर्वच प्रवासी सांगतात, पण काही अरब प्रवाशांनी सांगितले आहे की, राजघराण्यातील पुरुष नोकरही राजाच्या चितेबरोबर जाण्याची रीत होती. अबु झैदने एका वेगळ्याच रितीचे वर्णन केले आहे. जेव्हा राजा सिंहासनावर आरूढ होतो तेव्हा केळीच्या पानावर शिजवलेला भात वाढला जातो. राजाने घास घेतल्यावर त्याचे ३००-४०० साथीदार हा शिजवलेला भात खातात. पण भात खाल्ल्यावर त्यांचे कर्तव्य असते की, जेव्हा राजाच्या चितेला अग्नी दिला जाईल. त्यावेळी त्याचे हे सर्व साथीदार आगीत उडी घेतील. अबू झैद, त्याच काळातला एक प्रसिद्ध अरब प्रवासी म्हणतो, बहुतकरून भारतातील सर्व राजे आपल्या स्त्रियांना दरबारात मोकळेपणाने बसू देत. उत्तर भारतात जेथे सर्वाधिक मुस्लिम आक्रमणे झाली तेथेही पडदा पद्धती ही ऐच्छिक गोष्ट होती. प्राचीन काळातही भारतात स्त्रियांसाठी पडदा पद्धती ऐच्छिक होती. काही भागात स्त्रिया स्वेच्छेने घुंघट घेत. त्यात स्त्रियांचे संपूर्ण विभागीकरण अपेक्षित नव्हते. प्रसिद्ध संशोधक आळतेकर यांच्यानुसार कोणत्याही प्राचीन ग्रंथामध्ये स्त्रियांसाठी पडदा पद्धती अस्तित्वात असण्याचे पुरावे दिसत नाहीत. सातव्या शतकातील चिनी प्रवासी युआन वांगनुसार हर्षाची विधवा बहीण राज्यश्री त्याच्या



पडद्याशिवायच असायची. राजतरंगिणीसारख्या ऐतिहासिक ग्रंथात, मालती माधव, कादंबरी, शकुंतलासारख्या तत्कालीन संस्कृत साहित्यात कुठेही पडदा पद्धतीचा उल्लेख नाही. मुलींना मुलांच्या बरोबरीने शिक्षण दिले जायचे.

चचनामा या फारसी ग्रंथामध्ये सिंध प्रांतावर केलेल्या पहिल्या इस्लामिक विजयासंबंधी लिहिले आहे. सिंध राजा दहीरला वीरगती प्राप्त झाल्यावर राणीबाईने इ. स. ७१२ मध्ये आपल्या सैन्यासह मोहम्मद बिन कासिमला जबरदस्त शह दिला. इ. स. ११७८ मध्ये शहाबुद्दीनच्या विरुद्ध नाइकीदेवीने आपला मुलगा मूलराजाला मांडीवर घेऊन इस्लामी फौजेशी प्राणपणाने लढा दिला. चंडेलाच्या राण्यांनी सार्वजनिक कार्यात नेहमीच सक्रिय भाग घेतला. मुस्लिम आक्रमणानंतर परिस्थिती बदलली.

अल इद्रिसी म्हणतो, भारतीय लोक तिन्हाईतांबरोबर चांगले वागतात. त्यांना प्राण्यांबद्दल करुणा आहे. विशेषकरून बैलांना ते मान देतात. म भारतीय राजे इतर धर्मांच्या बाबतीत सर्वसमावेशक आहेत. श्रीमंत भारतीय व्यापारीदेखील मशिदी बांधायला मदत करतात.फ अर्जुनदेवाच्या वेरावळ येथील शिलालेखात भारतीय राजाने मशीद बांधण्याचे उल्लेख आहेत. अरबी प्रवाशांच्या वर्णनातून अधोरेखित होते की, कोणत्याही धर्माच्या आड भारतीय समाज कधीच आला नाही. आक्रमणांनी विव्हळ झालेल्या मध्ययुगातदेखील नाही.

# सौजन्याचा धक्का

आनंद स्पंदन
डॉ. अविनाश मोहरील

वेवेगवेगळ्या कामाच्या ठिकाणी आपल्याला जावे लागते. बँका, पोस्ट ऑफिस, दुकाने, मॉल्स, तहसील कार्यालये, शाळा किंवा महाविद्यालये अशा प्रकारच्या विविध व्यवस्थांमधून आपल्याला आपल्या अनेक बाबींची पूर्तता करण्यासाठी जावे लागते. मला व्यक्तिशः असे वाटते की, ही सर्व कार्यालये वेगवेगळी असली, तरी अशा सर्व कार्यालयांमधून सारखीच मंडळी काम करतात. काचेच्या पलीकडची व्यक्ती ही एका अत्यंत खास पठडीतील व एकाच ठेवणीतील असल्यागत आपल्याला भेटत असते.

वेगवेगळ्या प्रकारच्या लोकांना त्यांच्या वेगवेगळ्या वागण्याच्या छटांसोबत भेटावे लागते व त्यांचे समाधान होईपर्यंत संयम ठेवावा लागतो. या संयमाच्या परीक्षेमध्ये व्यक्तिपरत्वे कुणी पास होते, कुणी नापास! असे असले तरी कधी



कधी आपल्याला फारच सौजन्य दाखविणारे कुणी काचेच्या पलीकडे भेटले की आपल्याला आनंद होतो व कधी कधी तर या सौजन्याचा धक्का बसतो. वर वर्णन केलेल्या विविध संस्थांमध्ये किंवा कार्यालयांमध्ये आपल्याला एखादीच व्यक्ती चांगली लक्षात राहते; किंबहुना ती व्यक्ती त्या संस्थेच्या वा कार्यालयाच्या सबंध वर्तुळामध्ये आधार वाटते. अशी व्यक्ती काचेच्या पलीकडे भेटली की आपल्याला फारच आनंद होतो. असाच आनंद मला नुकताच सोलापूर प्रवासात आला व मी त्या व्यक्तीच्या सौजन्यपूर्ण व्यवहाराने फारच सुखावून गेलो.

सोलापूरला माझ्या गाडीने जात असताना एका टोल नाक्याजवळ थांबलो होतो. का कुणास ठाऊक, पण त्या दिवशी फारच गर्दी होती. टोल नाका पार करण्यासाठी बराच वेळ लागला. लोक मोठमोठ्याने हॉर्न्स वाजवित होते. माझा नंबर आला तेव्हा तो फास्ट टॅग लवकर स्कॅन होईना. मी त्या काचेच्या आत असलेल्या मुलास त्रासिकपणे किती वेळ लागतोय, असे विचारण्याआधी आधी त्याने मला काय म्हणावे- साहेब आज फारच गर्दी आहे. शिवाय सिस्टिम जरा स्लो आहे. तुम्हाला त्रास झाला. सॉरी. मी उडालोच. एरवी अत्यंत यांत्रिकपणे संगणकावरील बटन दाबणे व गेट उघडणे ही प्रक्रिया करणारा मुलगा हे असे काही बोलेल ही अपेक्षाच नव्हती. मी काहीही उत्तर देऊ शकलो नाही. त्याला मी येण्याजाण्याचे किती पैसे पडतात ते विचारले. मला उत्तर दिल्यावर त्याने गेट उघडले व नंतर तो परत एक वाक्य उच्चारला. सर, हॅपी जर्नी, सावकाश जा आणि सावकाश या सर! आता मात्र हद्द झाली होती. मी त्याला त्याचे नाव विचारले आणि त्याने दाखविलेल्या सौजन्याबद्दल आभार मानले. सायंकाळी तुला नक्की भेटतो असेही म्हटले. त्याचा हसरा बाय स्वीकारून मी पुढच्या प्रवासाला निघालो. घटना छोटीशी होती, पण अनपेक्षित व क्वचित घडणारी होती. त्यामुळे तो मुलगा माझ्या बराच वेळ स्मरणात राहिला. मी एकटाच गाडी चालवित होतो; मन मात्र त्याच्या त्या वाक्यांमध्येच गुंतले होते. टोलनाक्यावर काम करणारा एक साधा मुलगा अत्यंत यांत्रिक काम करीत असताना त्या कार्यास माणूसपणाचा आयाम देऊन त्याचे कार्य किती छान पद्धतीने व आनंद घेत करीत होता, याचे फारच कौतुक वाटले. खरे तर त्याच्या या कामामध्ये त्याच्या सौजन्यशीलतेमुळे काहीही फारक पडणार नव्हता. त्याच्या त्या गोड बोलण्यामुळे त्याचा सेल वाढणार नव्हता की ग्राहक जोडला जाणार नव्हता. त्याच्या पगारातही काहीच फरक पडणार नव्हता. त्याच्या दोन हसून उच्चारलेल्या वाक्यांमुळे मला तो मुलगा अजूनही लक्षात आहे आणि एका चांगल्या मनाच्या माणसाला भेटल्याचा मला अतिशय आनंद झाला होता; जो मी अद्यापही विसरू शकलो नाही. यावरून आपल्याही मनात वेगवेगळ्या कार्यालयातील आपल्याला असाच सौजन्यपूर्ण अनुभव देणारे मोजके पण छान लोक आठवले असणार. असे लोक काचेच्या पलीकडे जरी असले, तरीही त्या काचेला लांघून अलिकडे उभ्या असलेल्या माणसाच्या मनाला आनंद देण्याची क्षमता त्यांच्यामध्ये असते. हे लोक आपले कार्य अक्षरशः एन्जॉय करतात आणि काचेच्या पलीकडच्या लोकांना आपलेसे करतात. मला तर असेही लोक माहीत आहेत की, कार्यालयामधील एखाद्या अशाच मनमिळाऊ व्यक्तीच्याच हाताने आपले काम व्हावे, असा आग्रह धरतात.

ती व्यक्ती जर रजेवर असेल तर त्या दिवशी ते त्या कार्यालयातील काम करीत नाही. कारण त्यांना आपले काम ती व्यक्तीच चांगले करेल, असा विश्वास वाटत असतो. खरे बघितल्यास ही व्यक्ती नवे किंवा वेगळे काहीही करीत नसते.

(पान ६ वर)

# ही सारीच पसायदाने

विवेचन
श्रीरंग श्री. हिर्लेकर

पपसायदान म्हणताच चार महिने चाललेल्या वाक्यज्ञाच्या समाप्तीनंतर माउलींनी विश्वात्मक देवाजवळ केलेली मागणी उपनिषदातील शुभकामना, रुद्रसूक्ताच्या चमक विभागातील अमूक दे, तमूक दे अशा असंख्य मागण्या असोत, विष्णुसहस्रनामाच्या शेवटचे श्लोक ही फलश्रुती असूनही त्यातील उदात्त भाव, संस्कृत साहित्यातील कवींच्या मंगलकामना, शुभचिंतन, नाटकांच्या नांदी, मंगलाचरण, भरतवाक्ये, आचार्य विनोबांच्या भूदान यज्ञातील आवाहने ही सर्व पसायदानेच आहेत.

**यज्ञशिष्टाशिनः सन्तो मुच्यन्ते सर्वकिल्बिषैः।**
**भुंजते ते त्वघं पापा ये पचन्त्यात्मकारणात्।।**

गीता ३.१३ म्हणजे यज्ञ करून मग यज्ञशिष्ट ग्रहण करतात ते सर्व पापांपासून मुक्त होतात. जे फक्त उपभोग घेतात ते पापाचेच धनी होतात. भगवंत पुढे असेही सांगतात-

**मतैर्दत्तानप्रदायैभ्यो यो भुङ्क्ते स्तेन एव च।**

नियत कर्म न करता जो भोगतो तो चोर आहे. गीतेला प्रथम अर्पण (यज्ञ), त्याग आणि त्यानंतर प्रसादसेवन हाच क्रम अभिप्रेत आहे. याप्रमाणे पायसाची- पसायदानाची अपेक्षा असावी आणि ही सुद्धा स्वतःसाठी नाही तर समष्टीच्या समाजाच्या कल्याणासाठी.

**निःस्पृह ऋषींचे यज्ञ कोणते?**

त्यांचे यज्ञ म्हणजे अग्निकुंडाभोवती बसून हवींच्या आहुती टाकणे नसून वैराग्याच्या धगधगीत अग्नीत वैयक्तिक सुखांच्या आहुती देत, आयुष्यभर विश्वव्यवस्थेच्या पोषणा विविध प्रकारे कार्य करणे. भगवद्गीतेला असाच यज्ञ अभिप्रेत आहे. त्यामुळे अशा यज्ञांच्या अंती दान मागणे हा याचकाचा हक्क आणि दात्याचे उत्तरदायित्व याच अर्थाने विनोबांनी दान म्हणजे भिक्षा नसून मदानं संविभागः अशी व्याख्या मांडली.

ऋषींच्या मंगलकामना या लोकोद्धार आणि विश्वमांगल्यासाठी असतात. त्यामुळे ज्या लोकविलक्षण प्रसादाची कामना ज्या शब्दात ते करतात त्या शब्दांची पसायदाने होतात.

उदाः १) वेदातील **आनो भद्रा क्रतवो यन्तु विश्वत।** विश्वातील सर्व मंगल आम्हाला प्राप्त होवो आणि नंतरचा शांतिपाठ-
**मद्यौः**
**शान्तिरन्तरिक्षं**
**शांतिः, सर्वे भवन्तु सुखीनः सर्वे सन्तु निरामयाः।**
सर्वत्र शुभ-मंगल असो, सौख्य नांदो.



२) न्यायी राजा आणि सुखी राष्ट्राची व्याख्या करताना ऋषी मागतात-
**मस्वस्ति प्रजाभ्यः परिपालयन्तां। न्यायेन मार्गेण महीं महीशाः। गोब्राह्मणेभ्यः शुभमस्तु नित्यं। लोकाः समस्ता सुखिनो भवन्तु।**

३) आणि मग ते राष्ट्र कसे असावे, तर **काले वर्षतु पर्जन्यः पृथिवी सस्यशालिनी। देशोयं क्षोभरहितः ब्राह्मणाः सन्तु निर्भयाः। किंवा समर्थांना** अपेक्षित असे आनंदवनभुवन.

४) अथर्ववेदातील **जीवेत् शरदः शतम् पश्येम शरदः शतम्** शरद म्हणजे प्रसन्न, टवटवीत असे सर्व आम्हाला दीर्घकाळ लाभो.

५) **पुराणांच्या इदं पुण्यं.. सर्व पापप्रणाशनम्, श्रेयः, आयुः, आरोग्य, पुत्र, धन, मोक्ष** अशा अर्थाच्या फलश्रुती.

६) भारतीय तेजोपासक आहेत. ऋषी सूर्याची, प्रकाशाची, तेजाची उपासना करताना म्हणतात- असतो **मा सद्गमय, तमसो ज्योतिर्गमय मृत्योर्माऽमृतं गमय।** आयुष्यातील सर्व प्रकारच्या अनिष्टांचा नाश होवो, सर्व ऋतांचा- शुभगोष्टींचा लाभ होऊन आमचे जीवन चैतन्याने अमृतमय होवो.

७) महात्माजींची तीन माकडे कानाडोळ्यांवर हात ठेवून उपनिषदातील तोच संदेश देतात- **भद्रं कर्णे भि श्रुणुयाम देवा । भद्रं पश्येमा..** सर्वत्र शुभ दिसो, शुभ ऐकू येवो, आमची बुद्धी स्थिर राहो, वाणी नेहमी मंगलगानच करो, आमच्या हातून नेहमी सत्कार्यच घडो. मोरोपंतही म्हणतात- **सुसंगती सदा घडो सुजन वाक्य कानी पडो।** कलंक मतीचा झडो..

८) ऋषी समाजवादही सांगतात **सह ना ववतु सह ना बबतु सहनौ भन्क्तु सहवीर्यकरवावहै...**

आम्ही सर्व मिळून काम करू, बरोबरीने राहू, प्रगतीच्या मार्गाने जात एकमेकांचा उद्धार करू.

९) दान, समता, सर्वोदय आणि विश्वबंधुत्व या चतुःसूत्रीवर आधारित गांधींची सर्वोदयाची आकांक्षा किंवा आधुनिक ऋषी विनोबांची भूदान यज्ञानंतर जय जगत शब्दातील विश्वाच्या कल्याणाची कामना ही सर्व पसायदानेच नव्हेत का? समाजवादाचे असे आदर्श अभावानेच आढळतात.

वरीलप्रमाणे वेद आणि उपनिषदातील शेकडो उदाहरणे देता येतील. मंत्रपुष्पांजली ही या अर्थाने पसायदान नाही. पण त्यापूर्वीच्या मंत्रात **आ ब्रह्मन् ब्राह्मणो बह्मवर्चसी जायताम्, राष्ट्रे राजन्य शरः निकाम निकाम नः**

**पर्जन्यो वर्षतु.. योगक्षेमो नः कल्पताम्फ**म्हणजे व्यक्तीच नव्हे तर राष्ट्र, राज्य, समाज, पशुधन, पर्जन्य, अन्नसमृद्धी, विद्वान, शूरवीर, वंश अशा सर्वांच्या सर्वांगीण उन्नती व कल्याणाची मागणी आहे. अनेकदा कीर्तन आणि प्रवचनाच्या समारोपात कीर्तनकार धर्म की जय हो, अधर्म का नाश हो, प्राणियोमें सद्भाव हो, विश्व का कल्याण हो, गोहत्या बंद हो असे पसायदान मागतात.

ऋषींच्या, विचारवंतांच्या या मागण्या वैयक्तिक नसून विश्वाच्या आध्यात्मिक, सामाजिक, राष्ट्रीय, सर्वांच्या प्रगती, समृद्धी आणि कल्याणासाठी आहेत. विश्वामित्र दशरथाजवळ रामलक्ष्मणांची मागणी करतात ते देश आणि धर्मरक्षणासाठी; वैयक्तिक स्वार्थासाठी नाही.

उदात्त आकांक्षांच्या परंपरांच्या पाऊलवाटेवर पावले टाकीत आमचे कलाजीवन, साहित्यजीवन पोसलेले आहे.

कालिदास, भवभूती, भास या संस्कृत कवींच्या नाटकातील मंगलाचरणे, नांदी आणि भरत वाक्यांतून राजा, प्रजा, धर्म, ऋतु, पर्जन्य आणि समाजकल्याणाच्या मंगलकामनाच ध्वनित होतात. अनेक ठिकाणचे शिलालेख, ताम्रपट अशाच मंगलभावना व्यक्त करतात.

फार काय, पण मंदिरांच्या बाहेरील गधेगाळ स्तंभावरील अत्यंत अश्लील शब्दांच्या शापवाणीतूनही धर्मरक्षणाचा हेतूच व्यक्त होतो.

ज्ञानबा तुकाराम या मध्यमपदलोपी समासात सामावलेले सर्वच संत विश्वमांगल्याची कामना करतात.

**हेचि दान देगा देवा। तुझा विसर न व्हावा।**
**गुण गाईन आवडी। हेचि माझी सर्व जोडी।**
**न लगे मुक्ती धनसंपदा। संतसंग सर्व द्यावा।**

असे तुकोबा म्हणतात आणि माउली आनो भद्रा क्रतवो यन्तु विश्वतः या वेदवचनांतील भावार्थ सांगताना दुष्टांचा वाकुडपणा जावा, त्यांची सत्कर्मी रती वाढावी, सर्वत्र बंधुभाव नांदावा, दुरितांचे तिमीर जाऊन, ज्याला जे हवे ते प्राप्त होवो, असे म्हणत ईश्वरनिष्ठांच्या मांदियाळीच्या नित्य सहवासाची इच्छा धरतात.

यात कोठेही वैयक्तिक अभिलाषा नाही. वेदउपनिषदांपासून गांधी विनोबांपर्यंत असंख्य पसायदानातील उदात्त कल्पनांचे एकजीव आणि मधुर शब्दातील पाय म्हणजे माउलींचे पसायदान. तरीही जेथे जेथे व्यक्ती स्वतःसाठी काही न मागता समष्टीचे कल्याण इच्छिते, जिथे यज्ञानंतरचा प्रसाद सर्वांसाठी इच्छिला जातो ते प्रत्येक पसायदानच आहे.

## तुळशी

माझ्या घरी अंगणी तुळशी वृंदावनी
कशाला मी जाऊ कुंजवनी ।।
हालली तुळस, डोलल्या मंजुळा
त्याचा हार घालू घननिळा ।।
पाणी घालू भक्तीने, पूजा करू प्रे ाने
अखंडही वास हरीचा त्यात ।।
पारड्यात बसले श्री भगवान
रुक्मिणीने दिधले तुळशीचे पान ।।
माझ्या घरी अंगणी तुळशी वृंदावनी
कशाला मी जाऊ कुंजवनी ।।
दिले जिने प्रे आणि दिले आशीर्वचन
तिच्या पायी माझी आर्त विनवणी
माझ्या घरी अंगणी तुळशी वृंदावनी
कशाला मी जाऊ कुंजवनी ।।
हळदीचे बोट कुंकवाचे लेपन
जल दिले प्रे ाचे सौभाग्याचा नवस
घरदार व्हावे सुखी
आनंद नांदू दे प्रतिदिनी
माझ्या घरी अंगणी तुळशी वृंदावनी
कशाला मी जाऊ कुंजवनी ।।

ॲड. पूजा संस्थानिक

## कुणाला माहिती नाही

जे चालले आहे ते का चालले आहे
तिलाही माहिती नाही मलाही माहिती नाही
मला सांगायचे आहे तुला सांगायचे नाही
सत्य मी सांगेन याचा तुला विश्वासही नाही
हवी आहेत काही उत्तरे दोघासही
प्रश्न गुंतागुंतीचे मांडणे सोपेही नाही
भेटण्या आधी कसे हे मोकळे आभाळ होते
हे ढगांचे आवाज आले कोठुनी माहीत नाही
ज्या नदीच्या वाळवंटी भेटलो होतो कधी
तो किनारा थंड वारा ओळखी पत्ताच नाही
हे करू अन् ते करू स्वप्नातले मजले किती
धाराशयी निष्प्राण झाले शेवटी खांदा ही
नाही!

विजय पांढरीपांडे

पर्यावरण

मिलिंद बेंडाळे

# सुपर अल-निनोचे संकट



**सुपर अल- निनो हे नैसर्गिक संकट असले, तरी मानवी नियोजन आणि तंत्रज्ञानाच्या जोरावर त्याचा प्रभाव कमी करता येऊ शकतो. भारतासाठी मसुपर अल निनोफ्चा इशारा म्हणजे धोक्याची घंटा आहे. देशातील अन्नसुरक्षेला आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला वाचवणे हे सरका- रसमोरील मोठे आव्हान असेल. यासाठी तातडीने आणि दीर्घकालीन पावले उचलण्याची गरज आहे.**

निसर्गाच्या लहरीपणाचा फटका मानवी संस्कृतीला नवा नाही; परंतु हा लहरीपणा महासंकट किंवा सुपर अल-निनोचे रूप धारण करतो, तेव्हा जागतिक व्यवस्थेचा पायाच हादरून जातो. सध्या संपूर्ण जगासमोर, विशेषतः भारतासारख्या कृषिप्रधान देशासमोर सुपर अल- निनोचे एक मोठे संकट उभे ठाकले आहे. प्रशांत महासागराच्या पृष्ठभागावरील तापमानात होणारी कमालीची वाढ केवळ हवामान बदलत नाही, तर जागतिक अर्थव्यवस्थेच्या नाड्या आवळत आहे. एका बाजूला भीषण दुष्काळ, पाण्याचे दुर्भिक्ष्य आणि दुसऱ्या बाजूला ढगफुटी, महापूर अशा टोकाच्या हवामान बदलांमुळे मानवी जीवन आणि आर्थिक प्रगती चक्रव्यूहात अडकली आहे. या पृष्ठभूमीवर सुपर अल-निनोच्या धोक्याचा वेध घेणे आणि त्याच्याशी मुकाबला करण्यासाठी सज्ज होणे ही काळाची गरज बनली आहे.

सामान्य भाषेत सांगायचे, तर अल-निनो ही एक नैसर्गिक हवामानविषयक प्रक्रिया आहे. प्रशांत महासागराच्या विषुववृत्तीय भागातील समुद्राचे पाणी गरजेपेक्षा जास्त तापते, तेव्हा त्या स्थितीला अल-निनो असे म्हटले जाते. या बदलामुळे जागतिक स्तरावरील वाऱ्यांचे प्रवाह बदलतात, ज्याचा थेट परिणाम मान्सूनवर होतो. समुद्राच्या पृष्ठभागाचे तापमान सरासरी- पेक्षा दोन अंश सेल्सिअस किंवा त्यापेक्षा अधिक वाढते, तेव्हा या स्थितीला मसुपर अल- निनोफ म्हटले जाते. ही केवळ तीव्र उष्णतेची लाट नसते, तर हवामानाचा समतोल पूर्णपणे बिघडवणारी एक विनाशकारी साखळी प्रक्रिया असते. यापूर्वी जगाने सुपर अल-निनोचा थरार अनुभवला आहे. त्यामध्ये कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले होते आणि लाखो लोकांना अन्नान्न दशा झाली होती.

जागतिक तापमानवाढीमुळे अल-निनोची तीव्रता आणखी भयानक बनली असून निसर्गाचे हे दुहेरी आक्रमण मानवाच्या सहनशीलतेची परीक्षा घेणारे आहे. सुपर अल-निनोचा सर्वात पहिला आणि थेट फटका हवामानाला बसतो. मान्सूनच्या काळात हा पैलू सक्रिय झाल्यास पावसाचे चक्र पूर्णपणे विस्कळीत होते. यामुळे दक्षिण आशिया, विशेषतः भारत, ऑस्ट्रेलिया आणि आफ्रिकेच्या काही भागांमध्ये मान्सूनचा पाऊस अत्यंत अपुरा पडतो. नद्या, धरणे कोरडी पडतात आणि भूजल पातळी खालावते. उन्हाचा अवधी वाढतो आणि तापमानाचे जुने विक्रम मोडीत निघतात. वाढत्या तापमानामुळे जंगलांना आगी लागण्याचे प्रमाण वाढते. धक्कादायक बाब म्हणजे एका बाजूला दुष्काळ असताना, दुसऱ्या बाजूला दक्षिण अमेरिकेतील देशांमध्ये आणि अमेरिकेच्या काही भागांमध्ये अभूतपूर्व पाऊस पडतो. त्यामुळे परिस्थिती निर्माण होते. सुपर अल-निनो हे केवळ हवामान खात्याचे संकट नाही, तर केंद्रीय बँक आणि अर्थमंत्रालयाचेही डोकेदुखी वाढवणारे संकट आहे. जागतिक अर्थव्यवस्थेला लागलेली ही एक छुपी वाळवी आहे. भारतासारख्या देशात, जिथे अजूनही ५० टक्क्यांहून अधिक शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे, तिथे मान्सूनची हुलकावणी म्हणजे अर्थव्यवस्थेला मोठा धक्का असतो. यामुळे खरीप पिकांचे उत्पादन घटते आणि पाण्याच्या कमतरतेमुळे रबी हंगामावरही विपरीत परिणाम होतो. शेतकरी कर्जबाजारी होतो आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेची क्रयशक्ती मंदावते. उत्पादन घटल्यामुळे अन्नधान्य, कडधान्ये, तेलबिया आणि भाज्यांचे भाव गगनाला भिडतात. बाजारात निर्माण होणारी टंचाई महागाई वाढवते. ही महागाई नियंत्रणात आणण्यासाठी मध्यवर्ती बँकांना व्याजदर वाढवावे लागतात. त्यामुळे उद्योगांना मिळणारे कर्ज महाग होते आणि एकंदर आर्थिक विकासाचा वेग मंदावतो. या संकटाचा फटका ऊर्जा क्षेत्रालाही बसतो. दुष्काळामुळे जलविद्युत निर्मिती ठप्प होते तर दुसरीकडे प्रचंड उष्णतेमुळे घराघरांमध्ये आणि उद्योगांमध्ये विजेची मागणी प्रचंड वाढते. मागणी आणि पुरवठा यातील ही दरी ऊर्जासंकट निर्माण करते. त्यामुळे औद्योगिक उत्पादनावर परिणाम होतो. आंतरराष्ट्रीय स्तरावर पाहिल्यास, मसुपर अल- निनोफ मुळे जलमार्गांवरही परिणाम होतो. पाण्याच्या कमतरतेमुळे प्रमुख कालव्यांमधील वाहतूक [illegible] त्यामुळे जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत होते आणि वाहतूक खर्च वाढल्याने आंतरराष्ट्रीय बाजारात वस्तू महाग होतात. पश्चिम आशियातील संघर्षामुळे जागतिक ऊर्जा बाजार आधीच अस्थिर झाला आहे. कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींनी महागाईचा दबाव वाढविला असतानाच आता आणखी एका संकटाची चाहूल लागली आहे. ते म्हणजे मसुपर अल निनो.

हवामानातील हा नैसर्गिक बदल केवळ पावसावर परिणाम करणारा नसून शेती, पिण्याचे पाणी, अन्नसुरक्षा, महागाई आणि देशाच्या आर्थिक वाढीवरही दूरगामी परिणाम करणारा ठरू शकतो. त्यामुळे अल-निनो केवळ हवामानशास्त्रातील संज्ञा राहिलेली नसून राष्ट्रीय अर्थकारण आणि सार्वजनिक धोरणाचा महत्त्वाचा विषय बनली आहे.

यंदा प्रशांत महासागरातील समुद्रपृष्ठाचे तापमान नेहमीपेक्षा लक्षणीय वाढले आहे. हवामान शास्त्रज्ञांच्या मते हा बदल अल-निनो अधिक तीव्र होण्याचा स्पष्ट संकेत आहे. जून- जुलैपासून सुरू झालेला हा प्रभाव सप्टेंबर आणि त्यानंतरही कायम राहू शकतो, अशी भीती आहे. अल-निनो ही प्रत्यक्षात पृथ्वीवरील हवामान व्यवस्थेतील नैसर्गिक प्रक्रिया आहे. साधारणपणे दर दोन ते सात वर्षांनी मध्य आणि पूर्व प्रशांत महासागरातील पाणी असामान्यरीत्या गरम होते. त्यामुळे जगभरातील वाऱ्यांचे आणि पर्जन्यमानाचे चक्र बदलते.

भारतात मान्सून कमकुवत होण्यामागील हे एक महत्त्वाचे कारण मानले जाते. सामान्य परिस्थितीत प्रशांत महासागरातील व्यापारी वारे उष्ण पाणी आशियाकडे ढकलतात. त्यामुळे भारतीय उपखंडात चांगला पाऊस पडतो; परंतु अल- निनोच्या काळात हे वारे कमकुवत होतात आणि संपूर्ण पर्जन्यचक्र विस्कळीत होते. भारताच्या अर्थव्यवस्थेची रचना अजूनही मोठ्या प्रमाणावर शेतीवर आधारित आहे.

सिंचनाच्या सुविधा वाढल्या असल्या, तरी खरीप हंगामातील बहुतांश शेती अजूनही पावसाच्या भरवशावर आहे. अशा परिस्थितीत पाऊस कमी झाल्याचा पहिला फटका शेतकऱ्यांनाच बसतो. धान, सोयाबीन, मका, कडधान्ये, कापूस, भुईमूग यांसारख्या खरीप पिकांच्या पेरणीत विलंब होतो किंवा लागवडीचे क्षेत्र घटते. परिणामी उत्पादन कमी होऊन बाजारात धान्याच्या किमती वाढू लागतात.

अल- निनोचा परिणाम केवळ शेतीपुरता मर्यादित राहत नाही. उत्पादन घटल्यामुळे अन्नधान्याचा पुरवठा कमी होतो आणि महागाई वाढते. भाज्या, डाळी, खाद्यतेल, फळे यांचे दर वाढल्याने सामान्य नागरिकांच्या घरगुती अर्थसंकल्पावर अतिरिक्त ताण येतो. आधीच इंधन महागाईमुळे वाहतूक खर्च वाढला असताना अन्नधान्य महाग झाल्यास महागाईचे दुहेरी संकट निर्माण होऊ शकते. याचा थेट परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवरही होतो. कृषी क्षेत्राचा विकासदर मंदावतो. ग्रामीण भागा- तील उत्पन्न घटून उद्योग, व्यापार, सेवा क्षेत्रांवर परिणाम दिसून येतात. ग्रामीण मागणी कमी झाल्यास वाहन उद्योग, बांधकाम साहित्य, ग्राहक वस्तू, कृषी अवजारे अशा अनेक क्षेत्रांमधील विक्रीवर परिणाम होतो. त्यामुळे सकल देशांतर्गत उत्पादनाच्या वाढीवरही दबाव निर्माण होतो. मअल-निनोफ्मुळे निर्माण होणारे पाणीटंचाईचे संकट अधिक गंभीर असते.

भारतातील अनेक शहरांमध्ये उन्हाळा सुरू होताच टँकरवर अवलंबून राहण्याची वेळ येते. भूजलाची पातळी सातत्याने खाली जात आहे.

अनेक भागांमध्ये विहिरी, बोअरवेल आणि तलाव उन्हाळ्यापूर्वीच कोरडे पडतात. अशा वेळी मान्सूनही अपुरा राहिल्यास पुढील वर्षभर पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई निर्माण होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागते. तसेच दुष्काळ निवारण आणि शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यासाठी सरकारचा तिजोरीवरील ताण वाढतो. जल व्यवस्थापनाच्या अंतर्गत थेंब-थेंब पाणी वाचवण्यासाठी जलसंधारणाच्या मोहिमा राबविणे, सूक्ष्म सिंचन सक्तीचे करणे आणि पाण्याचा पुनर्वापर वाढविणे आवश्यक आहे. (पान ६ वर)

---

उगवतीचे रंग

भ्र. ९४०३७४९९३२

विश्वास देशपांडे

**ज्याच्याशिवाय नात्यांचं हे महावस्त्र जन्मालाच येऊ शकत नाही, असा या वस्त्रातील एक अनोखा आणि सर्वात मौल्यवान पदर म्हणजे 'आई'. नात्यांच्या या वस्त्रातील ती खरी सुवर्णमयी 'पैठणी' असते. विधात्याने अत्यंत कुशलतेने आणि निगुतीने घडवलेली! ज्यामुळे आपण या जगात येतो आणि आपल्याला आपली ओळख मिळते असे एक नाते म्हणजे आई. प्रत्यक्ष परमेश्वराने सुद्धा जेव्हा पृथ्वीवर अवतार घेतला, तेव्हा त्यालाही आईमुळेच सर्वश्रेष्ठ ओळख मिळाली. राम झाला कौसल्यानंदन, कृष्ण झाला देवकीनंदन. अंजनेय (हनुमंत )आणि राधेय (कर्ण ) हे देखील आपल्या आईच्या नावामुळेच ओळखले गेले. 'आईची महती' एवढी थोर की जगातल्या अनेक थोर साहित्यिकांनी तिच्यावर भरभरून लिहिले.**

# नात्यांचं महावस्त्र भाग दोन

# 'आई' (मायेची पैठणी)



'आई' हा शब्द जरी उच्चारला, तरी डोळ्यांसमोर प्रेमाची अशी एक मूर्ती उभी राहते जी वैश्विक आहे. माणूस असो वा प्राणी, भारत असो की जगाच्या पाठीवरचा कुठलाही देश; आईचे प्रेम सर्वत्र सारखेच असते. म्हणूनच मी आईला प्रेमाची वैश्विक मूर्ती म्हणतो. इतरांचं प्रेम भलेही 'माया' असेल, पण तिचं प्रेम म्हणजे 'आभाळमाया'! आपल्या मुलांवर असलेली तिच्या प्रेमाची शाल केवळ ऊब देत नाही, तर एक अभेद्य कवच बनून आयुष्यभर त्यांचे रक्षण करते. घार हिंडते आकाशी, चित्त तिचे पिलापाशी... तशी आई शरीराने कुठेही असली, तरी तिचे चित्त मात्र सदैव आपल्या लेकरापाशीच असते.

परमेश्वराने तिला पृथ्वीवर पाठवतानाच तिच्या काळजात 'अखंड माया' भरून पाठवली आहे. आई म्हणजे परमेश्वराचे दुसरे रूप. कोणीतरी खूप छान म्हटलं आहे की, परमेश्वराला सगळीकडे उपस्थित राहणे शक्य नाही म्हणून त्याने आईला पाठवले आहे. ती स्वतः उपाशी राहील, पण लेकराचं पोट भरल्याशिवाय तिचं पोट भरत नाही. तिची स्वतःची झोप होवो न होवो, आपल्या तान्हुल्याची झोप नीट व्हावी म्हणून तिची धडपड असते. निजल्या तान्ह्यावरी माउली दृष्टी सारखी धरी अशी तिची अवस्था असते. जी स्त्री जन्माला येते, अशी प्रत्येक स्त्री 'बाई' होते; पण तिचे बाईपण 'आई' झाल्याशिवाय पूर्ण होत नाही. आणि त्यासाठी तिने मुलाला जन्म दिलाच पाहिजे अशी काही अट नसते, तिला फक्त 'आई' होता आलं पाहिजे, मायेचं पांघरूण घालता आलं पाहिजे. किंबहुना, आई होण्यासाठी स्त्री असण्याचीही अट नाही; ज्याच्या हृदयात सगळ्यांबद्दल प्रेम आणि कळवळा काठोकाठ भरला आहे, अशी कोणतीही व्यक्ती आई होऊ शकते.

पंढरपूरला विटेवर उभा असलेला पांडुरंग सर्व भाविकांचे, वारकऱ्यांचे दैवत. हा सावळा विठ्ठल काही करत नाही, काही बोलत नाही, काही देत नाही आणि घेतही काही नाही. पण तो 'विठू माउली' झाला. का बरं? कारण तो सगळ्यांचं दुःख ऐकून घेतो, सगळ्यांना उराशी धरतो. त्याच्याजवळ कोणताच भेदभाव नाही. तो जरी बोलत नसला, तरी सगळ्यांना खात्री असते की भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे असा आशीर्वाद प्रत्येकाला तो नक्कीच देतो.

**ऐशी कळवळ्याची जाती, करी लाभावीण प्रीती.** जिच्यामुळे हे विश्व निर्माण झाले अशी माता पार्वती जगज्जननी झाली. आमचे संत देखील 'माउली' झाले. समाजाने ज्यांचा अपार छळ केला, तरीही ज्यांच्या मुखातून विश्वाच्या कल्याणासाठी 'पसायदान' नावाचे अमृत बाहेर पडले, ते संत ज्ञानेश्वर म्हणूनच 'ज्ञानेश्वर माउली' झाले. अहिल्याबाई होळकर लोकांसाठी समाजसेवेची अनेक कामे करून 'लोकमाता' झाल्या. अनाथ, निराधार मुलांवर मायेचे छत्र धरणाऱ्या सिंधूताई सपकाळ याच व्यापक मातृत्वाचे रूप झाल्या. ज्या आदीवासी, अशिक्षित स्त्रियांनी वृक्षांचे संवर्धन करण्यासाठी प्रसंगी आपल्या प्राणांचे बलिदान देऊन वृक्षांचे संरक्षण केले, त्या वृक्षमाता झाल्या. अशी मातेची अनेक रूपे.

आपल्या मुलांवर प्रेम करते ती 'आई'; सर्वांबद्दल प्रेमभाव जिच्या मनात असतो ती 'माता'; आणि अखिल विश्वाला कवेत घेणारी अपार माया जिच्या काळजात असते, ती 'माउली'! न मातुः पर दैवतम असे आपल्याकडे म्हटले जाते; म्हणजेच आईसारखे दुसरे दैवत नाही. इतर देवतांना प्रसन्न करण्यासाठी कठोर तपश्चर्या करावी लागते, नवस बोलावे लागतात. पण हे मातृत्व नावाचे दैवत असे आहे की, त्याला प्रसन्न करण्यासाठी कोणतीही उपासना करावी लागत नाही. तिच्या पोटी केवळ जन्म घेतला, की ही देवता प्रसन्न होते आणि आयुष्यभर त्या बाळाची काळजी वाहते. प्रसूती वेदना काय असतात, ते फक्त माताच जाणे! पण जेव्हा ते नवजात अपत्य ती पहिल्यांदा आपल्या जवळ घेते, तेव्हा तिच्या त्या प्रसववेदनांचे शीतल चांदणे होऊन तिच्या मुखावर एक अद्भूत हास्य विलसते. तिच्या उरातील माया अमृत होऊन तिच्या स्तनातून बाळासाठी पाझरू लागते. तिच्या कुशीत जेव्हा तिचं बाळ असतं, तेव्हा ती जगातली सर्वात समृद्ध स्त्री असते. आयुष्याच्या विद्यापीठातली 'आई' नावाची सर्वोच्च पदवी निसर्गाने तिला बहाल केलेली असते.

बाळ अजाणतं असतं, असहाय असतं, त्याला काहीच करता येत नाही तेव्हापासून आई त्याला सावरते. जेव्हा त्याच्या चिमुकल्या ओठांतून 'आई' हा पहिला शब्द उमटतो, तेव्हा तिच्या काळजाचा झालेला आनंद गगनात मावत नाही. याच एका शब्दासाठी ती नऊ महिने नऊ दिवस आसुसलेली असते. मग ती हळूहळू त्या सानुल्याला बोलायला शिकवते, पाऊल पाऊल टाकत चालायला शिकवते आणि त्याला स्वतः च्या पायावर उभे करते. तीच त्याची पहिली शाळा आणि पहिला गुरू असते. या शाळेत कुठलीही फी नसते, उलट काळजी आणि प्रेम मात्र अपार असते.

बाळ जसजसं मोठं होतं, तसतसं तिचं काळीज आनंदाने फुलत जातं. बाळाच्या पंखात ताकद येते आणि ते स्वतःचे आभाळ शोधायला उडू लागतं. पण कधी कधी, आकाशात उंच भरारी घेणाऱ्या या पाखराचे लक्ष जमिनीवर एकटीच बसलेल्या आपल्या वृद्ध आईकडे जात नाही. अशा वेळी ती केवळ दोन शब्दांच्या प्रेमासाठी आसुसलेली असते. आता तिच्या पंखातले बळ कमी झालेले असते. आता वेळ असते त्या मुलाची-परतफेड करण्याची. खरं तर, आईच्या ऋणातून मुक्त होणे किंवा त्याची परतफेड करणे जन्मांतरातही शक्य नाही, पण कृतज्ञतेने त्या ऋणातून उतराई होण्याचा प्रामाणिक प्रयत्न मात्र नक्कीच करता येतो.

आई नावाच्या नात्याचा परिसस्पर्श ज्यांच्या आयुष्याला झाला, त्या आयुष्याचं सोनं झालं! कौसल्येने रामाला घडवलं, यशोदेने कृष्णाला, जिजाऊ मातेने छत्रपती शिवरायांना, भुवनेश्वरी देवींनी स्वामी विवेकानंदांना, आणि 'श्यामच्या आई'ने साने गुरुजींना घडवले. असा हा मातृमहिमा अपार आहे. सखोल आणि योग्य मार्गदर्शन आणि अचूक निर्णयक्षमता यासारख्या गोष्टी म्हणजे आईच्या सल्ल्याचे वैशिष्ट्य! आईनं ज्यांना मार्गदर्शन केलं आणि आईचा सल्ला ज्यांनी शिरोधार्य मानला, त्यांनी जीवनामध्ये फार मोठे कार्य करून दाखवले आणि ते यशस्वी झाले. पांडवांनी आपल्या माता कुंतीचा सल्ला प्रत्येक वेळी शिरोधार्य मानला; त्याच वेळी त्यांचे बंधू असलेल्या कौरवांनी मात्र आपल्या आईचा (गांधारीचा) सल्ला नेहमीच धुडकावून लावला. या दोन्ही गोष्टींचे परिणाम काय झाले, याची साक्ष महाभारतात आपल्याला मिळते. पांडवांना सर्वत्र विजय मिळाला आणि कौरवांचा मात्र पराभव झाला. छत्रपती शिवाजी महाराजांनी देखील माता जिजाऊंचा सल्ला प्रत्येक प्रसंगी शिरोधार्य मानला, म्हणूनच ते हिंदवी स्वराज्याची स्थापना करू शकले.

आई या नात्याचे अनेक पदर आहेत. गुरूची पत्नी जेव्हा 'गुरुमाता' होते, तेव्हा ती आश्रमातील सर्व बटूंना स्वतःच्या मुलासारखे सांभाळते. वशिष्ठांच्या आश्रमात जेव्हा राम, लक्ष्मण, भरत आणि शत्रुघ्न यांचे शिक्षण पूर्ण झाले, तेव्हा निघताना प्रभू रामचंद्रांनी गुरुमातेचे पाय धरून म्हटले, तुम्ही आईच्या मायेने आम्हाला सांभाळले, कशाचीच उणीव भासू दिली नाही. आमच्या वागण्यात काही चुकले असेल, तर आईच्या मायेने आम्हाला क्षमा करा. खरोखरच धन्य ती गुरुमाता आणि धन्य ते संस्कारी भावंडे! रामायणाने अशी नाती कशी जपावीत याचा आदर्श आपल्यासमोर ठेवला आहे. रामाला वनवासात पाठवले म्हणून जग कैकयीला दोष देत असताना, राम लक्ष्मणाला समजावतो, आई कोणीही असो, ती सदैव आदरणीयच असते. मला वनात पाठवण्यामागे तिचा नक्कीच काहीतरी चांगला उद्देश असेल. माझ्या शिक्षणात काही उणीव राहिली असेल, ती पूर्ण करण्यासाठीच ही वनाची योजना असावी. ही उदात्तता आजच्या पिढीने शिकायला हवी.

ज्याच्या डोक्यावर मातृछत्र छाया धरून असतं, त्याच्या भाग्याची थोरवी काय वर्णावी? प्रत्यक्ष परमेश्वराला देखील हे भाग्य लाभत नाही म्हणून तो सुद्धा मानवी अवतार धारण करून पृथ्वीवर येतो. 'दिवार' या चित्रपटातील एक संवाद मला आजही आठवतो. त्या चित्रपटात इन्स्पेक्टर असलेला शशी कपूर आणि चोराची भूमिका करणारा अमिताभ यांच्यातील संवाद फार लोकप्रिय झाला होता. अमिताभ शशी कपूरला म्हणतो, मेरे पास गाडी है, बंगला है, नोकर चाकर, पैसा है... तुम्हारे पास क्या है? तेव्हा शशी कपूरने दिलेलं उत्तर फार सुंदर आहे. तो म्हणतो, मेरे पास माँ है! आईची बरोबरी कशानेच होऊ शकणार नाही, कुबेराची संपत्ती देखील तिच्या तुलनेत फिकी आहे.

पण आज आम्हाला केवळ या महापुरुषांची आणि त्यांच्या मातांची थोरवी सांगून भागणार नाही. असे सुपुत्र आजच्याही काळात घडावेत आणि त्यांना जन्म देणाऱ्या माता धन्य व्हाव्यात, ही भारतभूमी धन्य व्हावी, ही काळाची गरज आहे. लहान मूल म्हणजे मातीचा गोळा; जसा आकार द्यावा तशी मूर्ती घडते. ही सुसंस्कारी मूर्ती घडवण्याची पहिली आणि मुख्य जबाबदारी आईची असते. खाण तशी माती असे आपण म्हणतो. आई जर सुसंस्कारित आणि सुशिक्षित असेल तर तिची मुले सुद्धा तशीच होतील. अशा आया घरोघरी असतील तर सुसंस्कारित समाज निर्माण होईल. वर्तमानकाळातील मातांपुढे आजच्या युगाने खूप मोठी आव्हाने उभी केली आहेत. पूर्वीची आई मुख्यतः 'गृहिणी' होती, त्यामुळे मुलांवर संस्कार करण्यासाठी, त्यांच्याशी गप्पा मारण्यासाठी तिच्याकडे पुरेसा वेळ असायचा. आजच्या आईला मात्र नोकरी, करिअर आणि घर अशी दोन्ही आघाड्यांवर दुहेरी कसरत करावी लागते. कधी कधी यामुळे तिच्या मनात एक अनामिक 'अपराधित्व' डोकावते की, मी माझ्या मुलाला वेळ देऊ शकत नाही. पण अशाही परिस्थितीत ती आपला पदर खोचून खंबीरपणे उभी आहे. ती केवळ मुलांचे संगोपन करत नाही, तर आपल्या कर्तृत्वाने मुलांसमोर स्वावलंबनाचा एक नवा आदर्श ठेवत आहे.

तापि, बदलत्या काळाच्या पार्श्वभूमीवर आजच्या आईला काही जाणीवपूर्वक निर्णय घ्यावे लागतील. पूर्वी एकत्र कुटुंब पद्धतीमध्ये आजी-आजोबा, काका-काकू असायचे, मुलांवर सहज संस्कार व्हायचे. आज बहुतेक घरात एकच मूल असते आणि ते एकलकोंडे होते. आजी-आजोबांच्या गोष्टींचे माध्यम आता बऱ्याच घरांतून नाहीसे झाले आहे. मुले पाळणाघर किंवा प्ले-ग्रुपमध्ये वाढतात, पण तिथे आवश्यक कौटुंबिक संस्कार मिळतीलच असे नाही; ही पोकळी आईलाच भरून काढावी लागेल.

आजची मुले 'डिजिटल' युगातली आहेत. ती नुसते सांगून किंवा उपदेश ऐकून शिकत नाहीत; त्यांच्यासमोर स्वतःचा आदर्श ठेवावा लागतो. सारखा मोबाईल पाहू नकोस, पुस्तक वाच, अभ्यास कर असे ओरडून मुले ऐकणार नाहीत. आई-बाबांनी कामावरून आल्यावर स्वतः मोबाईल आणि टीव्ही बाजूला ठेवून हातात एखादे चांगले पुस्तक धरले, तर मुलेही त्याचे अनुकरण करतील. आईचा पदर आणि तिची अंगाई यातून जी भावनिक ऊब मुलाला मिळते, ती 'यूट्यूब'वरील बालगीतांमधून कधीच मिळू शकत नाही, हे आजच्या मातेला समजून घ्यावे लागेल. सुट्टीच्या दिवशी पालकांनी मुलांसाठी वेळ द्यायला हवा, घरातील छोटी-मोठी कामे करताना त्यांना सोबत घेतले, तर श्रमाची आणि जबाबदारीची सवय त्यांना आपोआप लागेल.


नात्यांच्या या भरजरी 'महावस्त्रा'चा हा मातृत्वाचा पदर जर संस्कारांनी आणि ओलाव्याने संपन्न राहिला, तरच पुढची पिढी निकोप आणि सुदृढ होईल. आई नावाच्या या पैठणीची जरतारी चमक कधीच फिकी पडू न देणे, ही आजच्या प्रत्येक मुला- मुलीची आणि समाजाची नैतिक जबाबदारी आहे.

# तारामती

कीर्तिरूपांच्या आठवकथा
डॉ. रमा गोळवलकर

काळाच्या ओघात काही व्यक्ती हरवतात, विस्मृतीत जातात तर काहींची कुंडली म्हणजे जन्मपत्रिका अक्षय्य असते. ती व्यक्ती जरी लयाला गेली तरी ती जे जीवन जगली त्यातून नंतरच्या पिढी स्फूर्ती घेत असतात. या भौतिक जीवनात कितीही निधी असली, त्यातून येणाऱ्या हालअपेष्टा, पदोपदी होणारे अपमान सहन करत कितीही संघर्ष करावा लागला तरीही आपलं स्वत्व आणि सत्व सोडायचं नाही, या तत्त्वावर ठाम राहिलेल्यांची एक भली मोठी जंत्रीच आपल्या प्राचीन वाङ्मयात दिलेली आहे. त्याचा फार प्रचंड मोठा प्रभाव भारतीय जनमानसावर होता. यातून या राष्ट्रात उत्पन्न झालेल्या जनांचं चारित्र्य पोषण व्हायचं.

निर्धनता आणि दारिद्र्य या दोन सर्वस्वी वेगळ्या अवस्था आहेत. एकात केवळ आर्थिक बाजूचा विचार होतो तर दुसऱ्यात एकूण व्यक्तिमत्त्वात आणि कार्यकौशल्यात असलेल्या उणिवा आणि अभाव, टंचाई, तुटवडा याचा विचार करण्यात येतो. उदाहरणार्थ कर्मदारिद्र्य, कल्पनादारिद्र्य इत्यादी. जीवनातले आर्थिक चढ-उतार आणि विपन्नावस्था ते ऊर्जितावस्था किंवा उलट हे तर कालचक्रावर अवलंबून आहे. त्यामुळे खचून न जाता आपल्या अंगभूत गुण, सहनशक्ती, परिश्रम करण्याची क्षमता, कर्म कौशल्य आणि सत्यशीलता या सगळ्या अमूर्त भांडवलावर विपरीत परिस्थितीवर मात करता येते, हा विश्वास तेवत ठेवणाऱ्या या सगळ्या कथा आहेत. सामान्य भाषेत याला टिकून राहणं किंवा तग धरून राहणं म्हणतात. त्यातूनच हे राष्ट्र घडत गेलं आणि त्याचं अस्तित्व काळाच्या ओघातही अमिट, अवीट राहिलं. गेल्या तीन शतकांत आधी वसाहतवादी मिशनरी आणि नंतर डावे कम्युनिस्ट आणि सोशालिस्ट विचारसरणीच्या लोकांनी मात्र या सगळ्या प्राचीन वाङ्मयाची बुरसटलेलं, प्रतिगामी म्हणून अवहेलना केली. कारण यंत्रांच्या माध्यमातून प्रचंड प्रमाणात वस्तू निर्मिती करत बक्कळ पैसा मिळवून देणारी कारखानदारी अर्थव्यवस्था चालवायची तर निसर्गाचं आणि गरजू लोकांच्या शोषणाकडे दुर्लक्ष करणारा चंगळवादी समाज हवा. त्याचबरोबर आपली पोळी भाजून घेण्यासाठी शोषित पीडित विरुद्ध उच्चभ्रू, प्रस्थापित विरुद्ध विस्थापित, भांडवलशाह विरुद्ध मजूर असा संघर्ष निर्माण करण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न कसोशीनं करण्यात आले आहेत. त्याचाच एक भाग म्हणजे अंगभूत गुणांमुळे कोणी किती विपरीत परिस्थितीला तोंड देत, प्रतिकूल अवस्थेतही तगून परिस्थिती पालटली है यशोगाथे (सक्सेस स्टोरी) च्या रूपात न सांगता त्या व्यक्तीचं शोषण कसं झालं, याचा पाढा वाचणं. नमनालाच घडा भर तेल जाळण्यामागचा हेतू हा की, या लेखाचा वर्ण्य विषय असलेल्या तारामती या राणीचा जीवनपट . काही ठिकाणी तिचं नाव चंद्रमती असल्याचाही उल्लेख येतो. महान दानी राजा शिबीची कन्या म्हणून हिला मशैब्याफ म्हटलेलं आहे. शरणागताला अभय देण्याचं व्रत घेतलेला; आश्रयाला आलेलं कबूतर ससाण्याचं भक्ष्य होऊ नये म्हणून त्याच्या वजनाइतकं स्वतःच्या शरीराचं मांस कापून देणारा हाच तो शिबी राजा. त्यामुळे जन्मजात सत्यव्रताचे आणि त्यागाचे संस्कार असलेली तारामती राजा हरिश्चंद्राची पत्नी. तिचा पती पराक्रमी, वैभवशाली, नीतिवान होताच; शिवाय शब्दाला जागणारा होता. तिची जडणघडण ज्या मुशीत झाली होती त्याच मुशीत तयार झालेला पती मिळाल्यामुळे ती दोघे एकमेकांना पूरक आणि प्रेरक होती, यात शंकाच नाही. तिच्या पतीनं स्वप्नात विश्वामित्रासारख्या राजर्षी आणि नंतर ब्रह्मर्षी झालेल्या महान तपस्व्याला आपलं सारं राज्य दानात देऊन टाकलं, याची तिला किंचितशीही कल्पना नव्हती. अचानक एका सकाळी तिला ही वार्ता कळते. दानाचे नियम सांगतात की ज्याला दान द्यायचं आहे त्याला ते दान देण्याची संधी देऊ केल्याबद्दल दक्षिणादेखील द्यावी. राजा हरिश्चंद्रानं दान तर दिलं; पण दक्षिणा देण्यासाठी त्याच्याजवळ त्याच्या स्वतःच्या मिळकतीची एक कवडीदेखील नव्हती.



तारामतीनंदेखील साम्राज्ञी म्हणून सगळे वस्त्रालंकार काढून वल्कलं परिधान केली होती. ती देखील निर्धनच होती. अखेरीस हरिश्चंद्राला तारामती आणि पुत्र रोहिताश्वासह त्याच्या कौसल राज्याच्या सीमेच्या बाहेर जावं लागलं. शेजारच्या काशी राज्यात जाऊन त्यानं स्वतःचा लिलाव केला. स्मशानाच्या व्यवस्थापनाचं दायित्व असलेल्या डोंबराजानं त्याला विकत घेतलं. त्यातून जे द्रव्य मिळालं ते ब्रह्मर्षी विश्वामित्रांनी मागितलेल्या दानद्रव्याहून कमी होतं. तेव्हा पतीचा संकल्प पूर्ण करण्यासाठी त्याची अर्धांगिनी म्हणून तारामतीनं आणि उत्तराधिकारी म्हणून रोहिताश्वानं स्वतःची बोली लावली. एका ब्राह्मणानं त्या मायलेकरांना विकत घेतलं. एका बलशाली साम्राज्याची राजकन्या आणि दुसऱ्या सामर्थ्यशाली साम्राज्याची महाराणी म्हणून वावरलेल्या तारामतीचं आयुष्य अगदी १८० अंशानं बदललं. त्यालादेखील कारणीभूत ती स्वतः नसून नवऱ्यानं स्वप्नात दिलेलं वचन होतं. तरीही आलेल्या परिस्थितीला धीरानं सामोरं जात तिनं टिकून तगून राहण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. प्रसंगी क्रीत दासी होऊन राहिली, पण दिलेला शब्द खरा करण्यात कोणतीही उणीव राहू दिली नाही. ब्रह्म विश्वामित्रांना दक्षिणा दिल्यानंतरही या कुटुंबाच्या हालअपेष्टा संपल्या नाहीतच. त्यांच्या आयुष्यात आणखी एक अतीव भीषण घटना घडली- रोहिताश्वाचा सर्प दंशानं मृत्यू! त्याच्या प्रेताचं स्मशानात दहन करायचं तर त्यासाठी डोंबराजाकडून आकारला जाणारा कर देण्याइतकं देखील द्रव्य एकेकाळी महाराणी म्हणून वावरलेल्या तारामतीकडे नसावं, हा त्यातला सर्वात दुर्दैवी भाग होता.

इथे तारामतीच्या कर्तव्यपरायणतेची परीक्षा होती. प्रेत होऊन पडलेल्या त्या बालकाचे आपण स्वतः साक्षात पिता आहोत, हे तथ्य बाजूला सारत, कर देण्याची ऐपत नसेल तर या प्रेताचं दहन या स्मशानघाटावर करता येणार नाही, अशी ठाम भूमिका घेणारा हरिश्चंद्र एकीकडे तर दुसरीकडे निर्धन असल्यामुळे कोवळ्या वयातच मृत झालेल्या आपल्या मुलाच्या प्रेताचीही विल्हेवाट लावता येत नाही अशी तारामती. तिचं दुःखही पंचपेडी आहे. पहिला पेड- महाराज्ञी ते क्रीत दासी ही घसरण. दुसरा पेड- क्रीत दास्यत्वामुळे नवऱ्यापासून झालेली फारकत. तिसरा पेड- राजपुत्र म्हणून जन्मलेल्या एकुलत्या एक मुलाचा सर्पदंशानं अकाल मृत्यू. चौथा पेड- त्याच्या और्ध्वदेहिकासाठी लागणारा करही देता न येणं. सर्वाधिक शल्य असलेला पाचवा पेड- असल्या प्रतिकूल परिस्थितीत नवरा समोर असून त्याची साथ नसणं. या सगळ्यातून निघालेला मार्ग म्हणजे नेसत्या वस्त्राचा काही भाग कर म्हणून देत मुलाचं सरण तिनं एकटीनं रचलं. पण आपल्या कर्तव्यात कुठेही उणी पडली नाही. मार्कंडेय पुराणात ज्या तारामतीचं चारित्र्य आणि चरित्रातून प्रेरणा घेत नंतरच्या असंख्य सहस्र पिढ्यांच्या अनेकानेक स्त्रियांनी त्यांच्या आयुष्यात अवघडातल्या अवघड प्रसंगांना कणखरपणे तोंड दिलं त्या शैब्या तारामतीची ही आठव कथा....

# आपली भाषा अन् त्यांचे शब्द...

बोली आणि संस्कृती
प्रा. अजय देशपांडे

संस्कृत, फारसी, अरबी, कानडी, तुर्की, हिंदी, तमिळ, इंग्रजी या आणि आणखी काही भाषांमधील शब्द मराठी आणि वि बोलींमध्ये सहज मिसळले आहेत. संस्कृत, प्राकृत, पाली, मागधी अपभ्रंश कानडी, तेलुगू, हिंदी, तमिळ या भाषांतील शब्द भारतातील भाषिक आदानप्रदान प्रक्रियेतून मराठीत आलेले आहेत तर फारसी, अरबी, तुर्की, इंग्रजी या काही भाषांमधील शब्द मराठीत येण्याचे कारण व्यापार सत्ता वगैरे आहेत. पोतडी, रुखवत, निसाण असे थोडे अरबी शब्द महानुभावकालीन बोलीत आढळतात.

महाराष्ट्रातील मराठीच्या बोलींचा शब्दसंग्रह फारसी शब्दांनी अक्षरशः गजबजलेला आहे. अगर, अस्थानी, अंदाज, कारस्थान, औलाद, कागद, कारभार, खुशामत, खरेदी, खिसा, गोषवारा, जरतारी, जहर, जाहिरात, नादान, नोकर, मजूर, समशेर, सरकार, हमेशा, शिरजोर, मेहरबान, मोहरा, बर्बाद, मेजवानी, बहार, लिफाफा, वापस, नापसंत, नादान, सौदा असे शेकडो फारसी शब्द जसेच्या तसे किंवा थोडाफार फरक होऊन बोलीत आले आहेत. त्यानंतरच्या काळात अरबी शब्द महाराष्ट्रातील विविध बोलींमध्ये सहज शिरले. लोकांनी ते स्वीकारले. एखादा शब्द जेव्हा लोकजिव्हेवर रुजतो आणि बराच काळ तो रमतो तेव्हा तो बोलीतील अविभाज्य शब्द होतो. बोलीत रुळलेल्या अरबी आणि फारसी शब्दांची संख्या मोठी आहे. अक्कल, अवलाद, अजब, कंदील, औरत, गरीब, गल्लत, नजराणा, मजबूत, मुरब्बी, वकील, रुबाब, वशिला, शर्त, विलायत, सरबत, मौसम, लकब, हलवा, साहेब, हुज्जत, फकिर, फजिती, ताकीद, नाईलाज, दवा, मंजूर हे आणि असे कितीतरी फारसी शब्द जसेच्या तसे किंवा थोडाफार फरक होऊन बोलीत आले आहेत.

१९१८ मध्ये विदर्भातील अकोट येथे भाषणात लोकमान्य टिळकांनी ब्युरोक्सी या शब्दाला नोकरशाही हा पर्यायी शब्द दिला. या जोडशब्दातील दोन्ही शब्द फारसी आहेत, पण दोन्ही शब्द लोकभाषेत रुजलेले असल्याने मराठी समुदायाने नोकरशाही हा शब्द सहज स्वीकारला. फारसी, इंग्रजी, संस्कृत, मराठी या भाषांतील शब्दांच्या मिश्रणातून काही शब्द तयार झाले आहेत. उदाहरणार्थ नापास हा शब्द. ना हा फारसीतून आला आहे तर पास इंग्रजी शब्द आहे. भांडखोर, टाईमशीर, दादागिरी, बेताल असे काही शब्द दोन- तीन भाषांतील शब्दांचे मिश्रण होऊन तयार झाले आहेत.

महाराष्ट्रात फारसी, अरबी, मराठी भाषा यांचे मिश्रण असलेली भाषा बोलली- लिहिली जात होती. उदा. भाऊसाहेबांची बखर. या बखरीतील पुढील उतारा मिश्र भाषेचा नमुना आहे. त्याणेंहि खरें वर्तमान सांगितलें कीं, साहेब, पटेल घायाल पडा है, या बचावे. आंसें म्हणतांच कुतुबशाहास बहूत आनंद जाहाला इक्षुदंडांतूनच शर्करा सांपडते किवा तुपगीच नवनीत सांपडतें, तेंसा आनायासें करून लाभ जाहला; आणि बोलिला कीं, पटेल कहां है? दिखलाव. म्हणोन तैसेच आंबारीसुद्धां राजाराम याणें जेथे दताजी सिंदे घायाल पडले होते तेथे आले. अंबारीतून उतरून जवळ आला. तों दताजों सिंदे उताणे पडले होते तेथे कुतुबशाहा याणें जाबसाल केला कीं, पटेल हमारे साथ तुम और लडेंगे? म्हणोन पुसले दताजी सिंदे सावध होते. त्यांस पुर्ते उमजले कीं, हैं कांहीं आपणांस वाचवीत नाहींत मग व्यंग गोष्टी सांगणें हैं विहीत नव्हे. म्हणोन दम बांधोन जाबसाल केला कीं, (इन) शा अला-हु-ताला! बचेंगे तो औरबी लडेंगे. आसे ऐकतांच कुतुबशाहा याणें कमरेचा सुरा काढोन, लाथेनें ढकलून, पालथा घालून, दत्ताजी सिंदे यांचा सिरछेद केला. राघोबा पागे व राजाराम चोपदार यांणीं बहुत ग्लानता केली कीं, साहेब इसको बच्चाव करना, क्रोड रुपये पाहिजे तरी देऊ. म्हणोन बोलिले. परंतु यांणीं न ऐकून आपले महत्कार्य साधलें. तों आंठ घटिका दिवस आला होता. तो कुतुबशाहा याणें सीर भाल्यास टोंचून साहादानें वाजवीत जाते जाहाले-फते जाहाली म्हणोन नजीबखान याजकडे वर्तमान गेलें. तो कुतुबशाहाहि जाऊन पोहोंचला. आणि सीर त्यांणी काढून रुमालांत घातलें.

या एका परिच्छेदात साहेब (अरबी), घायाल/ घायल (अरबी/फारसी) आंबारी/ अंबारी (अरबी/ फारसी), कमरेचा/कमर (फारसी), सुरा (फारसी/उर्दू) सीर/ सिर (फारसी) चोपदार (फारसी चोबदार), पागे/ पागा (फारसी), फते (अरबी फतेह ), रुमाल (फारसी) हे शब्द आले आहेत. कुतुब हा अरबी शब्द आणि शाह हा फारसी शब्द मिळून कुतुबशाह हा शब्द तयार झाला आहे. तसेच नजीब या अरबी



शब्दाचा अर्थ सभ्य, कुलवंत असा आहे तर खान हा शब्द तुर्की आणि फारसी भाषेतील आहे.

हे दोन शब्द एकत्र करून नजीबखान हा शब्द तयार झाला आहे. जाबसाल हा अरबी शब्द जवाब (उत्तर) आणि सवाल (प्रश्न) या दोन अरबी शब्दांपासून बनलेला जोडशब्द आहे. दम या फारसी शब्दाचा अर्थ धीर, श्वास किंवा हिम्मत असा होतो. इन्शा अल्ला-हु-ताला हा अरबी वाक्प्रचार असावा जर अल्लाहची (ईश्वराची) इच्छा असेल तर असा त्याचा अर्थ होतो. साहादानें/ शाहादाने या शब्द मूळ फारसी शादियाने या शब्दापासून तयार झाला आहे. त्याचा अर्थ विजयाचा उत्सव, नौबत किंवा नगारे वाजवणे असा आहे.

अरबी फारसी या भाषांतील अनेक शब्दांच्या प्रभावातून स्वनिम परिवर्तन होऊन बोलीतील अनेक शब्द घडले आहेत. आखिर हा शब्द अखेर झाला. आब्रू हा अब्रू झाला हुक्म. हा शब्द हुकूम झाला. मुल्कचा मुलुख झाला. अशी आणखी काही उदाहरणे- आसमान-अस्मान, ईमान- इमान, मियान-म्यान फारसी उपसर्ग किंवा परसर्ग लागून अनेक शब्द घडले आहेत. हे शब्द बोलीत आणि प्रमाणभाषेत सहज वापरले जातात. उदाहरणार्थ कम, दर, बे, बिन गैर हे फारसी उपसर्ग लागून बोलीतील अनेक शब्द तयार झाले आहेत. उदा. कमकुवत, कमजोर, दररोज, दरसाल, बेईमान, बेकायदा, बेजबाबदार, बेफिकीर, बेपर्वा, बिनधास्त, बिनदिक्कत, गैरहजर असे अनेक शब्द आहेत. फारशी परसर्ग म्हणजे प्रत्यय लागून बोलीतील शब्द तयार झाले आहेत.

उदा. खाना हे प्रत्यय लागून दिवाणखाना, दवाखाना, पागलखाना, कारखाना, अजबखाना, पायाखाना, शिकारखाना, दफ्तरखाना, आबाद हे फारसी प्रत्यय लागून अहमदाबाद, सिकंदराबाद, हैदराबाद, आसिफाबाद वगैरे गावांची नावे तयार झाली आहेत.

आई हे प्रत्यय लागून नरमाई, मोगलाई, दिरंगाई, रोषणाई हे शब्द तयार झाले आहेत. फारसी परसर्ग लागून मेहनताना, रोजाना, खजाणा, दोस्ती, सबुरी, हलवाई, सालीना, खिदमदगार, जादूगार, परवानगी, रवानगी, पोटगी, (पान ६ वर)

# कॉर्पोक्षेत्र!

नवचेतना
समिधा पाठक

**सॉफ्ट स्किल्सचं मार्केटिंग आज सॉफ्ट टॉईजपेक्षा कैक पटीने जास्त होताना दिसतंय्. काळाची गरजच आहे हो तशी! सॉफ्ट स्किल्स हा आजचा हॉट टॉपिक झालाय्. नुसती डिग्री किंवा नुसते मार्क्स काही उपयोगाचे नसतात, जॉब मिळवायचा असेल तर सॉफ्ट स्किल्स फार आवश्यक असतात. म्हणून महाविद्यालयीन अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षाला, अनेक विद्यार्थी काही ट्रेनिंग इन्स्टिट्यूटस्‌मध्ये सॉफ्ट स्किल्स शिकण्यासाठी क्लासेस लावतात. कोर्स पूर्ण झाल्यावर मग तिकडून न विसरता सर्टिफिकेट घ्यायचं आणि आपल्या रेस्यूममध्ये, सॉफ्ट स्किल्स ट्रेनिंग पूर्ण केलं आहे, असं लिहायचं..**

राजू एक हुशार मुलगा होता. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्याला चांगली नोकरी मिळाली. खोली करून एकटाच राहात असे. त्याला त्याच्याच विश्वात रमून जायला आवडायचं. कामाच्या बाबतीतही तसंच होतं. भान हरपून, मन लावून काम किंवा अभ्यास करायचा. पहिल्याच वर्षी तो भरपूर काही शिकला, नवीन प्रोजेक्ट्स् हाताळलेत. त्याचं काम आणि ग्रास्पिंग बघून एकाच वर्षात त्याचं प्रमोशन झालं. आता त्याच्या हाताखाली काम करायला टीम होती. पण, काही दिवसांत त्याला लक्षात आलं की, त्याला लोकांना घेऊन काम करणं कठीण जातंय्. सारखी चिडचिड होतेय् आणि कामाची इफिशियन्सीसुद्धा कमी होतेय्. मॅनेजमेंटने त्याच्यासोबत चर्चा केली आणि मग त्याला सॉफ्ट स्किल्सचं ट्रेनिंग घ्यायला लावलं. तिथं शिकवलेलं तो हळूहळू आत्मसात करू लागला आणि अंमलात आणू लागला. सुरुवातीला जड गेलं, पण मग हळूहळू सवय झाली आणि काही दिवसांनी राजू एक इफिशियंट मॅनेजर तर झालाच, पण सोबतच एक व्यक्ती म्हणून त्यानं व्यक्तिमत्त्वाला पैलू पाडले.

पूर्वीचा एकलकोंडा राजू आता सर्वांसोबत मिळूनमिसळून वागत असे आणि प्रत्येकाला लवकरच आपलंस करत असे. सॉफ्ट स्किल्सची किमया! दुसरं काय? सॉफ्ट स्किल्सचं मार्केटिंग आज सॉफ्ट टॉईजपेक्षा कैक पटीने जास्त होताना दिसतंय्. काळाची गरजच आहे हो तशी! सॉफ्ट स्किल्स हा आजचा हॉट टॉपिक झालाय्. नुसती डिग्री किंवा नुसते मार्क्स काही उपयोगाचे नसतात, जॉब मिळवायचा असेल तर सॉफ्ट स्किल्स फार आवश्यक असतात. म्हणून महाविद्यालयीन अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षाला, अनेक विद्यार्थी काही ट्रेनिंग इन्स्टिट्यूटस्‌मध्ये सॉफ्ट स्किल्स शिकण्यासाठी क्लासेस लावतात. कोर्स पूर्ण झाल्यावर मग तिकडून न विसरता सर्टिफिकेट घ्यायचं आणि आपल्या रेस्यूममध्ये, सॉफ्ट स्किल्स ट्रेनिंग पूर्ण केलं आहे, असं लिहायचं... सॉफ्ट स्किल्स म्हणजे नक्की काय? तर आपल्या व्यावसायिक आयुष्यात वापरले जाणारे कौशल्य! सॉफ्ट स्किल्स म्हणजे आपल्या स्वभावाचे विविध पैलू. सॉफ्ट स्किल्स म्हणजे आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध छटा. सॉफ्ट स्किल्स म्हणजे समूहात वावरतानाचे आत्मभान! आपण जसजसं वयानं मोठं होत जातो, तसतसं आपली जबाबदारी वाढत असते. वाढती जबाबदारी म्हणजे वाढता व्याप. व्याप वाढला की, मग विविध लोकसमूहांसोबतही संबंध आलाच. अनेक नवीन प्रसंग, नव्या घटना घडत असतात आणि हे सगळं करताना नवीन प्रॉब्लेम्स येतातच. म्हणून एकत्रित काम करणं किंवा टीम वर्क फार गरजेचं असतं. व्यक्तिपरत्वे ही कौशल्ये बदलत असली तरीही त्यांचा सार एकच असतो. तर कोणकोणती वैशिष्ट्ये या सॉफ्ट स्किल्समध्ये येतात? सर्जनशीलता, सुसंवाद, देहबोली किंवा बॉडी लँग्वेज, समस्या सोडविण्याचा दृष्टिकोन, बदलांना स्वीकारण्याची वृत्ती, ज्ञानपिपासा, कल्पनेची प्रभावशील मांडणी, विश्लेषण, नियोजन पद्धत, पूर्वतयारी व आपली कौशल्ये इतरांना कशी आत्मसात करता येतील यासाठी प्रयत्नशील असणारी वृत्ती, व्यक्ती संभाषणातील संबंध सांभाळण्याचं कौशल्य, टीम स्पिरिट, व्यावसायिक शिष्टाचार, निगोशिएशन स्किल्स, व्यक्तिगत शिस्त आणि सामाजिक औचित्याची जाणीव! ठळकपणे या सगळ्या वैशिष्ट्यांचा समावेश सॉफ्ट स्किल्समध्ये होतो. जरी क्लासेस केलेत, तरीही क्लासेस संपल्यावर सॉफ्ट स्किल्सचं अध्ययन संपत नाही. सरावातून किंवा अनुभवांतून आपल्याला त्यांना सारखं डेव्हलप करत राहावं लागत असतं. कारण जॉब इंटरव्ह्यू घेणारा केवळ आपला रेस्यूम बघत नसतो, तर आपण स्वतःला कसं प्रेझेंट करतोय्, या निरीक्षणातून तो समजून जातो की, आपण आपल्या सॉफ्ट स्किल्स केवळ सर्टिफिकेटवर ठेवल्या आहेत, की त्यांना आत्मसात करून विकसितसुद्धा केलंय्. मग काय करता येईल आपल्याला? संवादकौशल्य! सर्वप्रथम संवादकौशल्यावर आपले प्रभुत्व जमवायला पाहिजे. आपल्या संवादात एवढी क्षमता असायला हवी की, समोरची व्यक्ती आपल्या बोलण्याकडे खेचली गेली पाहिजे. दैनंदिन व्यवहार करताना आपण संवादकौशल्ये विकसित करू शकतो. उदाहरणार्थ, लिफ्टमधून जात असताना, म्हणजे इतक्या अल्पावधीत आपण आपलं इंट्रोडक्शन अशाप्रकारे देऊ शकतो की, समोरची व्यक्ती आपल्याला लांब काळासाठी लक्षात ठेवू शकेल. यालाच स्मॉल टॉक्सही म्हणता येईल. शब्दांची उंची महत्त्वाची असते, आवाजाची नाही. आपल्या विचारांनी व शब्दांनी इतरांच्या हृदयावर अधिराज्य गाजवायचं असतं. प्रभावी देहबोलीसुद्धा फार महत्त्वपूर्ण असते. बोलताना समयसूचकता असायला हवी.

आपण कुठे, कुठल्या विषयावर नि काय बोलत आहोत, याची जाणीव आपण ठेवायला हवी. वक्तशीरपणा- यशाचा आलेख वाढवायचा असेल, तर गतीचा कायदा पाळायलाच हवा. एखादं नियोजित कार्य करताना आपणच आपल्यासाठी डेडलाइन्स सेट करायला हव्यात आणि स्वतःवर ट्रॅक करून आपण आपली प्रोडक्टिव्हिटी वाढवू शकतो. एखादं काम करताना अनेक समस्या उद्‌भवणार, पण या समस्यांचं निरसन कसं करायचं, हे कौशल्य आपण विकसित करायचं.

कुठल्याही परिस्थितीत किंवा कुठल्याही कामाच्या ठिकाणी बदल तर होत राहणारच! सहसा बदल अनपेक्षितच असतात, पण या बदलांना आनंदाने सामोरं जायचं, म्हणजे आपल्याला फारसा त्रास होत नाही. कधी त्याग करावा लागतो, तर कधी सहकार्य! अंगी पडलेलं काम करावं तर लागतंच, पण ते काम करताना आपला अप्रोच भरपूर काही फरक करून जातो. सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली की, कामाला हुरूप येतो आणि अधिक चांगल्या सृजनात्मक कल्पनांची निर्मिती करण्याची प्रेरणा मिळते. पण, सोबतच कल्पनांची प्रभावशाली मांडणी करणंसुद्धा तितकंच महत्त्वाचं असतं. नवीन बदल स्वीकारण्यासोबतच नवीन ज्ञानग्रहण चालू ठेवायला हवं.

एकविसाव्या शतकात डिग्रीच्या भरवशावर आयुष्य काढता येत नाही. सतत स्वतःला अपडेट करतं राहावं लागतं. म्हणून एक नेम ठरवून टाकायचा की, या वर्षी मी एक स्कल शिकेल, ज्याच्यामुळं माझं व्हॅल्यू ॲडिशन होईल. या स्पर्धात्मक युगात तांत्रिक शिक्षणासोबत आपल्याला वेगळं काही हवं असतं. म्हणून आपल्या एज्युकेशनला सॉफ्ट स्किल्सने गार्निश करायचं आणि आपल्या आयुष्याला एक नवी दिशा द्यायची. पण, हे सगळं स्वतः करत असताना आपल्या सोबतच्यांनाही ही कौशल्ये आत्मसात करायला मदत करायची.

लेखिका, स्त्री सशक्तीकरण व युवा चेतना

## आठवणींचं गुपित..!

हृदयाच्या एका सुंदर कोपऱ्यात
साठवल्यात साऱ्या आठवणी
काही सुखद तर काही दुःखद
केली मी आता हृदयाचीच लेखणी..!
दुःखद म्हणाली मी इथेच बरी
अश्रू ढाळण्या माझी आहे मनाई
सुखद लिही मनास येईल उभारी
दुःखास सुखाची झालर हवी किनई..?
आठवणींचा कल्लोळ हृदयी मावेना
साऱ्यांची चढाओढ लेखणीस कळेना
जिंकली आई ती तर दुधावरची साय ना
लिहिण्यास दिला वात्सल्याचा पदरच ना..!
हा ईश्वरी ठेवा आहे तुझी आठवण आई
देहाविना तुझे अस्तित्व हृदयी कोरलेले
आई झाल्यावरच कळली तुझी पुण्याई
ममत्वास ममत्व मिळाले डोळे ओलावले..!
आठवणींचे चलचित्र समोर दिसू लागले
आई बाबा मग शाळाकॉलेज काही बाही
शाळेतले स्वयंशासन सारे काही आठवले
शाळेत गुरूंनी संस्कार दिलेत सही सही..!
आठवणींचा बांध आताअसा काही फुटला
काही अनिष्ट आठवणी पुरात वाहून गेल्या
काहींना आली भरती त्या उचंबळून आल्या
लेखणीचा वेग मात्र आता कमी पडू लागला..!
सुखदुःखाच्या आठवणींनो व्हा थोडं संयमित
हृदयी वसा तुम्ही तिथेच असाल ना सुरक्षित
टप्पा टप्प्याने तु चा न्याय करेन मी निश्चित
जीवनाच्या या लढाईत ठेवावंच लागतं
गुपित..!

**सुषमा गलगलीकर**

## माझाच दोष आहे...

कळलेच नाही कुठे कसा पडाव झाला...
मनात तिच्या कोणता असा उठाव झाला...
गोड हसून नाकारणे वाचला सुंदर चेहरा
अन् वेदनादायी तिचा आता स्वभाव झाला...
मूक सोसल्या मरणकळा हसून तिच्यासाठी
अखेर माझ्याच काळजावर
कठोर घावझाला...
जीव लावून जीव जाळला पुण्यच केले तिने
अन् जिंदगीचा माझ्याच येथे लिलाव झाला...
तिला वाटते जिंकली मी नि हार झाली

**विजय पांढरीपांडे**

# ग्रहसंकेत

**(रविवार, २ ऑगस्ट ते शनिवार, ८ ऑगस्ट २०२६)**

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर, ज्येष्ठ पत्रकार
'शिवकृपा' फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो. कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र.९४२३७५८४०१)

✻ **रविवार, २ ऑगस्ट-** संकष्ट चतुर्थी, (चंद्रोदय- मंबई- २१:३७, अहिल्यानगर- २१:२९, कलबुर्गी-२१: २१, कोल्हापूर-२१:३१, जालना-२१:२४, धाराशिव-२१:२४, नांदेड-२१:१८, पंढरपूर-२१:२७, परभणी-२१:२१, पुणे-२१:३३, बीड-२१:२५, लातूर-२१: २२, विजापूर-२१: २५, छत्रपती संभाजीनगर-२१: २६, सातारा-२१: ३२, सोलापूर-२१: २४) ✻ **सोमवार, ३ ऑगस्ट-** आश्लेषा रवि (१०:२४), वाहन हत्ती, क्रांतीसिंह नाना पाटील जन्मदिन, सरखेल कान्होजी आंग्रे पुण्यतिथी, पंचक ✻ **मंगळवार, ४ ऑगस्ट-** बालमुकुंद बालावधूत पुण्यतिथी कोल्हापूर, श्री मरिमाता यात्रा कावळवाडी (ता. करमाळा), पंचक समाप्ती (रा.९.५३) ✻ **बुधवार, ५ ऑगस्ट-** कालाष्टमी, रामदास महाराज जहागिरदार पुण्यतिथी मुंडेवाडी ✻ **गुरुवार, ६ ऑगस्ट-** चांगला दिवस ✻ **शुक्रवार, ७ ऑगस्ट-** नवमी श्राध्द ✻ **शनिवार, ८ ऑगस्ट-** दशमी, एकादशी श्राध्द, ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा सांगता आळंदी

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** ३, ४, ५, ८ ऑगस्ट ✻ **बारसे-** ३, ५ ऑगस्ट ✻ **जावळ-** ५ ऑगस्ट (९ नंतर) ✻ **गृहप्रवेश-** ३, ४, ५(९ नंतर) ऑगस्ट

### मेषः- उत्साहवर्धक घटना

सर्वात सुंदर दागिना म्हणजे नम्रता. सप्ताहारंभी राशी स्वामी मंगळ पराक्रमस्थानी येत आहे. त्यामुळे कार्यक्षेत्रात उत्साहवर्धक घटना घडतील. नव्या विचारांना चालना मिळेल. शनिशी केंद्रयोग राहणार असल्याने आर्थिक गुंतवणूक विचाराने करावी. स्थावर, वाहन सौख्य लाभेल. अडचणींवर मात कराल. कलागुणांचा विकास होईल. शुभ ता. २, ४, ६

### वृषभः- वादाचे प्रसंग टाळावेत

सर्वात मोठी संपत्ती म्हणजे चांगले चरित्र. राशीतील मंगळ धनस्थानी येत आहे. स्वःमताग्रह कमी होईल. वादाचे प्रसंग आता टाळायला हवेत. राशी स्वामी शुक्र पंचमात असल्याने कलागुणांचा विकास होईल. संततीबाबत सौख्य लाभेल. चिकाटीने केलेली वाटचाल शुभ फलदायी ठरेल. नव्या संधी लाभतील. सात्विक आहार घ्यावा. शुभ ता. २, ४

### मिथुनः- गती प्राप्त होईल

सर्वात प्रभावी भाषा म्हणजे गोड बोलले. सप्ताहारंभी राशीत मंगळ येत आहे. वाटचालीस गती प्राप्त होईल. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. आर्थिक बाबतीत समाधानकारक घटना घडतील. यांत्रिक क्षेत्रात प्रगती होईल. स्थावर सौख्य लाभेल. अडचणीतून मार्ग निघेल. उत्साहवर्धक घटना घडतील. शुभ ता. २, ५

### कर्कः- नव्या विचारांना चालना

सर्वात सुंदर सवय म्हणजे वेळेचे पालन. पंचमेश, दशमेश मंगळ व्ययस्थानी येत आहे. विद्या, संततीसाठी अधिक खर्च करावा लागेल. कलेत सुसंधी लाभतील. वैवाहिक जीवनात आनंददायी घटना घडतील. गुणवत्तेत प्रगती होईल. नवीन गुंतवणूक विचाराने करावी. नव्या विचारांना चालना मिळेल. शुभ ता. २, ५, ६

### सिंहः- घाईने निर्णय नकोत

सर्वात मौल्यवान भेट म्हणजे विश्वास. मंगळ लाभस्थानी येत आहे. वैद्यकीय, मेकॅनिकल, गृहसजावट अशा व्यवसायात अनुकूलता वाढेल. धार्मिक कार्यात पुढाकार घ्याल. संसर्गजन्य आजारांपासून जपून असावे. गायन, वादनादि कलेचा गौरव होईल. कार्यक्षेत्रात घाईने निर्णय घेऊ नयेत. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. शुभ ता. २, ४

### कन्याः- चिंता करू नका

सर्वात मोठ्या आकर्षण म्हणजे चांगले वर्तन. कर्मस्थानी मंगळ येत आहे. त्यामुळे कार्यक्षेत्रात उत्साह, धडाडी वाढेल. राशीतील शुक्रामुळे आनंद निर्माण करणार्या घटना घडतील. लाभार्थी गुरु बुधामुळे आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. संतती बाबत शुभघटना घडतील. नव्या विचारांना चालना मिळेल. चिंता करू नका. शुभ ता. २, ६

### तुलाः- अडचणीतून मार्ग निघेल

सर्वात सुंदर ओळख म्हणजे प्रामाणिकपणा. आठवा मंगळ भाग्यस्थानी येत आहे. त्यामुळे आता अडचणीतून मार्ग निघेल. अपेक्षित संधी लाभणार आहेत. लाभ उठवावा. कर्मस्थ गुरु- बुधामुळे कार्यक्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. नव्या कामांना गती मिळेल. दैनंदिन कामात अधिक लक्ष देऊ शकाल. अनुकूलता वाढेल. शुभ ता. २, ५

### वृश्चिकः- चिकाटीने प्रगती

सर्वात मोठा विजय म्हणजे स्वतःवर मिळवलेला ताबा. राशीतील मंगळ अष्टमात येत आहे. त्यामुळे प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका, तसेच आर्थिक व्यवहार विचाराने करावेत. भाग्यवृध्दिंगत करणार्या घटना घडतील. कलेतून अर्थाजन घडेल. सामंजस्याने रहावे. चिकाटीने प्रगती होईल. शुभ ता. २, ४, ५

### धनुः- स्वमताग्रह टाळावा

सर्वात सुंदर सुगंध म्हणजे चांगल्या कमची. चतुर्थात शनि तर सातवा होणारा मंगळ त्यामुळे प्रतिकूलतेतून मार्ग काढावा लागेल. योजलेली कामे चिकाटीने व परिश्रमातून होतील. गृह सजावट, खाद्यपदार्थ कला अशा क्षेत्रात संधी संभवते. जुने येणे वसूल होईल. स्वमतग्रह टाळावा. शुभ ता. २, ६

### मकरः- उत्साहवर्धक घटना

सर्वात मौल्यवांना ते म्हणजे परस्पर आदर. सप्ताहारंभी मंगळ षष्ठात येत आहे. त्यामुळे उत्साहवर्धक घटना घडतील. कौटुंबिक जीवनात आनंद निर्माण होईल. कलेत प्रगती घडेल. अपेक्षित कामे होत असल्याने समाधान वाटेल. संततीशी मतभेदाचे प्रसंग टाळावेत. अडचणीतून मार्ग निघत जाईल. चिंता नसावी. शुभ ता. २, ६

### कुंभः- स्वास्थ लाभेल

खरे सौंदर्य बाह्यरूपात नसते. चौथा मंगळ पाचवा होत आहे. त्यामुळे आता काही प्रमाणात स्वास्थ लाभेल. गृहनिर्माण, विधी अशा क्षेत्रात चांगली प्रगती करू शकाल. नव्या योजना मार्गी लावता येतील. अडचणीतून मार्ग निधेल. सामंजस्याने रहावे. फार दगदग करू नये. अनुकूलता वाढेल. शुभ ता. २, ४

### मीनः- जपून असावे

सौंदर्य विचारात, वागणुकीत, मनाच्या निर्मळतेत असते. राशीत शनि तर सुखस्थानी येणारा मंगळ त्यामुळे मनावर एखादे दडपण येण्याची शक्यता आहे. पंचमातील बुध- गुरु समस्यातून मार्ग दाखविणारे आहेत. विलंबाने पण चांगलेच घडत जाईल. अडचणींची चिंता नको. दूरचे प्रवास टाळावेत. जपून असावे. शुभ ता. २, ५

!! शुभ भवतु !!

तत्त्वदर्शन डॉ. राजेंद्र डोळके

# कर्मविपाकाचा सिद्धांत

भारतात धार्मिक आणि तत्त्वज्ञानविषयक जे सिद्धांत आहेत, त्यातील कर्मविपाकाचा एक महत्त्वाचा सिद्धांत आहे. या सिद्धांतात एक महत्त्वाची गोष्ट गृहीत धरली जाते की, तुम्ही कर्म केलेत की त्याचे फळ तुम्हाला चिकटलेच समजा. ते फळ भोगल्याशिवाय तुमची सुटका होणारच नाही. तुम्ही कितीही खटपटी लटपटी करा. केव्हा ना केव्हातरी त्याचे परिणाम तुम्हाला भोगावेच लागणार. चांगल्या कर्माचे चांगले फळ आणि वाईट कर्माचे वाईट फळ हे ठरलेलेच आहे. म्हणून जे पेराल तेच उगवेल या न्यायाने नेहमी चांगलेच कर्म करावे म्हणजे त्याचे फळ पण चांगलेच मिळेल.

कर्मविपाकाच्या सिद्धांतात पुनर्जन्माची कल्पना मान्य करावी लागते. या जन्मात आपल्याकडून जी कर्मे होतात त्याचे फळ या जन्मात भोगावे लागतात. एवढ्यापुरताच हा मुद्दा नाही तर या जन्मात त्याची फळे भोगणे झाले नाही तर ती भोगण्याकरिता पुढील जन्म घ्यावा लागेल. एवढेच नाही, तर अनेक जन्म घ्यावे लागतील. त्याचबरोबर ज्या प्रकारची कर्मे या जन्मात आपल्याला प्राप्त होतात त्याला अनुरूप अशी कर्मे या जन्मात घडली नसतील तर ती पूर्वजन्मात घडली असतील, असेही मानावे लागते. तेव्हा केलेल्या कर्माचे फळ मनुष्याला केव्हा ना केव्हा, कोणत्या ना कोणत्या जन्मात भोगावेच लागते. यालाच कर्मविपाकाचा सिद्धांत म्हणतात. या सिद्धांतात कर्म व त्याची फळे भोगण्यासाठी घ्यावे लागणारे जन्म यांची व्यवस्थिती कर्माच्या त्रिविध विभागात सूचित झाली आहे. या प्रकारच्या सर्व कर्माचे मुख्यतः तीन भाग करता येतात. (१) क्रियमाण कर्म, (२) संचित कर्म आणि (३) प्रारब्ध कर्म.

मनुष्य सतत कर्म करीत असतो आणि त्याला त्या कर्माचे फळ मिळणार हेही ठरले असते. पण ते केव्हा मिळणार, हाच प्रमुख प्रश्न आहे. जी कर्मे केल्याबरोबर त्याचे फळ ताबडतोब मिळते त्याला क्रियमाण कर्म असे म्हणतात. आपल्याला तहान-भूक लागते. आपण खाण्याचे आणि पाणी पिण्याचे कर्म केले तर ताबडतोब क्षुधातृप्ती आणि तहान शमण्याचे फळ आपल्याला मिळते. आपण कोणाला शिव्या दिल्या तर ताबडतोब आपल्या थोबाडीत बसते. म्हणजे शिव्या देण्याच्या कर्माला थोबाडीत बसण्याचे फळ ताबडतोब प्राप्त झाले आणि कर्म शांत झाले. काही कर्मे अशी असतात की, त्याचे फळ ताबडतोब मिळत नाही. तर ते काही काळानंतर मिळते. त्यांना मसंचित कर्मेफ म्हणतात. तुम्ही सकाळी रेचक घेतले तर त्याचा परिणाम होण्यास मध्ये चार-पाच तास जावे लागतात. कोणाला मारून



तुम्ही पळून गेलात तर काही दिवसांनी तो माणूस तुमचा शोध घेऊन तुम्हाला चोप देईल. म्हणजे कर्माचे फळ मिळण्यास पुढील काही लागले. बी पेरल्यानंतर त्याचे पीक येण्यास काही ठरावीक कालावधी जाऊ द्यावा लागतो. ही सर्व संचित कर्माची उदाहरणे आहेत. संचित म्हणजे मसाठा.

आपण जी काही कर्मे करतो त्याचे फळ मिळेपर्यंत जो काही कालावधी लागतो त्याला संचित म्हणतात. म्हणजे ते तुमच्या खाते- वहीत जमा म्हणून भोगण्यासाठी शिल्लक राहिलेले असतात. एकदा का त्या कर्माची फळे भोगली म्हणजे ती कर्मे त्या साठ्यातून कमी झाली. संचित कर्माची किंवा जमा झालेल्या सर्वच कर्मांची फळे एकदम व एकत्र भोगणे शक्य नसते. शिवाय एका जन्मातही ती भोगणे शक्य नसतात. म्हणून जी संचित कर्मे परिपक्व होऊन भोगण्यासाठी तयार झालेली असतात, त्याला म्हणतात प्रारब्ध कर्म. उरलेली जी भोगण्यायोग्य तयार झालेली नसतात ती संचितात तशीच जमा राहतात. प्रारब्ध हे भोगूनच संपवावे लागते. मृत्यूपर्यंत कोणालाच चुकविता येत नाही. या जन्मात ते भोगले नाही तर पुढील जन्मात भोगावे लागते. त्याही जन्मात भोगले नाही तर पुढे अनंत जन्म घ्यावे लागतील; पण त्याचे फळ कुणाला चुकत नाही, असा हा सिद्धांत आहे. मनुष्याला प्रारब्धरूपाने फळ मिळून संचित कर्माचा साठा हळूहळू कमी होत असला, तरी दरम्यानच्या काळात त्याच्या हातून पुन्हा कर्मे घडून ती संचितात जमा होत असतात. अशारीतीने संचिताचा हा साठा कधीही रिक्त होत नसतो. ही संचित कर्मे भोगण्याचे जीवाचे हे रहाटगाडगे अव्याहतपणे चालत आलेले असते. वरील विवेचनावरून दोन गोष्टी स्पष्ट होतात. एक, आत्म्याचे अमरत्व व दोन, त्यांचे पुनः पुन्हा देह धारण करणे, म्हणजेच पुन्हा पुन्हा जन्माला येणे. आत्म्याचे अमरत्व मानल्याखेरीज या जन्मी या देहाने केलेल्या कर्माची फळे पुढच्या जन्मी भोगावे लागतात या म्हणण्याला अर्थच उरत नाही. अर्जुनाचा शोकमोह घालवून त्याला कर्तव्यपरायण करताना श्रीकृष्णाने अगोदर त्याला आत्म्याचे अमरत्वच सांगितले. म्हणजे आत्म्याचे अमरत्व हा या कर्मविपाकाच्या सिद्धांताचा आधार आहे आणि या जन्मातील कर्माची फळे पुढच्या जन्मी भोगावे लागतात, यावरून पुनर्जन्म व पूर्वजन्मही मान्य करणे हे क्रमप्राप्तच ठरते. जोपर्यंत परमेश्वराच्या कृपेने मनुष्याच्या कर्माचा नाश होत नाही तोपर्यंत त्यास या संसारयोनीतून फिरावे लागते. आपल्यामध्ये कर्म आणि त्याचे भोग भोगणे याबद्दल काही समजूती आहेत. एक वर्ग या सिद्धांताला मान्यता देणारा आहे. तो स्वर्ग, नरक, पूर्वजन्म, पुनर्जन्म यांना मान्यता देतो तर दुसरा वर्ग असे म्हणतो की, या जन्मी केलेल्या कर्माची फळे याच जन्मातच भोगायची असतात. त्यांना पूर्वजन्म, पुनर्जन्म वगैरे काहीही मान्य नाही. ते कर्मविपाकाचा सिद्धांत भ्रामक ठरवितात. त्यांचे म्हणणे असे की, हा सिद्धांत केवळ कल्पनेच्या आधारावर बनविलेला आहे. प्रत्यक्ष अनुभवाचा याला काहीही आधार नाही. आपल्या चालू जन्मातील घटनांची संगती इतर कोणत्याही जन्माच्या कल्पनेने लागत नाही. या वर्गाचे हे म्हणणे बऱ्याच अंशी तर्कसंगत वाटते.

मनुष्य जे काही कर्म करतो हे त्याला त्याच्या बुद्धीच्या आणि अनुभवाच्या साह्याने निश्चित कळत असते आणि त्याचे काय फळ मिळू शकते, हेही त्याला ठाऊक असते. त्याचबरोबर त्याची अशीही समजूत असते की, या कर्माचे फळ आपल्याला याच जन्मात मिळणार आहे. स्वर्ग, नरक, पूर्वजन्म, पुनर्जन्म वगैरे लक्षात ठेवून तो कर्मे करीत नसतो. म्हणजेच लोकांच्या भीतीने तो आपले कर्म करतो अथवा टाळतो असे नसून तो स्वतः च्या सद्सद्विवेक बुद्धीने निर्णय घेऊनच आपले कर्म करतो. पाप आणि नरक यांच्या भीतीने जर मनुष्याने वाईट कर्म न करण्याचे ठरविले तर सर्वत्र नीतिमान समाजच आढळला असता. परंतु तसे दिसत नाही. येथे कायद्याची भीती असून देखील असंख्य लोक दुष्कृत्ये करताना आढळतात, तसेच कायद्याची भीती नसताना दुष्कृत्ये टाळणारे असंख्य लोक आढळतात. जो माणूस न्याय- नीती, धर्माचे पालन करीत असतो, त्याला जीवनात खूप दुःख भोगावे लागतात. उलट अधर्म आणि अनीतीने वागणारे, काळाबाजार आणि तस्करी करणारे जीवनात मौज-मजा करीत असतात. गाडी, बंगला इत्यादी सर्व तऱ्हेच्या सुखसोयी यांची त्यांच्या जीवनात रेलचेल असते. मचोरी करणे वाईट नाही, चोरी पकडली जाणे वाईट आहे. वगैरे तत्त्वज्ञानात्मक विचार ते सांगतात.

ते कसेही असो. कर्मविपाकाचा सिद्धांत हा चांगल्या उद्देशानेच तयार झाला आहे. म्हणून हा सिद्धांत लक्षात घेऊन प्रत्येकाने चांगलेच कर्म करावे, याबद्दल दुमत होऊ शकत नाही.

पान ३ वरून

## सौजन्याचा धक्का

कार्यपद्धतीत गोड हास्याचा व सहानुभूतीपूर्ण वाक्यांचा वापर हाच काय तो बदल हे लोक करतात. परंतु तो बदल त्यांना लोकप्रिय बनवितो आणि ते ज्या कार्यालयात कार्य करतात त्या कार्यालयाचा मान वाढवितात. मुळात या लोकांची त्या कार्यालयावर मनापासून श्रद्धा असते व त्यामुळे तेथे येत असलेल्या प्रत्येकाच्या मनात कार्यालयाबद्दल चांगले मत राहावे यासाठीचा प्रामाणिक प्रयत्न हे लोक नकळतपणे करीत असतात. अशा लोकांमुळे ते कार्यालय ओळखले जाते यापेक्षा मोठी बाब ती काय असावी. याउलट या लोकांसमवेत कार्य करणारे काही लोक मात्र ताणग्रस्त असतात.

कार्यालयात येऊन तेथे सेवा घेत असलेल्या लोकांवर आपण आपले कार्य करून कार्यासोबतच अनंत उपकार करीत आहोत, अशी भूमिका त्यांनी अंगीकारली असते. खरे तर कागदपत्रे देणे, फॉर्म भरून घेणे इत्यादी कामे त्यांच्या कर्तव्याचा भाग असतो. परंतु ते कार्य केल्याबद्दल काचेच्या पलीकडच्या प्रत्येक माणसाने आपल्याबद्दल उपकृत असावे, असा काहीसा भाव या मंडळींच्या मुखमंडलावर असतो. गोड शब्द व सहानुभूतीपूर्वक वाक्ये हे काचेपलीकडच्या लोकांशी बोलायचेच नसतात, असा पक्का समज त्यांनी केलेला असतो. त्यामुळे जमेल तेवढ्या तीव्रतेने समोरच्या व्यक्तीवर खेकसून त्याचे मानसिक खच्चीकरण करण्याचे तंत्र काहींनी अवगत केलेले असते. आपल्या नेहमीच्या कार्याव्यतिरिक्त जास्तीचे कार्य वाट्याला आल्यावर हे मंडळी सारे कार्यालय डोक्यावर घेतात व आपल्या हाताखाली कार्य करीत असलेल्या सर्वांवर ओरडणे ही त्यांची क्लृप्ती असते.

आरडाओरड करून ताण घालविण्याची ही अजब पद्धत अनेक कार्यालयांमधून प्रचलित झालेली आपल्याला दिसते. ही असली मंडळी आपल्या स्मरणात राहतात, परंतु वेगळ्या अर्थाने. त्यांच्याकडे पुन्हा जाऊन अपमान न करून घेण्याचे ठरवून आपण त्यांना लक्षात ठेवतो. विविध कार्यालयांमध्ये काचेच्या पलीकडे कार्य करीत असलेल्या बंधू-भगिनींसमोर हे कायम आव्हान असायला हवे की आपण ज्या व्यवस्थेमध्ये कार्य करीत आहोत त्या व्यवस्थांचे चांगले प्रतिनिधी म्हणून आपली ओळख निर्माण करता यावी. अन्यथा कपाळावर आठ्या पाडून आणि समोर आलेल्या प्रत्येकावर उद्धटपणे ओरडून आपल्याबद्दल अपकीर्ती निर्माण करण्यापेक्षा जिभेवर साखर आणि डोक्यावर बर्फ ठेवून छान गोड बोलावे, लोकांना आपलेसे करावे व आपल्या कामाचा आनंद घ्यावा. ही सौजन्याची भूमिका घेऊन आपले गोड बोलणे व दाखविलेली सहानुभूतीच लोक लक्षात ठेवतील व पर्यायाने आपल्यालाही सुख मिळेल. शेवटी सुख म्हणजे तरी वेगळं काय असतं ? सायंकाळी आपले काम संपवून घरी जाताना मस्त आनंदात शीळ वाजवत घरी जाता यायला हवे व त्याच आनंदात घरात प्रवेश करावा. शेवटी आपल्या घरच्या लोकांनाही आपण असेच घरी आलेलो आवडत असते. होय ना?

पान ४ वरून

## सुपर अल-निनोचे संकट

कृषी क्षेत्रात बदल करून कमी पाण्यात येणाऱ्या आणि उष्णता सहन करणाऱ्या पिकांच्या वाणांचा वापर वाढवावा लागेल. तसेच शेतकऱ्यांना हवामानाचा अचूक अंदाज वेळेत देणे गरजेचे आहे. आर्थिक सुरक्षेसाठी पीक विमा योजनांची व्याप्ती वाढवून शेतकऱ्यांना वेळेत मदत देणे आणि बाजारातील साठेबाजी रोखण्यासाठी कडक कायदे करणे गरजेचे आहे. ऊर्जा क्षेत्रात जलविद्युतवरील अवलंबित्व कमी करून सौर आणि पवन ऊर्जेची क्षमता वेगाने वाढवावी लागेल. मसुपर अल- निनोफ चे संकट हे केवळ एका वर्षाचे संकट नसते, तर त्याचे आर्थिक आणि सामाजिक पडसाद पुढील अनेक वर्षे उमटत राहतात. त्यामुळे केवळ संकट आल्यावर उपाययोजना करण्यापेक्षा आधीच सज्ज होण्याची आहे. हवामान बदलाचे हे भयानक वास्तव स्वीकारून आपल्याला आपल्या विकासाचे प्रारूप बदलावे लागेल. निसर्गाशी जुळवून घेणारे तंत्रज्ञान, पाण्याचा सुजाण वापर आणि दूरगामी आर्थिक धोरणे यांच्या बळावरच आपण मसुपर अल-निनोफ सारख्या महासंकटाचा सामना करू शकतो. अन्यथा, निसर्गाच्या या अवकृपेमुळे आर्थिक प्रगतीचे रथ चक्रव्यूहात रुतून बसतील, यात शंका नाही. भविष्यातील पिढ्यांना सुरक्षित ठेवायचे असेल, तर आजच निसर्गाचा इशारा ओळखून पावले टाकावी लागतील. (लेखक पर्यावरण अभ्यासक आहेत.)

पान ५ वरून

## आपली भाषा अन् त्यांचे शब्द...

कारागीर, दिलगीर, अर्जदार, खबरदार, जाहीरनामा, राजीनामा, गाडीवाला, बिडीवाला, हुकूमशाही, कब्रस्तान, हवाबंद, दगलबाज, ऐटबाज, मुत्सद्देगिरी हे आणि असे कितीतरी शब्द तयार झाले आहेत. हे सर्व शब्द आज ओठांवर आहेत.

इंग्रजी भाषेतील अनेक शब्द आपण स्वीकारले आहेत. इंजेक्शन, अपिल, तिकीट, डॉक्टर, बटण, ग्लास, सायकल, रबर, थर्मामीटर, पेन्सिल, कप, नोटीस असे अनेक शब्द आहेत. अलिकडे तर स्मार्टफोनच्या वापरामुळे डिलीट, स्क्रीन, ईमोजी, मेसेज, चॅट, एक्झिट हे शब्द अगदी ओठांवर रुळलेले आहेत. अननस, आलमारी, चावी, तंबाखू असे पोर्तुगीज शब्दही आपल्या बोलींनी सहज स्वीकारले आहेत.

पान २ वरून

## आरोग्य हा बालहक्क आहे का?



कोविड- १९ महामारीने या वास्तवावर आणखी प्रकाश टाकला. लाखो मुलांचे नियमित लसीकरण विस्कळीत झाले, शिक्षण खंडित झाले आणि मानसिक आरोग्यावरही गंभीर परिणाम झाले. अनेक मुलांनी पालक गमावले, तर काहींना दारिद्र्य आणि उपासमारीच्या परिस्थितीला सामोरं जावं लागलं. या काळाने एक गोष्ट स्पष्ट केली- मुलांचं आरोग्य हे केवळ रुग्णालयांशी संबंधित नसून कुटुंब, शिक्षण, पोषण, स्वच्छता, मानसिक आरोग्य आणि सामाजिक संरक्षण या सर्व गोष्टींशी जोडलेलं आहे.

खरं तर आरोग्याकडे आपण अजूनही अनेकदा सेवा किंवा योजना म्हणून पाहतो. परंतु आरोग्य हा अधिकार आहे, ही जाणीव अजूनही समाजात पुरेशी रुजलेली नाही. एखाद्या मुलाला पौष्टिक आहार, स्वच्छ पाणी, लसीकरण, वेळेवर उपचार आणि मानसिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देणं हा उपकार नाही; तो त्याचा हक्क आहे आणि हक्कांची पूर्तता ही राज्याची आणि समाजाची जबाबदारी आहे. यासाठी केवळ आरोग्य विभागावर अवलंबून राहून चालणार नाही. बाल आरोग्याचा प्रश्न हा शिक्षण, महिला व बालविकास, पाणीपुरवठा, स्वच्छता, पोषण, सामाजिक न्याय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांशीही निगडित आहे. बालकेंद्रित धोरणे, प्राथमिक आरोग्य व्यवस्थेची बळकटी, मानसिक आरोग्य सेवांचा विस्तार, पोषण कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी आणि सर्वाधिक वंचित मुलांपर्यंत पोहोचणाऱ्या सेवा ही काळाची गरज आहे. महात्मा गांधी यांनी म्हटलं होतं, एखाद्या समाजाचं नैतिक आरोग्य त्याने आपल्या सर्वात दुर्बल घटकांशी कसं वागलं यावरून ठरतं. मुलांपेक्षा अधिक दुर्बल आणि अधिक महत्त्वाचा घटक दुसरा कोणता असू शकतो? म्हणूनच मआरोग्य हा बालहक्क आहे का? या प्रश्नाचं उत्तर केवळ कायद्यांमध्ये किंवा धोरणांमध्ये शोधून चालणार नाही. ते उत्तर प्रत्येक अंगणवाडीत, प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात, प्रत्येक शाळेत आणि प्रत्येक घरात दिसलं पाहिजे. कारण एखाद्या राष्ट्राची खरी ताकद त्याच्या सैन्यात, अर्थव्यवस्थेत किंवा तंत्रज्ञानात नसते; ती त्या राष्ट्रातील मुलांच्या निरोगी बालपणात असते; आणि जोपर्यंत प्रत्येक मुलाला आरोग्याचा हक्क प्रत्यक्षात मिळत नाही, तोपर्यंत विकासाची कोणतीही कथा पूर्ण होऊ शकत नाही. आरोग्य हा मुलांवर केलेला उपकार नाही; तो त्यांच्या जन्मासोबत मिळालेला मूलभूत मानवी हक्क आहे.

पान २ वरून

## कुंकू

बोलणी झाली. पारू उठली.

अजित तुझी वाट पाहत असेल समुद्रावर... तू जा सारजा. भेट त्याला. रात्रभर झोपला नाही तो. त्याला तेवढंच बरं वाटेल. सारजानं होकार- नकार दिलाच नाही अन् धावतच सुटली.

अजित घरजावई म्हणून शंकरच्या घरी राहायला गेला. त्या रात्री मेघा आईला म्हणाली, आई...

आता दादा कधीच आपल्या घरी येणार नाही का गं? नाही बेटा... कधीच येणार नाही.

माझं लग्न झाल्यावरसुद्धा.

तरीही! मग तू एकटीच?

एकटी कशी... तुझे बाबा येतील. माझ्या सोबतीला.


तुला अजून खात्री आहे बाबाच्या येण्याची?

हो. म्हणूनच तर मी गेली २० वर्षे कपाळाला कुंकू लावतेय. मेघा आईकडे पाहातच राहिली... बराच वेळ !

# फुटबॉलच्या नव्या युगाची सुरुवात

क्रिडांगण **महेश धर्माधिकारी**

**फुटबॉल विश्वचषक हा केवळ एका संघाच्या विजयाचा किंवा पराभवाचा इतिहास नसतो; तो एका पिढीच्या फुटबॉल संस्कृतीचा, खेळाडूंच्या मानसिक ताकदीचा आणि बदलत्या जागतिक फुटबॉलचा आरसा असतो. अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको या तीन देशांनी संयुक्तपणे आयोजित फुटबॉल विश्वचषकाने याची पुन्हा प्रचीती दिली. ४८ संघांच्या विस्तारित स्पर्धेमुळे स्पर्धात्मकता वाढली, अखेरीस स्पेनने अर्जेंटिनाला पराभूत करत दुसऱ्यांदा विश्वचषकावर नाव कोरले.**






फुटबॉल विश्वचषक हा केवळ एका संघाच्या विजयाचा किंवा पराभवाचा इतिहास नसतो; तो एका पिढीच्या फुटबॉल संस्कृतीचा, प्रशिक्षकांच्या डावपेचांचा, खेळाडूंच्या मानसिक ताकदीचा आणि बदलत्या जागतिक फुटबॉलचा आरसा असतो. अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको या तीन देशांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या २०२६ मधील फुटबॉल विश्वचषकाने याची पुन्हा एकदा प्रचीती दिली. ४८ संघांच्या विस्तारित स्पर्धेमुळे स्पर्धात्मकता वाढली, अनेक नवोदित संघांनी दिग्गजांना धक्का दिला आणि अखेरीस स्पेनने अर्जेंटिनाला १-० ने पराभूत करत दुसऱ्यांदा विश्वचषकावर आपले नाव कोरले. फेरान टोरेसने अतिरिक्त वेळेत निर्णायक गोल केला. या विश्वचषकाकडे संपूर्ण जगाचे लक्ष वेधण्याचे आणखी एक कारण म्हणजे लिओनेल मेस्सी. २०२२ मध्ये अर्जेंटिनाला विश्वविजेते बनवणाऱ्या या महान खेळाडूचा हा अखेरचा विश्वचषक मानला जात होता. फुटबॉलप्रेमींच्या मनात एकच प्रश्न होता, मेस्सी पुन्हा एकदा इतिहास घडवणार का? उपांत्य फेरीपर्यंत अर्जेंटिनाने त्याचे सकारात्मक उत्तर दिले होते.

न्यू जर्सीतील मेटलाईफ स्टेडियमवर रंगलेला अंतिम सामना हा दोन संघांतील नव्हता; तो दोन भिन्न फुटबॉल तत्त्वज्ञानांमधील संघर्ष होता. अर्जेंटिनाकडे मेस्सीचा अनुभव, खेळावरील नियंत्रण आणि वैयक्तिक प्रतिभा होती. दुसरीकडे स्पेनकडे जलद पासिंग, चेंडूवरील वर्चस्व, सामूहिक बचाव आणि अत्यंत शिस्तबद्ध संघरचना होती. सामन्याच्या सुरुवातीपासून स्पेनने चेंडूवर वर्चस्व राखले. रॉड्री, गावी आणि पेड्री यांच्या माध्यमातून स्पेनने मध्यफळीवर पकड मजबूत ठेवली. अर्जेंटिनाने मात्र बचाव अधिक भक्कम ठेवत प्रतिआक्रमणांवर भर दिला. त्यामुळे पहिल्या ९० मिनिटांमध्ये गोल झाला नाही. पण स्पेनने निर्माण केलेल्या संधींची संख्या अर्जेंटिनापेक्षा लक्षणीय जास्त होती. अंतिम सामन्याचा विचार केला तर गोल करणारा खेळाडू फेरान टोरेस असला तरी विजयाची पायाभरणी रॉड्रीने केली. रॉड्रीने सतत चेंडू स्वतःकडे ठेवला, अर्जेंटिनाच्या आक्रमणाचा वेग कमी केला आणि प्रत्येक आक्रमणाची सुरुवात शांतपणे केली. अचूक पासिंगमुळे स्पेनचा खेळ कधीही विस्कळीत झाला नाही. संपूर्ण स्पर्धेतील सातत्यपूर्ण कामगिरीमुळे त्याला गोल्डन बॉल अर्थात स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कार मिळाला. अनेकदा अंतिम सामना एका क्षणावर विजेता ठरवतो. २०२६ च्या विश्वचषकात तो क्षण १०६ व्या मिनिटाला आला. बदली खेळाडू म्हणून मैदानात उतरलेल्या फेरान टोरेसने अर्जेंटिनाच्या बचावातील क्षणिक ढिलाईचा अचूक फायदा घेत चेंडू जाळ्यात धाडला आणि स्पेनला ऐतिहासिक आघाडी मिळवून दिली. अतिरिक्त वेळेत झालेला हा गोलच विश्वविजेतेपदाचा निर्णय ठरला. त्याच्या या खेळामुळे अर्जेंटिनाला सतर्क राहावे लागले.

स्पेनच्या विश्वविजेतेपदामागे गोलरक्षक उनाय सिमॉन यांचे योगदान महत्त्वाचे होते. अंतिम सामन्यात मेस्सी आणि ज्युलियन अल्वारेझ यांचे प्रयत्न त्याने उत्कृष्ट बचाव करत रोखले.

विशेषतः अतिरिक्त वेळेतील त्याचे दोन बचाव स्पेनसाठी निर्णायक ठरले. संपूर्ण स्पर्धेत सातत्यपूर्ण कामगिरीमुळे त्याला 'गोल्डन ग्लोव्ह' पुरस्काराने गौरविण्यात आले. स्पेनच्या तरुण स्टार लामिन यामाने अंतिम सामन्यात गोल केला नाही. पण उजव्या विंगवरून त्याने अर्जेंटिनाच्या बचावाला अक्षरशः हैराण केले. त्याच्या वेगवान धावा, अचूक क्रॉस आणि सततच्या हालचालींमुळे अर्जेंटिनाला बचावात अतिरिक्त खेळाडू ठेवावे लागले. परिणामी, मध्यभागी स्पेनला अधिक मोकळी जागा मिळाली. विश्वचषकाच्या अंतिम सामन्यासारख्या दडपणाच्या वातावरणातही त्याने आत्मविश्वास गमावला नाही. स्पेनच्या प्रशिक्षकांनी त्याच्यासाठी विशेष रणनीती आखली होती. मेस्सीला चेंडू मिळताच रॉड्री, गावी किंवा एरिक गार्सिया यांपैकी दोन खेळाडू त्याच्यावर त्वरित दबाव आणत होते. त्याला नेहमीप्रमाणे मोकळ्या जागा मिळाल्या नाहीत. तरीही काही प्रसंगी त्याने अप्रतिम पास देऊन संधी निर्माण केल्या; परंतु अर्जेंटिनाच्या आक्रमकांना त्या गोलमध्ये रूपांतरित करता आल्या नाहीत.

हीच या अंतिम सामन्याची सर्वात मोठी शोकांतिका ठरली. अर्जेंटिनाचा पराभव केवळ अतिरिक्त वेळेतील एका गोलामुळे झाला, असे म्हणणे अपूर्ण ठरेल. या सामन्यात तब्बल १० गोल करण्यात आले. इंग्लंडच्या बुकायो साकाने महॅट ट्रिकफ नोंदविली तर फ्रान्सकडून किलियन एम्बाप्पेने दोन गोल नोंदविले. शेवटी इंग्लंडने हा सामना ६-४ असा जिंकून स्पर्धेत तिसरे स्थान पटकाविले. उपांत्य फेरीत पराभव झाल्यानंतर अनेक संघ मानसिकदृष्ट्या खचतात. मात्र इंग्लंडने नेमके उलट चित्र दाखवले. सुरुवातीपासूनच आक्रमक भूमिका घेत त्यांनी फ्रान्सला बचावात्मक खेळ करण्यास भाग पाडले. सामन्याचा वेग, विंगवरून उभारलेले हल्ले आणि चेंडूवरील नियंत्रण यामुळे इंग्लंडने सामना आपल्या बाजूने झुकवला. या सामन्यात बुकायो साका हा इंग्लंडचा सर्वात प्रभावी खेळाडू ठरला. उजव्या विंगवरून त्याने दाखवलेला वेग, ड्रिब्लिंग आणि अचूक फिनिशिंग यामुळे फ्रान्सचा बचाव वारंवार विस्कळीत झाला. त्याच्या प्रत्येक धावेमुळे फ्रेंच बचावफळीवर दबाव वाढत होता. या विश्वचषकातील सर्वात मोठ्या चर्चांपैकी एक म्हणजे गोल्डन बूटसाठीची चुरस. उपांत्य फेरीपर्यंत लिओनेल मेस्सी, किलियन एम्बाप्पे, ज्युलियन अल्वारेझ आणि स्पेनच्या आक्रमक खेळाडूंमध्ये गोलसंख्येची स्पर्धा रंगली होती. त्यामुळे अंतिम सामना आणि तिसऱ्या स्थानाचा सामना हे केवळ सांघिक विजेतेपदासाठी नव्हते, तर वैयक्तिक सन्मानासाठीही तितकेच महत्त्वाचे ठरले. दुसरीकडे अंतिम सामन्यात स्पेनच्या अभेद्य बचावामुळे मेस्सीला गोल करता आला नाही. त्यामुळे अखेरीस गोल्डन बूट एम्बाप्पेकडे गेला. विश्वचषक जिंकता आला नसला, तरी सर्वाधिक गोल करणारा खेळाडू म्हणून त्याने पुन्हा एकदा आपल्या गुणवत्तेची छाप उमटवली. आधुनिक फुटबॉलमधील सर्वात धोकादायक स्ट्रायकर म्हणून या स्पर्धेने त्याचे स्थान अधिक भक्कम केले. गोल्डन बूट जितका चर्चेत होता, तितकाच गोल्डन बॉल पुरस्कारही चर्चेचा विषय ठरला. हा पुरस्कार स्पेनच्या रॉड्रीने पटकावला. आधुनिक फुटबॉलमध्ये मिडिफल्डर हा संघाचा मेंदू असतो आणि रॉड्रीने ही भूमिका उत्कृष्टरीत्या निभावली. विश्वविजेतेपद केवळ गोल करणाऱ्यांमुळे मिळत नाही; ते गोल रोखणाऱ्यांमुळेही मिळते. स्पेनचा गोलरक्षक उनाय सिमॉन हा संपूर्ण स्पर्धेत संघाचा सर्वात विश्वासार्ह खेळाडू ठरला. त्याने निर्णायक क्षणी केलेले बचाव, कॉर्नरवरील नियंत्रण आणि बचावपटूंशी असलेला समन्वय यामुळे स्पेनची बचावफळी अभेद्य बनली. त्याला मिळालेला मगोल्डन ग्लोव्ह पुरस्कार म्हणजे त्याच्या सातत्यपूर्ण कामगिरीचीच पावती होती. विशेष म्हणजे, चेंडू पायाशी ठेवून खेळ उभारण्याची त्याची क्षमता स्पेनच्या बिल्ड-अप फुटबॉलमध्ये अत्यंत महत्त्वाची ठरली. या विश्वचषकाची आणखी एक जमेची बाजू म्हणजे नवोदित खेळाडूंचा उदय. स्पेनच्या लामिन यामाने तरुण वयात दाखवलेला आत्मविश्वास, धान्सच्या युवा आक्रमकांची चमक, इंग्लंडच्या नव्या पिढीची जिद्द आणि दक्षिण अमेरिकन संघांमधील नवोदित खेळाडूंची गुणवत्ता यामुळे पुढील दशक जागतिक फुटबॉलसाठी अधिक रोमांचक ठरणार असल्याचे स्पष्ट झाले.

२०२६ च्या विश्वचषकाने एक महत्त्वाचा बदल अधोरेखित केला. पूर्वी महान खेळाडूंच्या वैयक्तिक कौशल्यावर सामने जिंकले जात असत; आज मात्र संघरचना, डेटा विश्लेषण, फिटनेस, उच्च दर्जाचे प्रशिक्षण आणि सामूहिक शिस्त यांना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. स्पेनचा विजय हा याच आधुनिक फुटबॉलचा विजय होता. त्यांनी संपूर्ण स्पर्धेत कोणत्याही एका सुपरस्टारवर अवलंबून न राहता प्रत्येक खेळाडूकडून त्याची भूमिका अचूकपणे बजावून घेतली. प्रशिक्षकांच्या डावपेचांची अंमलबजावणी शंभर टक्के करण्याची क्षमता हेच त्यांच्या यशाचे गमक ठरले. दुसरीकडे अर्जेंटिनाने मेस्सीच्या नेतृत्वाखाली शेवटपर्यंत संघर्ष केला. विजेतेपद हुकले असले तरी त्यांच्या जिद्दीने चाहत्यांची मने जिंकली. मेस्सीने आपल्या अखेरच्या विश्वचषकात पुन्हा एकदा आपण फुटबॉल इतिहासातील सर्वश्रेष्ठ खेळाडूंपैकी एक का आहोत, दाखवले. या विश्वचषकाने पुन्हा एकदा दाखवून दिले की, फुटबॉल हा केवळ गोल्सचा खेळ नाही; तर रणनीती, मानसिक ताकद, संघभावना, सातत्य आणि योग्य क्षणी योग्य निर्णय घेण्याच्या कलेचा उत्सव आहे. विश्वचषकानंतर फुटबॉलचा चेहरा बदलत असतो. २०२६ च्या स्पर्धेनेही नव्या युगाची नांदी दिली आहे. आता जगाचे लक्ष पुढील विश्वचषकाकडे लागले असले, तरी स्पेनचा सुवर्णउदय, मेस्सीचे अपूर्ण स्वप्न आणि एम्बाप्पेच्या गोल्डन बूटची शर्यत दीर्घकाळ राहणार आहे.

# आंदोलनजीवींची कोंडी...

**वांगचूक यांना जंतरमंतरवरुन उचलल्यानंतर तीव्र झालेल्या आंदोलनाची धग, आता त्याच वांगचूक यांनी उपोषण सोडल्यावर आपसुकच ओसरण्याची चिन्हे अधिक. तसेच पंतप्रधान मोदींनी केवळ पेपरफुटी प्रकरणातील आरोपींवर कारवाईचे केवळ आश्वासनच दिले नाही, तर याच अधिवेशनात त्याविरोधात कडक कायदाही पारित होईल. त्यामुळे तरुणांची माथी भडकावून त्यांना दिल्लीपासून ते गल्लीपर्यंत वेठीस धरणाऱ्या आंदोलनजीवींची आता पुरती कोंडी झालेली दिसते.**

आकलन **प्रतिनिधी**

पालीवर हल्ला केला, तर ती आपली शेपटी तोडते आणि ती तुटलेली शेपटी आपणहूनच काहीकाळ वळवळत राहते. तिच्यात जीव नसतो; पण तरीही ती नैसर्गिकरीत्या काहीकाळ ती वळवळत राहते आणि नंतर शांत होते. दिल्लीतील कथित विद्यार्थी आंदोलनाची, म्हणजे 'कॉकरोच जनता पार्टी'च्या आंदोलनाची अवस्था आता पालीच्या तुटलेल्या शेपटीसारखीच. झुरळांना शेपटी नसली, तरी झुरळ पाठीवर पडल्यास त्याला पुन्हा स्वतःहून सहजासहजी सरळ होता येत नाही आणि ते हवेतच हातपाय हलवीत राहते. ज्या सोनम वांगचूक यांना पुढे करून, त्यांना या आंदोलनाचा चेहरा करून झुरळांनी दिल्लीतील जंतरमंतरवर आंदोलन सुरू केले, त्या वांगचूक यांनी गुरुवारी रात्रीच केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांच्या उपस्थितीत आपले उपोषण सोडले. ते सोडतानाही त्यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याचा विषय उपस्थित केला नाही. आता वांगचूक यांनी उपोषण सोडल्यावर झुरळांनी आपले आंदोलन सुरू ठेवण्यासाठी नवे कारण शोधले आहे.

वांगचूक यांनी उपोषण सोडल्यावर आंदोलनकर्त्या झुरळांची कोंडी झाली. वांगचूक यांनी उपोषण सोडल्यानंतरही आपले आंदोलन सुरूच राहील, असे 'सीजेपी'ने जाहीर केले. कारण, त्यांना आता एकाएकी माघार घेता येत नाही. त्यांनी धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याचा प्रश्न प्रतिष्ठेचा केला आहे. तेव्हा त्यांनी आता तीन मागण्या लावून धरल्या आहेत. राजीनाम्याखेरीज ज्या विद्यार्थ्यांनी पेपरफुटीमुळे आत्महत्या केल्या, त्यांच्या परिवाराला एक कोटी रुपयांची भरपाई देणे आणि विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज करणार्या पोलिसांवर कारवाई करणे, अशा या मागण्या आहेत. 'सीजेपी'चे दोन प्रतिनिधी काल जे. पी. नड्डा यांना भेटले आणि त्यांनी आपल्या या मागण्यांचे निवेदन पुन्हा त्यांना दिले.

तिकडे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही आपले समांतर आंदोलन सुरूच ठेवले. रस्त्यावरील आंदोलनाबरोबरच त्यांनी संसदेतही गोंधळ रेटून नेला. आपल्या तीन मागण्या मान्य झाल्याशिवाय संसदेत कामकाज होऊ देणार नाही, अशी प्रतिज्ञाही राहुल गांधी यांनी पत्रकारांशी बोलताना केली. प्रधान यांच्या राजीनाम्यासह त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांची माफी मागावी आणि अशा मागण्या केल्या आहेत. त्या मान्य होण्याची शक्यताच नाही.

पेपरफुटीविरोधातील आंदोलन हे आता काँग्रेस व आम आदमी पार्टी यांच्यातील राजकीय चढाओढीचे प्रतीक बनलेले दिसते. खरे म्हणजे, आम आदमी पार्टीचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनीच ते दीपकेला आधी छुपे बळ देऊन सुरू केले. त्यांच्या आंदोलनाला प्रारंभी जरी काही प्रतिसाद लाभला नसला, तरी दि. २० जुलै रोजी अचानक डाव्या आणि देशद्रोही गँगने आपले हस्तक मोठ्या प्रमाणावर आंदोलनस्थळी उतरविले आणि दिल्लीत दंगलसदृश परिस्थिती उसळली.

'सीजेपी'च्या आंदोलनाला प्रचंड प्रसिद्धी मिळत आहे, हे पाहिल्यावर त्याचा राजकीय लाभ उचलण्यासाठी राहुल गांधी यांनी आपले एक वेगळे आंदोलन सुरू केले. त्यांनी आजवर जंतरमंतरवरील आंदोलनाविषयी एक शब्दही उच्चारलेला नाही किंवा तेथे ते भेट देण्यासही गेलेले नाहीत. त्यांनी संसदेत आपल्या खासदारांच्या गँगला गोंधळ घालण्याचे आदेश दिले आणि रस्त्यावर उतरून मोदी यांच्या अधिकृत निवासस्थानाबाहेर 'ठिय्या' आंदोलन सुरू केले. त्यांनीही आपल्या तीन मागण्या सरकारकडे केल्या आहेत.



इतके दिवस या आंदोलनावर पंतप्रधान मोदी किंवा गृहमंत्री अमित शाह यांनी कसलेच भाष्य केलेले नव्हते. मात्र, गुरुवारी रात्री उशिरा मोदी यांनी पेपरफुटीच्या गुन्ह्याला आळा घालण्यासाठी काही महत्त्वाचे निर्णय जाहीर केले. पहिली गोष्ट म्हणजे, पेपरफुटीची प्रकरणे हाताळण्यासाठी देशभरात पाच फास्ट ट्रॅक न्यायालये स्थापन केली जातील. त्यांपैकी पहिले न्यायालय दिल्लीत स्थापनही झाले आहे. या प्रकरणांचा निकाल तीन महिन्यांत दिला जाईल. गुन्हेगाराला दहा वर्षे कारावास आणि दहा कोटी रुपयांचा दंड आकारला जाईल. हे निर्णय मोदी यांनी स्वतःच एका सेल्फीसदृश्य व्हिडिओद्वारे सोशल मीडियावरून जाहीर केले आहेत. याचा अर्थ, इतके दिवस सरकार या प्रकरणाला आळा घालण्याच्या उपाययोजनांवर विचार करीत होते, हे दिसून येते. यासंदर्भातील विधेयक येत्या सोमवारी लोकसभेत सादर केले जाईल, असे सांगितले जाते.

या निर्णयानंतर हे आंदोलन आता संपुष्टात आले पाहिजे; पण विद्यार्थ्यांचे हित नव्हे, तर आपला राजकीय लाभ हाच प्रमुख उद्देश असल्याने काँग्रेस आणि झुरळांचा पक्ष ते आंदोलन सुरूच ठेवतील, अशी शक्यता आहे. प्रधानांचा राजीनामा या एकाच मुद्द्यावर सरकारविरोधात हल्ले सुरू ठेवले जातील. कारण, विद्यार्थ्यांचे हित हा या आंदोलनाचा हेतूच नाही.

खरा हेतू आहे, तो परदेशातून मिळणार्या लाखो डॉलरच्या देणग्या स्वीकारण्यावर निर्बंध आणणारे विधेयक (एफसीआरए) सरकारला काही केल्या संसदेत सादर करू न देणे! हा काँग्रेससह सर्व विरोधी पक्षांचा एकमेव उद्देश आहे. कारण, या देणग्यांच्या रसदीवरच भारतात सरकारविरोधी आणि देशविरोधी कारवाया करणार्या स्वयंसेवी संस्था या विरोधकांमार्फत चालविल्या जातात. वांगचूक यांनीही उपोषण केले. कारण, त्यांच्या संस्थेचा परवानाही रद्द झाला आहे. आम आदमी पार्टी मुळातच अशा स्वयंसेवी संस्थांचे राजकीय विस्तारीकरण आहे. त्यामुळे हे विधेयक मांडू न देण्यासाठी संसदेचे कामकाज चालू न देणे आणि त्यासाठी प्रधान यांचा राजीनामा ही सबब पुढे करणे, हा खेळ सुरू ठेवला जाईल. विरोधकांकडे मोदी सरकारविरोधात कोणताही ठोस मुद्दा नाही.

येत्या सात-आठ महिन्यांत पाच राज्यांमध्ये निवडणुका आहेत. तोपर्यंत सरकारला बचावात्मक भूमिकेत आणि आपले हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी विरोधकांकडून असे वांझोटे राजकारण केले जाईल.

मोदी सरकार त्यावर कोणता तोडगा काढते, ते पाहावे लागेल. अर्थात 'सीएए', शेतकरी आंदोलन यांसारखी आंदोलने कशी हाताळावीत, याचा मोदी सरकारला चांगलाच अनुभव आहे. त्यामुळे या आंदोलनातूनही सकारात्मक मार्ग निघेल आणि विरोधक नेहमीप्रमाणेच तोंडावर आपटतील, हे निश्चित!

गेली चार वर्षे सुरू असलेले रशिया-युक्रेन युद्ध अद्यापही सुरू आहे. या युद्धात युक्रेनने रशियाच्या तेलशुद्धीकरण प्रकल्पांना लक्ष्य केल्याने रशियाबरोबरच जागतिक इंधनपुरवठा बाधित झाला आहे. अशा वेळी भारताने मात्र त्याच्या शुद्धीकरण प्रकल्पांच्या क्षमतेचा पूर्ण वापर करून रशियाचे तेल शुद्ध करण्यास सुरुवात केली आहे. यामुळे रशिया आणि जागतिक पुरवठा साखळीला दिलासा मिळण्याबरोबरच, भारतालाही आर्थिक आणि धोरणात्मक लाभ होत आहे. या सर्वांचा मागोवा घेणारा हा लेख...

# संकट जेव्हा संधी ठरते...



राष्ट्ररक्षा
हेमंत महाजन

अफ्रिक्रेनने रशियाच्या तेल शुद्धीकरण कारखान्यांवर केलेल्या ड्रोन-हल्ल्यांमुळे जागतिक ऊर्जा बाजारात अभूतपूर्व बदल झाला आहे. यामुळे रशियाची ६० टक्के ते ७० टक्के तेल शुद्धीकरण क्षमता बाधित झाल्याचा अंदाज आहे. ही हानी एवढी मोठी आहे की, जगातील एका महाकाय तेल उत्पादक देशाला आपल्याच गरजांसाठी भारतावर निर्भर राहावे लागत आहे.

**रशियातील इंधनाचा तुटवडा किती मोठा?**

६० टक्के ते ७० टक्के तेल क्षमता नष्ट होणे, हे अत्यंत गंभीर संकट मानले जाते. यामुळे रशियाच्या देशांतर्गत बाजारपेठेवर पुढील तीव्र परिणाम झाले आहेत.

**२१ वर्षांतील सर्वांत नीचांकी पातळी**

या हल्ल्यांमुळे रशियातील कच्चे तेलशुद्धीकरणाचा वेग प्रतिदिन ३.९१ दशलक्ष बॅरल्सवर आला आहे. हा रशियाच्या गेल्या २१ वर्षांतील मोठा नीचांक आहे. रशियाकडे कच्चे तेल मोठ्या प्रमाणावर आहे. पण, त्याचे पेट्रोल-डिझेलमध्ये रूपांतर करणाऱ्या यंत्रणाच उद्ध्वस्त झाल्या आहेत.

**इंधनाची रेशनिंग**

रशियातील ५० वेगवेगळ्या प्रांतांमध्ये पेट्रोल आणि डिझेलचा तीव्र तुटवडा जाणवू लागल्याने याचा थेट फटका सुमारे पाच कोटी नागरिकांना बसतो आहे. रशियाच्या ताब्यातील क्रिमियासारख्या भागात तर इतकी आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली आहे की, तिथल्या नागरिकांना पेट्रोलसाठी इलेट्रॉनिक व्हाऊचर्सचा वापर करावा लागत आहे. तसेच एका वेळी ठरावीक इंधन नागरिकांना दिले जात आहे.

**निर्यातीवर पूर्ण बंदी**

रशिया हा जागतिक डिझेल पुरवठा साखळीतील अग्रगण्य देश. परंतु, स्वतःच्या देशातील नागरिकांना आणि लष्कराला इंधन कमी पडू नये म्हणून, रशियाने पेट्रोल, डिझेल आणि विमान इंधनाच्या आंतरराष्ट्रीय निर्यातीवरच कायदेशीर बंदी घातली आहे. रशियाला दररोज सुमारे १ लाख, १० हजार टन पेट्रोलची गरज असते. उन्हाळ्यात हा वापर आणखी वाढतो. हा तुटवडा भरण्यासाठी रशियाला आता शेजारील बेलारूस, कझाकस्तान आणि सर्वांत प्रामुख्याने भारतासारख्या देशाकडून इंधन आयात करावी लागत आहे.

**ही आयात किती काळ सुरू राहील?**

रशियाने भारताकडून इंधन आयात करणे, हा आणीबाणीचा उपाय आहे. रशियाला या संकटातून इतक्यात मार्ग काढणे अशक्य आहे. तज्ज्ञांच्या मते, रशियाला भारताकडून इंधन आयात करण्याची ही प्रक्रिया किमान २०२६च्या अखेरपर्यंत किंवा त्याहून अधिक काळ सुरू ठेवावी लागेल. त्याची मुख्य दोन कारणे पुढीलप्रमाणे :

**अ) आंतरराष्ट्रीय निर्बंधांमुळे अडथळे**

रशियातील बहुतांश आधुनिक तेल शुद्धीकरण कारखान्यांमध्ये अमेरिका आणि युरोपीय देशांचे तंत्रज्ञान वापरले जाते. अनेक सुट्या भागांसाठीही याच देशांवर रशिया अवलंबून आहे. युक्रेन युद्धाच्या सुरुवातीलाच पाश्चात्त्य देशांनी रशियावर कठोर निर्बंध लादल्याने हे सुटे भाग रशियाला थेट विकत घेता येत नाहीत. ते भाग चोरट्या मार्गाने किंवा तिसर्‍या देशाच्या मदतीने मागवण्यात रशियाला बराच काळ लागत आहे.

**ब) युक्रेनचे सातत्यपूर्ण ड्रोन-हल्ले**

हा संघर्ष अजूनही थांबलेला नाही. रशियाने एखादी रिफायनरी दुरुस्त जरी केली, तरी युक्रेनचे लांब पल्ल्याचे ड्रोन पुन्हा तिथे हल्ला करू शकतात. जोपर्यंत हे युद्ध पूर्णपणे थांबत नाही आणि रशियाच्या हवाई सुरक्षेला पूर्ण हमी मिळत नाही, तोपर्यंत रशियन रिफायनरीज सुरक्षित राहणे कठीण आहे. परिणामी, त्यांना भारताच्या रिफायनरी क्षमतेवर अवलंबून राहावेच लागेल.

**या आयातीमुळे भारताला झालेले फायदे**

संपूर्ण व्यापाराच्या चक्रात भारतासाठी फायदेशीर स्थिती निर्माण झाली आहे. भारत रशियाकडून स्वस्त दरात कच्चे तेल खरेदी करतो. हे तेल भारतातील 'रिलायन्स' किंवा 'नायरा'सारख्या कंपन्या शुद्ध करतात आणि त्यापासून तयार झालेले पेट्रोल-डिझेल पुन्हा रशियालाच जागतिक बाजारभावाने विकतात. यामुळे भारताला मोठेच फायदे झाले आहेत.

**आर्थिक फायदे :** भारताच्या खासगी आणि सरकारी तेल कंपन्या सध्या विक्रमी नफा कमावत आहेत. रशियावरच्या पाश्चात्त्य देशांच्या निर्बंधांमुळे रशिया आपले कच्चे तेल जगाला विकू शकत नाही. त्यामुळेच ते भारताला कमी किमतीत मिळते. हे स्वस्त तेल शुद्ध करून त्याचा मोठा नफा भारत ते तेल रशियाला किंवा इतर पाश्चात्त्य देशांना विकून कमावतो आहे. यामुळेच 'ग्रॉस रिफायनिंग मार्जिन' भारतासाठी सर्वोच्च आहे. या नफ्यामुळेच भारताला संकटकाळात पेट्रोल आणि डिझेलच्या किमती स्थिर ठेवता आल्या.

**व्यापारात विक्रमी वाढ**

आज भारताच्या एकूण तेल आयातीपैकी, ५० टक्क्यांहून अधिक वाटा एकट्या रशियाचाच आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर तेल व्यापारामुळे भारताच्या ऊर्जा क्षेत्राला मोठीच चालना मिळाली असून, देशात रोजगाराच्या संधी आणि परकीय चलनाचे साठे वाढण्यास मदत झाली आहे.

**धोरणात्मक आणि राजकीय फायदे-रशियावर भारताचे वाढलेले वर्चस्व**

गेल्या अनेक दशकांपासून भारत आपल्या शस्त्रास्त्रांसाठी आणि आंतरराष्ट्रीय राजकारणात रशियाच्या पाठिंब्यावर अवलंबून असे. परंतु, आता परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. रशिया आर्थिकदृष्ट्या आणि देशांतर्गत व्यवस्था चालवण्यासाठी भारतावर अवलंबून आहे. भारताने कच्चे तेल खरेदी करणे बंद केल्यास, रशियाची अर्थव्यवस्था कोसळेल आणि भारताने डिझेल पुरवणे बंद केले, तर रशियातील वाहतूक ठप्प होईल. यामुळे जागतिक राजकारणात भारताचे पारडे रशियापेक्षा जड झाले आहे.

**'रुपया-रुबल' व्यापाराचा तिढा सुटला**

रशियाने भारताला कच्चे तेल विकून कोट्यवधी रुपये कमावले होते. पण, आंतरराष्ट्रीय नियमांमुळे रशियाला हे भारतीय रुपये आंतरराष्ट्रीय बाजारात वापरता येत नव्हते की, ते रशियात नेता येत नव्हते. रशियाच्या बँकेत अब्जावधी रुपये पडून होते. आता रशिया याच रुपयांचा वापर करून भारताकडून पेट्रोल आणि डिझेल खरेदी करत आहे. यामुळे दोन्ही देशांमधील पैशांच्या देवाणघेवाणीचा मोठाच प्रश्न सुटला आहे.

**ऊर्जा बाजारात महत्त्वाची भूमिका**

भारत सध्या जागतिक ऊर्जा बाजारात एक अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. अमेरिकेसह पाश्चात्त्य देशांना हे माहीत आहे की, भारताने रशियन तेल खरेदी केले नाही, तर जगात तेलाचा तुटवडा निर्माण होईल आणि पेट्रोलचे भाव गगनाला भिडतील. त्यामुळे ते भारताच्या या व्यापाराला विरोध करू शकत नाहीत. दुसरीकडे रशियाला स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठीही भारताची गरज आहे.

**जागतिक ऊर्जा पुरवठा साखळी अस्थिर**

जागतिक युद्धांमुळे आणि ट्रम्प यांच्या 'टॅरिफ' युद्धामुळे जागतिक ऊर्जा पुरवठा साखळी, समुद्री व्यापारमार्ग आणि ऊर्जा बाजारपेठा अधिक अस्थिर झाल्या आहेत. अशा अत्यंत गुंतागुंतीच्या आणि आव्हानात्मक वातावरणात भारताने आपल्या ऊर्जासुरक्षेचे संरक्षण उल्लेखनीय पद्धतीने केले. त्याहून महत्त्वाचे म्हणजे, भारताने या संकटाचे रूपांतर एका मोठ्या आर्थिक आणि सामरिक संधीतही केले. याचेच ताजे उदाहरण म्हणजे, भारत आणि रशिया यांच्यातील विकसित ऊर्जा सहकार्य.

रशियातील अनेक तेल शुद्धीकरण केंद्रांवर युक्रेनने केलेल्या ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ल्यांमुळे तेथील इंधन उत्पादन क्षमतेवर परिणाम झाला. परिणामी, काही भागांमध्ये पेट्रोल आणि डिझेलच्या उपलब्धतेवरही दबाव निर्माण झाला. या परिस्थितीबाबत रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतीन यांनीही चिंता व्यक्त केली होती.

या पार्श्वभूमीवर भारताने रशियाचे कच्चे तेल मोठ्या प्रमाणावर आयात करून ते अत्याधुनिक रिफायनरींमध्ये शुद्ध केले आहे. भारतातील जामनगरसारख्या जगातील सर्वांत मोठ्या आणि आधुनिक तेल शुद्धीकरण प्रकल्पांमुळे भारताला कच्च्या तेलाचे उच्च मूल्यवर्धित पेट्रोलियम उत्पादनांमध्ये रूपांतर करण्याची क्षमता प्राप्त आहे. परिणामी, भारत केवळ स्वतःच्या ऊर्जागरजा पूर्ण करत नाही, तर विविध देशांना पेट्रोलियम उत्पादने निर्यात करून आर्थिक लाभही मिळवत आहे. यात रशियाही सामील आहे.

आज जगातील अनेक भागांमध्ये युद्ध सुरू आहे. इराण- अमेरिका संघर्षाची व्याप्ती वाढत असून, मध्य-पूर्वेतील अनेक देशही या संघर्षात प्रत्यक्ष सहभागी आहेत. दुसरीकडे रशिया- युक्रेन युद्ध अद्याप सुरूच असून, त्याची तीव्रताही आणखी वाढणार आहे. याबरोबरच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या शुल्क आणि व्यापारविषयक धोरणांमुळे जागतिक अर्थव्यवस्थेत मोठीच अनिश्चितता निर्माण झाली. जागतिक व्यापार, पुरवठा साखळी आणि गुंतवणूक यांवर त्याचे दूरगामी परिणाम होत आहेत.

दरम्यान, अमेरिकेत एक विधेयक पुढे आले असून, त्यानुसार रशियाकडून तेल खरेदी करणाऱ्या देशांवर १०० टक्के अतिरिक्त शुल्क लावण्याचा प्रस्ताव आहे. भारत हा रशियन तेलाचा प्रमुख ग्राहक असल्यामुळे या प्रस्तावाचा परिणाम भारतावर होऊ शकतो. तथापि, या धोरणाबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. कारण, युरोपियन संघातील काही देश अजूनही विविध स्वरूपात रशियाकडून ऊर्जा संसाधनांची खरेदी करत आहेत. तर, अमेरिका स्वतःही काही महत्त्वाच्या क्षेत्रांसाठी रशियन युरेनियमवरच अवलंबून आहे.

---

जगातली सगळ्यात मोठी स्वयंसेवी संघटना अशी संघाची ओळख. या १०० वर्षांच्या वाटचालीत उपेक्षा, उपहास, विरोध या गोष्टी पचवूनच संघाने ही ओळख निर्माण केली. त्यामुळेच संघ समाजाच्या कुतूहलाचा, अपेक्षेचा आणि विश्वासाचा विषय झाला. संघाच्या या वाटचालीवर अनेक ग्रंथ, स्मरणिका, लेख उपलब्ध आहेत. त्यातून संघाच्या यशस्वी वाटचालीचे रहस्य थोडेफार उमगते. मात्र, या विषयी अधिक भाष्य करत, संघकामाची सविस्तर ओळख करुन देणाऱ्या पुस्तकांचा मागोवा घेणारा हा लेख...

# शतकभराचा संस्कार...

समिक्षा
सुनिल कुलकर्णी




राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची १०० वर्षे' हे श्रीपाद कोठे लिखित आणि डॉ. शुभा साठे लिखित 'सहा सरसंघचालक', अशी दोन पुस्तके नुकतीच वाचनात आली. संघाची शतकाची वाटचाल, संघाची रचना, कार्यपद्धती, वैशिष्ट्ये आणि संघाचे आधारस्तंभ असलेल्या १८ व्यक्तिमत्त्वांचा परिचय श्रीपाद कोठे यांच्या पुस्तकातून होतो, तर, 'सहा सरसंघचालक' हे पुस्तक वाचताना सर्वसामान्य वाचकाला संघ म्हणजे एक व्यापक व्यक्तिनिर्माणाचे संघटन आहे; सामाजिक कार्यासाठी अष्टोप्रहर झटणारे स्वयंसेवक निर्माण करणारी ती एक संस्था असल्याचे समजते.

१९२५ सालच्या या रोपट्याच्या फांद्या आज शिक्षण, वनवासी, धार्मिक, वैद्यकीय, शेती क्षेत्र, कामगार क्षेत्र, ग्राहक अधिकार क्षेत्र, प्रसारमाध्यमे अशा विविध क्षेत्रांत फोफावून, त्याचे एका विशाल महाकाय सामाजिक वटवृक्षात रूपांतर झाले आहे. तसेच सामाजिक चारित्र्याचा पाया भक्कम करण्याकरिता बालसंस्कार, कुटुंबप्रबोधन, पर्यावरण, व्यवसाय समुपदेशन, रोजगारनिर्मिती, स्वदेशी पुरस्कार, नागरी कर्तव्याप्रति जागृती अशा अनेक गतिविधींमध्ये संघाचे काम अद्वितीय आहे. दुसऱ्या शब्दांत, 'संघावाचून कोण स्वीकारील काळाचे आव्हान...' हे संघपद्यातील शब्द वास्तव झाले आहेत. स्वयंसेवकांना संघाची विचारधारा यातून संघ संस्थापक, संघ स्थापना आणि आजपर्यंतच्या प. पू. सरसंघचालकांची ओळख याबद्दलची माहिती असते. त्यातील काहीजण या सहाजणांपैकी ज्यांच्या प्रत्यक्ष संपर्कात आले असतील, त्याबद्दल अभिमानही वाटतो. पण, 'सहा सरसंघचालक'मधून सहाही सरसंघचालकांच्या व्यक्तिगत आणि संघजीवनाच्या तपशीलवार कथनातून, आतापर्यंतचा संघाचा प्रवास कसा कसा झाला, याचे वर्णन वाचकांपर्यंत पोहोचते. प्रत्येक प. पू. सरसंघचालकांनी फक्त मागची 'री' न ओढता, स्वतःचा दृष्टिकोन आणि काळाची गरज याप्रमाणे संघाला विशिष्ट दिशा दिल्याचेही लक्षात येते.

**पहिला टप्पा : आद्य सरसंघचालक प. पू. डॉ. केशवराव बळीरामराव हेडगेवार**

**स्थापना:** स्थापना करताना राष्ट्रवाद, अनुशासन, चारित्र्यबांधणी व एकात्मभाव स्वयंसेवकांमध्ये सहज रुजण्यासाठी संघाचा ढाचा बाल, तरुण, प्रौढ यांना भावणारा; पण तितकाच परिणामकारक करण्याचे सगळ्यात अवघड काम आद्य सरसंघचालकांनी केले.'संघकार्य हेच जीवनकार्य' ही मनोभूमिका असलेल्या सुशिक्षित प्रचारकांची निर्मितीही त्यांनी केली. संघाची विचारधारा शाश्वत राहण्यासाठी व बाह्य वैचारिक आक्रमण रोखण्यासाठीची योजन ही, डॉक्टरांनी गुरुपौर्णिमेच्या उत्सवातून आखली.

**दुसरा टप्पा: द्वितीय सरसंघचालक प. पू. माधवराव सदाशिवराव गोळवलकर**

संघशाखांचा देशांतर्गत विस्तार, आंतरराष्ट्रीय स्तरावर संघकार्याची सुरुवात, स्वदेशी, तसेच संघाचा विविध सामाजिक आयामांमध्ये प्रवेश करुन, राष्ट्रीय- सामाजिक आपत्तीत योगदान देणारी संस्था ही ओळख प. पू. गुरुजींनी संघाला दिली. स्वामी विवेकानंदांच्या कन्याकुमारी येथील शिल्प समारकाची योजना ही श्रीगुरुजींचीच! त्यांचा प्रवास अलौकिकच! दरवर्षी ते पूर्ण भारत अक्षरशः पिंजून काढायचे.

**तिसरा टप्पा: तृतीय सरसंघचालक मा. बाळासाहेब देवरस**

मा. बाळासाहेबांच्या कारकिर्दीत, समरसतेच्या क्षेत्रात संघाने ठरवून भरीव कामगिरी केली. त्यांचा अनुशासनावर प्रचंड भर होता. यासाठी संघटन, एकत्रीकरण आणि प्रत्यक्ष कृती ही त्रिसूत्री त्यांनी संघ स्वयंसेवकांना दिली.

**चौथा टप्पा: चतुर्थ सरसंघचालक प्रो. रज्जूभैय्या**

समाजिकदृष्ट्या मा. रज्जूभैय्या हे संघाचे पहिले महाराष्ट्रीय व ब्राह्मणेतर सरसंघचालक असले, तरी संघासाठी त्यात अनैसर्गिक असे काहीच नव्हते. संघ महाराष्ट्रात जन्मला, त्यात तत्कालीन पुरोगामी आणि पुढारलेल्या उच्चशिक्षित लोकांचा वावर असल्याने, डॉक्टरांनंतर महाराष्ट्रातील उच्चशिक्षित नेतृत्व संघाला लाभणे, हे इतर सीमित पर्यायांमुळे साहजिकच होते. रज्जूभैय्या हे त्याचेच प्रतीक! मा. रज्जूभैय्या हे संघाचे सगळ्यात वयोवृद्ध झालेले सरसंघचालक. ते विज्ञानाचे विद्यार्थी असल्याने, त्यांच्या प्रत्येक विचारात वैज्ञानिक दृष्टिकोन असे. कुठल्याही प्रश्नावर सर्वांगीण विचार करूनच त्या समस्येची वस्तुनिष्ठ मांडणी करून, त्यावर ते सहज प्रभावी उपाययोजना सुचवत. संघाची अनेक पद्ये त्यांनीच लिहिली व रचली आहेत.

भारतात मानवी हक्क संघटना स्थापनेच्या कार्यात, त्यांचाच सिंहाचा वाटा होता. ते समान नागरी कायद्याचेही खंदे पुरस्कर्ते होते. मा. रज्जूभैयांच्या काळातच रामजन्मभूमी मुक्तीचे आंदोलन झाले. त्यामुळे समाजातील सर्व स्तरात हिंदुत्वाची भावना जागृत झाली. हे रामजन्मभूमी आंदोलनाचे फार मोठे फलित. काळाची गरज म्हणून, मा. रज्जूभैय्या यांच्या काळातच संघाचा अधिकृतरीत्या प्रचार विभागही सुरू झाला. संघाच्या प्रचार विभागाचा उद्देश संघकामाची प्रसिद्धी, तसेच लोकांपर्यंत संघ पोहोचवण्याचे काम हा आहे.

**पाचवा टप्पा : मा. कुप्प. सी. सुदर्शनजी**

मा. सुदर्शजी हे त्याकाळचे टेलिकम्युनिकेशन इंजिनिअर. अखिल भारतीय शारीरिक शिक्षणप्रमुख तथा अखिल भारतीय बौद्धिकप्रमुख अशा दोन्ही परस्परविरोधी जबाबदार्‍या पार पाडणारे, मा. सुदर्शनजी हे बहुतेक पहिले व्यक्तिमत्त्व असावे. यथावकाश सहसरकार्यवाह आणि तद्नंतर सरसंघचालकांची जबाबदारी त्यांनी समर्थपणे पेल-ली. कन्नड, बंगाली, मराठी, आसामी, उडिया, तामिळ, हिंदी, इंग्रजी या भाषा त्यांना नुसत्या अवगतच नव्हत्या; तर त्यांच्यावर प्रभुत्वही होते. मध्य प्रदेशपासून प्रचारक जीवनाची सुरुवात करत, बंगाल आणि पूर्वांचलमधल्या सगळ्या राज्यांत त्यांनी काम केले. त्यांची प्रतिभा अलौकिक होती. त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन, दैनंदिन प्रातःस्मरणात काही भर पडून प्रातःस्मरणाचे एकात्मता स्तोत्रात रूपांतर झाले. संघामध्ये प्रज्ञाप्रवाह कार्याचे ते मार्गदर्शक होते. त्यासाठी दे-शातील अनेक बुद्धिजीवींना त्यांनी यात सामील करून घेतले. हिंदू ऐकतेला जागतिक दृष्टी देण्याचे काम त्यांनीच केले. प्रोफेसर राजेंद्रसिंह यांच्या प्रमाणेच कृषी, जल संरक्षण व स्वदेशी यांच्यावर त्यांचाही विशेष भर होता. त्यांनी जैविक शेतीचा आग्रह धरला. गौ-ग्राम-कृषी या त्रयीवरही त्यांचा विशेष जोर होता.

**सहावा टप्पा : सध्याचे सरसंघचालक मा. डॉ. मोहनजी भागवत**

मा. मोहनजींनी, संघ हा गतिशील आहे. त्यामुळे जसजशी काळाची गरज निर्माण होईल, त्याप्रमाणे त्या काळाचे विषय संघात येतील. आधीचा काळ त्याविषयी विचार केला नाही म्हणून आज करायचा नाही, अशी झापडबंद भूमिका संघाची नाही, हा विचार त्यांनी मांडला. तद्नुसार, त्यांच्याच काळात संघाच्या गणवेशातही बदल झाला. आजची परिस्थिती धावपळीची आहे. मुलांच्या शाळेच्या वेळा, त्यानंतर शिकवण्या, त्याचबरोबर जिम, जिमखाना आणि अभ्यास अशा चक्रात अडकलेल्या विद्यार्थ्यांना संघशाखेत इच्छा असून, येणे शक्य नाही.

**संघाची आवश्यकता, संघविचार, स्थापना!**

संघस्थापना करताना प. पू. डॉक्टरांच्या डोळ्यांपुढे परमवैभवप्राप्त सुसंघटित, चारित्र्यसंपन्न, बुद्धिवंत, बलवंत व विकसित राष्ट्राचे चित्र स्पष्ट हो-ते. ती दूरदृष्टी, ते द्रष्टेपण त्यांच्या ठायी होते. प. पू. डॉ. हेडगेवार यांच्या मनात फक्त तांत्रिक स्वातंत्र्य मिळवणे एवढा संकुचित विचार नव्हता. तर, एका सुसंघटित, चारित्र्यसंपन्न व वैभवसंपन्न राष्ट्रनिर्माणाचा विचार तो होता. प. पू. डॉक्टरांनी हे शिवधनुष्य पेलले. तेवढ्याकरिता सखोल विचारमंथनातूनच त्यांनी संघाचे स्वरूप निश्चित केले. एखादी संघटना उभी करायची, तर जीवाला जीव देणाऱ्या लोकांची फौज उभी करावी लागणार. त्यासाठी लोकांमध्ये एकात्मभाव तयार होण्यासाठी काय करावे लागेल, याचा त्यांनी विचार केला. आणि ठरवले, दैनंदिन मैदानावरील खेळण्यासाठी लहान मुलांपासून तरुणांना एकत्र आणायचे. तसेच खेळत असताना त्यांच्यावर एकात्मतेचे, चारित्र्याचे, सामर्थ्य संवर्धनाचे, संघटनेचे, त्यागाचे, देशभक्तीचे संस्कार करायचे. अशा तर्हेने संघशाखा सुरू झाली. प. पू. डॉक्टरांची लोकसंग्राहकशक्ती मोठी विलक्षण होती. आज संघाला १०० वर्षे पूर्ण झाली आहेत आणि संघाने समाजाचे प्रत्येक अंग व्यापले आहे.

संघ आज देशाला दिशा दाखवतो आहे. त्यामागे या सहा सरसंघचालकांची प्रेरणा व अविरत काम आहेच. त्याचबरोबर त्यांनी निर्माण केलेल्या, स्वतःचे आयुष्य समर्पित केलेल्या हजारो सुशिक्षित प्रचारकांची २४ बाय ७ काम करणारी फौजही आहे. तसेच गावागावांतील चारित्र्यसंपन्न, उच्चशिक्षित आणि समर्पित स्वयंसेवकांचा सहभागही आहे. त्यांच्या त्यागातून आज संघाचे संक्रमण होत असून, संघ सर्वसमावेशक आणि विश्वव्यापी झाला आहे. स्वयंसेवकाचे खरे काम, शाखा प्रार्थनेनंतरच्या 'विकीर' या आज्ञेनंतर खऱ्या अर्थाने सुरू होते. संघकाम म्हणजे काय, याची कल्पना अशा पुस्तकांच्या वाचनातूनच सामान्यांना नक्कीच मिळते. यातूनच संघ वृद्धिंगत होत राहणार, यात जराही संशय नाही.